# श्री माणूस

सप्रेम नमस्कार,

साहित्य, कला व राजकारण ह्यांचा सुरेख संगम 'माणूस'मध्ये झालेला असतो.

वर्षारंभ अंक खरोखरच अंतर्बाह्य उत्कृष्ट आहे. 'श्री. ग. मां.'चा 'मार्ग' अतिशय बोचक, उपहासगर्भ व स्पष्ट असून त्याने पेशवाईअखेरचा शास्त्री-पंडित–कलाकार वर्ग व आजचा सुशिक्षित बुद्धिजीवी वर्ग ह्यांमधील साम्य अतिशय मार्मिकपणे चित्रीत केले आहे. 'दिल्ली दरबारा'बद्दल वेगळे लिहिणे नकोच. 'आस्वाद' या सदराबद्दल एकच सूचना करावीशी वाटते. ती म्हणजे त्याच त्या कवींच्या कविता देण्याऐवजी नवीन कवींना वाव द्यावा.

श्री. ज. जोशी यांचे 'दक्षिणायन' मनोवेधक आहे. त्यांच्या "Clerical Imperialism" ह्या कल्पनेवर एकदम खूष आहोत. मद्रदेशीय मनुष्याचे इतके समर्थ आणि मनोवेधक शब्दचित्र विरळेच लिहिले गेले असेल. 'माणूस' मध्ये कथा निवडतानाही अधिक चिकित्सक दृष्टिकोन बाळगला गेला तर बरे होईल. 'गफूरमियाँ' ही कथा वाचून केलेली ही प्रेमळ सूचना! येणार येणार म्हणून गाजलेली 'व्होल्गा जेव्हा......' ह्या लेखमालिकेचा पहिला हप्ता वाचून उत्सुकता बरीच वाढली. हीच उत्सुकता कायम ठेवली जाईल, ही अपेक्षा.

**शरद सराफ**, डोंबिवली

१७ जून १९६७
मूल्य चाळीस पैसे

# सहर्ष घोषणा

• •

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

• •

## राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

• •

## सप्रेम भेट योजना . . .

पहा : कव्हर पान तीन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : तिसरा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मे २९

दि. २० मे च्या अंकातील ' कोंडुरा ' या श्री. चि. त्र्यं. खानोलकर यांच्या नव्या कादंबरीचे सडेतोड परीक्षण हे या अंकाचे आगळे वैशिष्टच आहे. आजकाल वृत्तपत्रांतून जी परीक्षणे प्रसिद्ध होतात, ती बऱ्याच अर्थाने अपुरी असतात. ती उणीव ' माणूस 'ने भरून काढली आहे. या अंकात विद्याधर भागवतांची ' आभाळ ओथंबून आलं होतं... ' ही एक सामान्य पण वास्तवाशी इमान राखणारी कथा बरी आहे. श्री. ग. मा. लिखित ' मार्ग ' हे सदरही उत्कृष्ट आहे.

**भास्कर जोशी**, बीड.

स. न. मे ५

गेल्या ३ जूनचा ' माणूस ' वाचीत असता ' पत्रमैत्री '-तील एक अभिप्राय वाचून आश्चर्य वाटले. तो म्हणजे ' माणूस 'चा सध्याचा आकार बदलावा यासंबधीचा. एखादे मासिक (किंवा साप्ताहिक) आकारावरून पोरकट वाटावे हा विचारच मोठा मजेशीर आहे. माझ्या मते ' माणूस ' लोकप्रिय होण्यामागे त्याच्या आकाराचाही बराच मोठा भाग आहे. हा आकार निश्चित चांगला आहे.

**रामचंद्र देशपांडे**, देसूर.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण,
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

स. न. मे ३

वर्षारंभ अंक उत्तम वठला आहे. ह्यापूर्वी बऱ्याच अंकांपासून मात्र आमच्या येथील वाचकवर्गाची बरीच निराशा केली होती. 'माणूस'चा दरारा कमी झाला आहे, असे जे एका पत्रलेखकाने म्हटले आहे, त्या मताशी येथील बरेच वाचक सहमत आहेत. तसेच 'उर्दूवार्ता' आवडणारा वाचक अद्याप बघण्यात नाही.

सु. पु. फडणीस, जळगाव.

स. न. जून ५

आपलें 'माणूस' साप्ताहिक अधिकाधिक 'कसदार' बनत चालले आहे. जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे साहित्य निवडण्याच्या कामी आपण जी दक्षता घेत आहात ती खरोखरच कौतुकास्पद आहे. भारतीय मुस्लिम समाजाच्या राजकीय आशा-आकांक्षांचा, त्या समाजातील विचारप्रवाहांचा 'कानोसा' घेण्यासाठी 'उर्दूवार्ता'चा गवाक्षासारखा उपयोग व्हावा, असे मला वाटते. आपलाही हे सदर सुरू करण्यामागे हाच उद्देश असावा. चालू अंकापासून 'उर्दूवार्तां'ना मिळालेला 'टर्न' त्या दृष्टीने चांगला आहे.

दि. ३ जूनच्या अंकांतील 'परचम-इ-हिंद' या उर्दू दैनिकांनी डॉ. झाकीर हुसेन यांच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडीवर प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या लेखाचा गोषवारा वाचून नवल वाटते. दुःख झाले. भारत सरकारचा 'निधर्मीपणा' दिखाऊ आहे म्हणणं म्हणजे शुद्ध कृतघ्नपणा आहे! भारत सरकारचीच काय पण मूळ हिंदू समाजाची प्रकृतीच 'सेक्युलॅरिझम'ची चाहती आहे!...म्हणूनच येथे बौद्ध, जैन, शीख यांसारखे अनेक धर्म उदयाला आले. विकास पावले. इराणांतून इस्लामी धर्म-प्रचाराच्या लाटेमुळं निर्वासित झालेला 'पारशी (झरतुष्ट्री) धर्म' भारताच्या कुशीमध्येच विसावण्यासाठी आला!...हा इतिहास झाला. पण आज राष्ट्राध्यक्षांच्या निवडीत काय झाले?...कॉंग्रेसच्या आणि इतरही काही हिंदू खासदारांनी धर्म न पाहता डॉ. हुसेनना मतदान केले. पण मुस्लिम खासदारांनी-मग ते अधिकारारूढ कॉंग्रेसचे वा विरोधी पक्षांतले असोत, त्यांनी 'आपले उमेदवार' म्हणून डॉ. हुसेनना मतदान केले. विरोधी पक्षांतील मुस्लिम खासदारांचे कर्तव्य 'सुब्बाराव' यांना मतदान करणे होते!...पण त्यांनी ते केले नाही. मुस्लिम समाजाचा 'सेक्युलॅरिझम' हा असा आहे!!... पुण्यातील 'मुस्लिम विरोधी दंगल' ही एक प्रक्षुब्ध प्रतिक्रिया होती. त्याचे मूळ एका माथेफिरू मुसलमानानं हिंदूंच्या धर्म-भावनांचा जाणूनबुजून अपमान केला यात होते!... (आपले संकलक श्री. हिदायत खान यांनीही हे उदाहरण देण्याचे मुद्दाम टाळले की काय कोणास ठाऊक?...)

आणि जातीय दंगली काय केवळ हिंदु-मुसलमानांतच होतात काय ?... प्रत्यक्ष मुस्लिम धर्मातल्या शिया आणि सुन्नी पंथीयांमध्ये कित्येक धार्मिक प्रसंगी भयानक दंगली उद्भवतात–रक्ताचे पाट वाहतात. (प्रत्यक्ष पाकिस्तानमध्येही !) धार्मिक आणि जातीय दंगली ही सामान्य समाजाची एक विकृती आहे ! ... तेव्हा हिंदु-मुस्लिम दंगलींचा आधार घेऊन भारताचा 'सेक्युलॅरिझम' बेगडी आहे असं म्हणणं चूक आहे. सर्वसामान्य मुस्लिम समाज हा 'सेक्युलॅरिझम'च्या प्राथमिक कल्पनाही अजून आत्मसात करू शकला नाही असेच खेदाने म्हणावे लागते !...नाहीतर डॉ. झाकीर हुसेन यांनी शंकराचार्य नि जैन मुनी सुशीलकुमार यांचे आशीर्वाद घेतल्या-बद्दल त्यांनी नाकं मुरडली नसती !!...'परचम–इ–हिंद' मधील संबंधित लेख तेजबहादूर सिन्हा यांनी–म्हणजे एका हिंदूनं–लिहिला आहे म्हणे !... पण वृत्तपत्र-सृष्टीत कित्येक वेळा सोईस्करपणे टोपण नावाचा बुरखा घेतला जातो हे सांगणे नकोच !!... आणि कर्मठ मुसलमानांचे मनोगत व्यक्त करणारा हा कोणी हिंदूच असेल तर त्यातूनही हिंदूंच्या मूळ 'सेक्युलॅरिझम'च्या मनोवृत्तीची साक्ष पटते !... नाहीतरी कर्मठ मुसलमानांचे मनोगत हिंदूंशिवाय दुसरे कोण व्यक्त करू शकणार?... माझ्या मते तर 'इस्लाम धर्म' इतर कुठल्याही मुस्लिम राष्ट्रापेक्षा 'भारतातच' अधिक सुरक्षित आहे !!

**श्रीविलास कुलकर्णी, पुणे**

**स. न.** **मे ६**

'माणूस'ची कलात्मक दृष्टी आणि स्पष्टवक्तेपणा या गुणांनी 'माणूस' पाहणाऱ्या माणसावर पूर्ण कब्जा करतो. लहान मूर्ती पण थोर कीर्ती हे 'माणूस'-चे बाह्य स्वरूप. आत पानापानांतून अर्थ ओसंडत असतो. 'माणूस'ने राजकारण अवश्य मानले, परंतु द्वेषाचा व अहंतेचा त्याग करून. 'माणूस'मध्ये चिमटे घेण्याची वृत्ती आहे, परंतु ते रेशमाचे ठेव-ण्याची दक्षताही आहे. यशस्वी धंदा कर-ण्याचे कसब आहे, परंतु कलेचा बाजार नाही. **–आप्पासाहेब गुरव, अकोळ**

[ ता. चिकोडी, जि. बेळगाव, म्हैसूर ]

**स. न.** **जून ३**

आपण काढलेला 'लता मंगेशकर' अंक व आजचा वर्षारंभ अंक वाचला व पत्र लिहावेसे तीव्रतेने वाटले. मुखपृष्ठा-पासून मला कल्पकता व 'संपादना'चा स्पर्श जाणवला. 'कल्पवृक्ष कन्येसाठी' ह्या ओळीची निवड तर फारच अन्वर्थक वाटली. फडणीस व राजेंद्र गायकवाड (खासकरून) यांची व्यंगचित्रे आवडली. प्रा. गंगाधर गाडगीळ हे नाव वाचून लेख मोठ्या उत्सुकतेने वाचायला घेतला. पहिलेच वाक्य मला फार 'मोठे' वाटले. गाडगीळच ते लिहू जाणे. "लता मंगेश-कर ही एक व्यक्ती नाही तो एक आवाज आहे." अप्रतिम ! थोडक्यात खूप सांगून टाकणारी वाक्यं लिहिणाऱ्या गाडगीळांचे अभिनंदन ! पुरंदरे यांचे 'स्वरशिल्प' मोहविते. सी. रामचंद्र व माधव शिंदे यांचे लेख म्हणजे अंकाचे भूषण होय ! चतुरस्त्र संपादनाचे तो अंक म्हणजे सुफलित होय.

आपला चालू अंकातील (३ जून)

# लता – हमीद विवाह आणि ' माणूस '

' मार्ग ' हा परखड लेख मला अतिशय आवडला. त्यातले प्रतिपादन कुणाही राष्ट्रनिष्ठ माणसाला अंतर्मुख करून विचार करायला लावील, इतके प्रभावी आहे. कृतीने शब्दांना सामर्थ्य कसे प्राप्त होते ह्याचे अप्रतिम उदाहरण म्हणजे ' मार्ग. ' व्यक्तिशः मी तो लेख दोनदा वाचला. (असे अलीकडे क्वचितच घडते) श्री. जं. चे ' दक्षिणायन ' शैलीदार वाटले. हे घडणे आवश्यक आहे. परवा साहित्यसंघात ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ' व्होलगा 'ची लेखमाला 'उदयास्ता 'प्रमाणे गाजेलसे वाटते. ' रसिककौल ' मधील विचारांशी मी सहमत आहे. ' अनुपमा, ' ' गाईड ' ही चित्रे यशस्वी का ठरली आहेत? लोकांना चांगले हवे आहे व ते काय ते त्यांना कळते. पण चांगली चित्रे निघतातच कमी. —**प्रभाकर अत्रे**, डोंबिवली.

**स. न.** **मे ३०**

आम्ही ' माणूस 'चे अभिमानी. आपली चाळीस पैसे अंकाची योजना झाल्यापासून अंक विकत घेऊन वाचतो आहो. इतरांकडे त्याचा प्रचारही करतो. पण...

...पण ' माणूस 'चा ताजा अंक वाचला. लता-हमीद संसार किती सुखाचा चालला आहे, याचे रसाळ वर्णन वाचले. हिंदू मुलींनी मुसलमान तरुणाबरोबर लग्ने करावीत, ती यशस्वी होतात अशी ग्वाही तरी आपणांस द्यावयाची नाही ना? अकबर आदी मुसलमान राजांबरोबर झालेले निक्केही सुखाचेच होते. तेव्हा त्याचा राग येणारा राणा प्रताप वेडाच म्हणायचा का?

कृपया भावना जाणून घ्या. ' माणूस '-मध्ये आमचा मानसिक छळ करू नका.

**कुमारसेन जोशी,** डोंबिवली.

**स. न.** **जून ५**

आपल्या ' माणूस 'मध्ये केव्हा केव्हा मनाला संताप करून सोडणारे लिखाण वाचावयास मिळते.

' लता–हमीद ' संबंधीच्या लेखात वर्णिलेल्या सर्व घटना पूर्णतया वास्तवतेला धरून असतील. पण मनाला डाचले ते एवढेच, की ही हकीकत तुमच्या अंकाद्वारे समाजापर्यंत नेऊन पोचवावी असे तुम्हांस कोणत्या कारणाने आवश्यक वाटले? शंका येतात त्या अशा—

—हिंदूंच्या मुलीने मुसलमानाशी विवाह केला त्यात काहीही वावगे झाले नाही असे आपणांस वाटत असावे का?

—व्यक्ती ही समाजातील घटक या नात्याने लताने आपल्या सामाजिक जीवनावर तिच्या विवाहाने काही आघात होतो याचा विचार करून व्यक्तिगत सुखाच्या भावनांना तिलांजली देण्याचा विचारही मनात आणण्याचे प्रयोजन नव्हते, असे तर आपणांस वाटत नसावे?

—लताला जसा प्रामाणिक (अर्थात तिच्या दृष्टिकोनातून) जोडीदार मिळाला तसाच इतर हिंदू मुलींना आढळला तर खुशाल हिंदू मुलींनी मुसलमानाशी

विवाह करण्यास घाबरण्याचे कारण नाही, असा घडा आपणांस द्यावयाचा आहे का ?

'असे' लिखाण आपल्या अंकात पुन्हा येणार नाही याची दक्षता आपण घ्याल तर बरे !

ज. शं. जहागिरदार, औरंगाबाद.

स. न. जून २९

आंतरधर्मीय विवाह होतच असतात व ते होणारच; परंतु ज्यांना भारतीय म्हणण्याची लाज वाटते अशा मुस्लिम जातीचाच एवढा पुळका लेखकाला का बरे यावा ? ज्या व्यक्तींनी सदर विवाहास यश प्राप्त करून दिले त्यांचे औदार्यही निर्विवाद मान्य करता येईल, फक्त जेव्हा त्या व्यक्ती स्वत: किंवा स्वत:च्या कुटुंबात मुस्लिम व्यक्ती सून किंवा जावई म्हणून आणू शकतील. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणे सोपे असते.

सौ. लतिका हमीद शेख या दोन्ही सण (मुस्लिम व हिंदू) साजरे करतात ह्याबद्दल आश्चर्य वाटले. कारण त्या त्या धर्मशास्त्राप्रमाणे (ते हिंदू किंवा मुस्लिम असो) धर्म पाळण्याच्या अटी अगदी विरुद्ध आहेत. वाचकांना हा घेडगुजरी प्रकार वाचून आश्चर्यच वाटले असेल.

'माणूस'ने आपला दर्जा टिकवावा व तो टिकावा अशी मनापासून इच्छा आहे. तरी यापुढे असले विषय मध्ये काढून व त्यायोगे वाचक घटून 'माणूस प्रतिष्ठाना'त अपयश येऊ नये ही सदिच्छा.

जयंत जोशी, माहीम.

[लता–हमीदसारखे आंतरधर्मीय विवाह सर्रास व्हावेत, त्यात वावगे काही नाही, असे 'माणूस'ने कुठेही, केव्हाही प्रतिपादन केलेले नाही. आजच्या परिस्थितीत असे विवाह शक्यतो होऊ नयेत, त्यांचा सत्कार वगैरे तर करूच नये अशीच बहुसंख्य वाचकांप्रमाणे 'माणूस'चीही भूमिका आहे. पण निसर्गनियमांमुळे, स्वाभाविक प्रेमभावनेमुळे ते झालेच तर त्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहावे एवढाच मतभेदाचा मुद्दा आहे. जयंत जोशी म्हणतात, त्याप्रमाणे खरोखरच असे विवाह अधूनमधून होतच असतील, होणारच असतील तर 'माणूस'ची भूमिका फक्त पत्रकारितेला अवश्य असणाऱ्या कुतूहलबुद्धीची आहे, सहृदय व सावध निरीक्षकाची आहे. अशी प्रकरणे हेतूपुरस्सर दुर्लक्षून, दडपून, दडवून तरी काय साधणार आहे ? त्यापेक्षा अशा अटळ व अपवादात्मक प्रकरणांची नोंद, दखल वेळीच करून ठेवलेली असणे भावी काळाच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरण्याचा संभव आहे.

हा भावी काळ कोणता असेल ? निश्चितच तो एकांतिक विचारसरणीचा नसेल. सहा–सात कोटींचा मुसलमान समाज पूर्णतया 'राष्ट्रीय' समजून चालणारा गांधी–नेहरू संप्रदाय आणि तो पूर्णतया 'अराष्ट्रीय' समजणारा संकुचित हिंदुत्ववाद या दोन्ही आत्यंतिक टोकांच्या प्रतिक्रिया भावी काळाला मान्य होण्यासारख्या नाहीत, एवढे मात्र या संदर्भात तूर्त येथे सुचवून ठेवावेसे वाटते.

–संपादक ]

# मराठी कलावंत आणि बिहार परिवार

# अभिनव **संगीत** मैफल

आजवर अनेक संगीत मैफलींतून मी भाग घेतला, अनेक प्रकारच्या रसिक वृंदांकडून दाद घेतली; पण परवाच्या मैफलीसारखा 'मजा' कुठे आला नाही. या मैफलीमागचा हेतू निराळा होता. संयोजक पण आगळे होते आणि रंगत पण वेगळीच होती. नेहमीचा अनुभव म्हणजे, संयोजक येतात ते ठराविक रुंद हास्य घेऊन एखादं गोंडस नाव असलेल्या संस्थेतर्फे. मग, ही आम्ही नुकतीच सुरू केली आहे, आर्थिक बळ फार कमी आहे, कलांची सेवा वगैरे गुळगुळीत नाणी तोंडावर फेकतात. मला पण हे सगळं पाठ झालेलं असतं. मी पण माझ्या भात्यातले बाण काढतो. कलाकारांना कठिण दिवस आलेले आहेत, तुमच्यासारख्यांशिवाय कोण त्यांना जगवणार, वगैरे. मग घासाघीस होऊन 'आकडा' ठरतो. नमस्कार, चमत्कार, लांबरुंद हास्य. येतो, नमस्कार. या नमस्कार. वगैरे वगैरे.

पण परवाच्या या अभिनव मैफलीचे संयोजक माझ्याकडे आले तेव्हा नेहमीचा हा संवाद झाला नाही. कसल्याही प्रकारचा कृत्रिमपणा, व्यवहारीपणाखाली झाकलेला ढोंगीपणा असला कोणताही प्रकार नव्हता. रोखठोक पण नम्र असा सरळपणा होता. पोटतिडीक होती. तळमळ होती. 'बिहार परिवार'ने एका संगीत मैफलीचं आयोजन केलं आहे. त्यात तुम्ही भाग घ्यावा अशी इच्छा आहे. 'माणूस प्रतिष्ठान', 'यूथ ऑर्गनायझेशन' आणि 'जनसंमोहिनी' या तिन्ही संस्थांनी एकत्र येऊन बिहारच्या मदतीसाठी हा कार्यक्रम आखला आहे. संयोजक सरळ शब्दांत सांगतात. लांबरुंद हास्याचा अभाव आणि विनंतीमागची तळमळ मला सुखद वाटते. मी होकार तर देतोच पण या पुण्यकर्मात आणखी लागेल ती मदत देण्याचे आश्वासन देतो. मला खूप खूप बरं वाटतं हे आश्वासन देताना. वर्षभर का होईना मी बिहारचं अन्न खाल्लेला आहे. मुझफ्फरपरच्या 'लीचीचा' भरपूर आस्वाद घेतलेला आहे, सागराचं रूप धारण केलेल्या गंगेत मनसोक्त डुंबलोय. त्या अन्नपाण्याचं ऋण फेडण्याची ही संधी मला मिळाली होती. मला आनंद झाला पण त्याबरोबरच ही पोरं ही मैफल कशी काय पार पडणार ही शंका पण मन पोखरीत होती.

अशा शंकाकुल मनःस्थितीतच रात्री मी स. प. कॉलेजमध्ये दाखल झालो. मुद्दाम थोडासा उशीराच गेलो. आणि मैफलीच्या आसपास जरा रेंगाळलो, गुपचुपपणे मैफलीचा अदमास घेण्यासाठी. सारं ठाकठीक होतं. रंगीबेरंगी पडद्यांच्या पार्श्वभूमीवर मोहना खरे मारू बिहाग आळवीत होत्या. दामूअण्णा मंगळवेढेकरांनी दमदार ठेका

धरला होता. समोरचा श्रोतृवृंद शांत चित्तानं संगीताचा आस्वाद घेत होता. 'बिहार परिवार 'चा तो चक्रधारी 'माणूस' पण स्वरांत रंगून गेला होता. पोरगेलेसे स्वयंसेवक आणि स्वयंसेविका इकडे तिकडे करीत होत्या. मला धीर आला. मी मग कलाकारांच्या खोलीकडे वळलो. अदबीनं स्वागत झालं. "चालत का आलात, मोटर पाठविली असती", अशी प्रेमळ तक्रार केली गेली. चहा कॉफी हवी का, म्हणून विचारलं गेलं. या अगत्यानं मी सुखावलो. आत गलो तर वसंतराव देशपांडे, ज्योत्स्ना भोळे वगैरे महारथी मंडळी गप्पांत रंगून गेलेली. साथीदार मंडळी तबला, तंबोरा लावण्यात गढून गेलेली. तेवढ्यात मोहनाबाईंची ठुमरी संपली आणि उस्मानखाँ आपली सतार घेऊन रंगमंचाकडे निघाले. त्यांच्या बरोबरचे साथीदारपण न सांगता त्यांच्या बरोबर निघालें. सगळं अगदी ठरल्याप्रमाणे होत होतं. कसलाही गोंधळ नव्हता. "यानंतर तुमचा कार्यक्रम आहे बरं का."

उस्मानखाँ जाता जाता मला म्हणाले.

"ठीक आहे. तुम्ही कोणता राग वाजवणार ?" मी विचारलं.

"शिवरंजनी."

"अच्छा, बेस्ट लक्" मी म्हणालो.

"शुक्रिया" उस्मानखाँ म्हणाले आणि रंगमंचाकडे गेले. मी माझे तंबोरे जुळवले आणि श्रोत्यांत जाऊन बसलो. उस्मानखाँनी मैफल काबूत घेतली होती. तबल्याची आणि सतारीची 'लडत' चांगलीच रंगली होती. टाळ्यांची पावती घेऊन उस्मानखाँ खाली उतरले. सतारीच्या तडफदार रंगतीनंतर माझी बासरी लोकांना आवडेल का असा विचार करीतच मी रंगमंचावर गेलो. समोर तसे अनोळखी चेहरे बरेच होते, पण उजवीकडे खुर्चीवर मात्र ओळखीचे चेहरे होते. त्यातून डॉ. वसंतराव देशपांडे, ज्योत्स्ना भोळे, पुष्पलता कुलकर्णी अशी कलाकार मंडळी पहिल्याच रांगेत बसलेली पाहून धीर आला आणि मी षड्ज लावला. 'दाद' मिळू लागली. 'चारू केशी' रागानंतर मी वाजवलेली 'धुन' पण लोकांना आवडलेली दिसली, मला बरं वाटलं. मध्यंतरात व्यवस्थापकांनी (या पोरांना व्यवस्थापक म्हणताना कससंच वाटतं. त्यांना भल्या मोठ्या मिशा चिकटवल्या आहेत असं वाटलं.) हवं नको ते अगदी अगत्यानं पाहिलं. कडक पँटीतली ती पोरं आणि मॉडर्न फॅशनच्या त्या पोरी कपबशा उचलीत होत्या. विसळून देत होत्या. काही तरुण तंबोरे, तबले, रंगमंचाकडे नेत होते आणीत होते, प्रत्येक हालचालीत उत्साहाबरोबर जबाबदारीची जाणीव पण होती.

मध्यंतरानंतर डॉ. वसंतराव देशपांडे गायला बसले. मधुकंसाची चीज झपतालात फेकल्याबरोबरच रंग भरला. वसंतरावांच्या बेलगाम गळ्याला कशाची उपमा द्यावी हेच कळत नाही. हवा तो स्वर हव्या त्या लयीत हुकमीपणे काढणारा

[पान ६० वर]

# दिल्ली दरबार

— सदाशिव पेठकर

आपला राज्यकारभार कोठून चालतो? दिल्लीहून, मॉस्कोहून का कायरोहून?

असा एक खवचट प्रश्न नुकताच सत्तारूढ कॉंग्रेस पक्षास विचारण्यात आला. पश्चिम आशियामध्ये ईजिप्त आणि इस्रायल यांच्यांतील तणातणीचे संबंध चिघळू लागताच भारत सरकारने ईजिप्तला पाठिंबा देण्यात जी घाई केली त्या संदर्भात या प्रश्नाचा रोख होता. १९४८ मध्ये इस्रायलची निर्मिती झाल्यापासून ते चिमुकले यहुदी राष्ट्र सभोवतालच्या अठरा-वीस अरब राष्ट्रांच्या डोळ्यांत सलत आहे. काही ना काही निमित्त साधून इस्रायलचे नाव जगाच्या नकाशावरून पुसून टाकण्याचा अरब राष्ट्रांचा निर्धार आहे. त्यामुळ अधून मधून कधी इस्रायलच्या दमबाजीमुळे तर कधी नासरप्रभृति अरब नेत्यांच्या पुढाकारामुळे इस्रायल आणि अरब राष्ट्रे यांच्यांतील मूळच्या प्रभुत्वाला धार चढते आणि युद्धाचा भडका उडतो. इस्रायलच्या निर्मितीपासून दोन वेळा धुमश्चक्रीची ठिणगी उडाली आणि दोन्ही वेळेला इस्रायलने ईजिप्तला चोपून काढले. या नामुष्कीचा बदला घेण्याची खुमखुमी नासर यांच्यासारख्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रनेत्याच्या मनात निर्माण होत असेल तर नवल नाही. गेल्या मे महिन्याच्या मध्यापासून ईजिप्तप्रभृति अरब राष्ट्रे व इस्रायल यांच्यांतील तणातणीला पुन्हा प्रारंभ झाला व गेल्या दि. ५ जूनपासून तर प्रत्यक्ष रणधुमाळीच सुरू झाली.

प्रारंभापासून ब्रिटन व अमेरिका या राष्ट्रांचा इस्रायलला उघड उघड पाठिंबा आहे. पाश्चात्त्यांचा इस्रायलला पाठिंबा असल्यामुळे त्यांच्याशी जागतिक नेतृत्वा-बाबत स्पर्धा करणाऱ्या रशियाने अरब राष्ट्रांचा पाठपुरावा करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे वरकरणी हा ईजिप्त विरुद्ध इस्रायल असा संघर्ष दिसत असला तरी अमेरिका विरुद्ध रशिया या संघर्षाचाच तो एक भाग आहे. अकरा वर्षांपूर्वी नासर यांनी सुवेझ कालव्यावरील फ्रेंच आणि ब्रिटिश यांच्या वर्चस्वाला सुरुंग लावताच महा-युद्धाचा भडका उडण्याचा संभव निर्माण झाला होता. त्या वेळी अमेरिकेने आपल्या मित्र राष्ट्रांना आस्ते कदमचा सल्ला देऊन हा संघर्ष टाळला. परंतु सुवेझवरील आपला रास्त अधिकार मान्य करून घेण्याच्या कामी नासर यांनी जी धडाडी दाखविली त्यामुळे त्यांचे आंतरराष्ट्रीय महत्त्व बरेच वाढले. विशेषतः, अरब राष्ट्रांचे नेतृत्व आपोआपच त्यांच्याकडे चालत आले आणि तेव्हापासून ईजिप्तकडे रशियन मदतीचा ओघ वळला.

# धोरण फसले, अब्रू गेली

या अकरा वर्षांपूर्वीच्या संघर्षाच्या वेळी पं. जवाहरलाल नेहरू यांनी नासर यांच्या भूमिकेला भारताचा निःसंदिग्ध पाठिंबा असल्याचे जाहीर केले व तेव्हा-पासून ईजिप्त-भारत संबंधांचे नवे पर्व सुरू झाले असे आपण मानू लागले. विशेषत: अलिप्ततावादी राष्ट्रांची जूट निर्माण करण्याच्या कार्यात नेहरू आणि नासर यांचे सहकार्य वाढत गेले.

या सर्व गोष्टी येथे अशासाठी सांगितल्या की भारत आणि ईजिप्त यांच्या प्राचीन संबंधांचे गोडवे गाण्याच्या नादात वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होऊ नये. पंडितजींच्या मनात जागतिक शांततेच्या ध्येयवादामुळे जे जे राष्ट्र पाश्चात्त्यांच्या वसाहतवादी वर्चस्वाविरुद्ध उभ राहत असे त्या त्या राष्ट्राबद्दल पंडितजींच्या मनात आपोआप सहानुभूती निर्माण होई. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले मित्र म्हणवणारी राष्ट्रे ध्येयवाद कितपत पाळत याचा विचार न केल्यामुळे पंडितजींनी आखलेले आपले परराष्ट्रीय धोरण आजच्या काळात तरी खचित हास्यास्पद ठरले आहे. १९५६ च्या ईजिप्त-इस्रायल संघर्षाच्या वेळी ईजिप्तची बाजू आपल्याला न्याय्य वाटली म्हणून आपल्याला अन्नधान्याची आणि पैशाची अवाढव्य मदत करणाऱ्या ब्रिटन-अमेरिकेचा रोष पत्करण्यासही आपण तयार झालो. परंतु १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये कम्युनिस्ट चीनने आपल्यावर आक्रमण करताच नासर आपल्याला मदतीस आले काय हा प्रश्न खरा महत्त्वाचा आहे. त्या वेळी रशिया आणि ईजिप्त या आपल्या मित्र राष्ट्रांनी तटस्थतेचे धोरण स्वीकारले होते. त्यानंतर तीन वर्षांनी पाकिस्तानने आपल्यावर हल्ला चढविला. त्या वेळीही ही आपली मित्र राष्ट्रे आपल्या बाजूने उभी ठाकली काय ? नाही, हेच या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आहे.

## हितसंबंध महत्त्वाचे

याचे कारण काय ? आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीही कायमचे मित्र नसतात व कायमचे शत्रू नसतात. कायमचे असतात ते फक्त राष्ट्रीय हितसंबंध. या सोप्या आणि व्यवहार्य भूमिकेवरूनच आंतरराष्ट्रीय करारमदार केले जातात किंवा मोडले जातात. ही वस्तुस्थिती स्वत: पं. नेहरूंनीही मान्य केली होती. आपल्या राष्ट्राचा फायदा कशात आहे हे ध्यानात घेऊनच परराष्ट्र धोरण आखावे लागते असे त्यांनी वीस वर्षांपूर्वी घटना समितीत बोलताना म्हटले होते. आंतरराष्ट्रीय राज-कारणातील हे सत्य पंडितजींना उमगले असले तरी प्रत्यक्ष परराष्ट्रीय धोरण आख-

ताना आपण आपल्या राष्ट्रीय स्वार्थाची दखल घेण्याऐवजी अवास्तव ध्येयवादाच्या आहारी गेलो. कोणताही आंतरराष्ट्रीय प्रश्न निर्माण झाला की त्यावर मतप्रदर्शन करण्याची गरज आहे, असे मानून आपण अनेक राष्ट्रांना दुखावले. इतकेच नव्हेतर अशा तऱ्हेचा प्रत्येक कटकटीचा प्रश्न निर्माण झाला असताना आपण रशिया आणि ईजिप्त यांच्या पदरात झुकते माप टाकले. यात राष्ट्रीय स्वार्थही नव्हता व ध्येयवादाचा निर्मळ आवेशही नव्हता. या दोहोंच्या मधले असे काही तरी होते. हंगेरीमध्ये जनतेचा उठाव होताच क्रुश्चेव्ह साहेबांनी तेथे रणगाडे घुसविताच आपण रशियाच्या या अमानुष हस्तक्षेपाकडे दुर्लक्षच केले आणि आपल्या पक्षपाती धोरणाचे अकारण प्रदर्शन केले.

जी गोष्ट रशियाबाबत तीच ईजिप्तबाबत. ईजिप्त रागावेल म्हणून आपण इस्रायलशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केलेले नाहीत. इतकेच नव्हे तर काही दिवसांपूर्वी इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष नेपाळभेटीहून मायदेशी परत जात असताना काही तास दिल्लीस थांबले असताना व या अवधीत दिल्लीत राहण्याची आपली सोय व्हावी अशी त्यांनी विनंती केली असताना आपण त्यांना दिल्लीत येऊ दिले नाही. तेथील विमानतळावरच त्यांना थांबविण्यात आले. अशा रीतीने एकीकडे आपण रशिया व ईजिप्त यांची मनधरणी करीत असताना या दोन्ही राष्ट्रांनी आपल्या बिकट प्रसंगी मात्र तटस्थतेचा आव आणून आपल्याला आणि आपल्यावर आक्रमण करणाऱ्या आपल्या शत्रूराष्ट्रांना समान लेखले. रशिया, ईजिप्त ही राष्ट्रे निदान मोठी तरी आहेत. परंतु आपल्या आग्नेयेकडचे छोटेसे इंडोनेशिया हे राष्ट्रदेखील आपल्याशी कसे वागले हे पाहण्यासारखे आहे. डच वसाहतवादाविरुद्ध उभ्या राहिलेल्या सुकार्नो यांना प्रथम आधार कोणी दिला असेल तर तो पंडित नेहरूंनी. इतकेच नव्हेतर आशियातील नवजागृतीचे प्रतीक म्हणून सुकार्नो यांचा भारताने कितीतरी उदोउदो केला. परंतु पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले तेव्हा डॉ. सुकार्नो हे सारे विसरले आणि त्यांनी उघडउघड पाकिस्तानला पाठिंबा देऊन जाकर्तातील भारतीय मालमत्तेचा विध्वंस केला. एके काळी चीनबद्दलही आपली मैत्रीभावना उतू जात होती. दिल्ली–पेकिंग–जाकर्ता–कायरो अशी आफ्रिकी–आशियाई एकजुटीची साखळी निर्माण करण्याचे स्वप्न उराशी बाळगून आपण बांडुंग परिषदेसारख्या परिषदांचा धूमधडाका उडवून दिला होता. या साखळीतील दोन राष्ट्रे तर उघडउघड आपल्याविरुद्ध गेली व उरलेल्या तिसऱ्या राष्ट्राने आपल्यावरच्या दोन्ही आक्रमणांच्या वेळी सावधगिरीची तटस्थता स्वीकारली.

## ध्येय दुरावले, धोरण फसले

हा सारा अनुभव ध्यानी असतानाही आपल्या परराष्ट्रीय धोरणाच्या वादविवादाच्या भूमिकेवरून फेरविचार झाला आहे काय, याची तपासणी केली तर निराशाच पदरी येते. म्हणूनच ‘आपला राज्यकारभार कोठून चालतो ? दिल्ली-

हून, मॉस्कोहून, की कायरोहून ?' असा एखाद्याने छद्मी प्रश्न विचारला तर आपल्या परराष्ट्रखात्याच्या नाकास मिरच्या झोंबण्याचे काहीही कारण नाही. ईजिप्त-इस्रायल संघर्षात ईजिप्तने विनंति केली नसतानाही छगला साहेबांनी भारत सरकार ईजिप्तच्या बाजूचे आहे, असे जाहीर करून टाकले. अर्थात् आपल्या या पाठिंब्याची नासर यांनी साधी दखल घेतली नाही व ते रशिया-फ्रान्सचे गोडवे गाण्याच्या भरात भारताला विसरून गेले. इस्रायलला भारताचा विरोध का तर म्हणे ते धर्माधिष्ठित राज्य आहे ! परंतु एखाद्या राष्ट्राचे अंतर्गत स्वरूप कोणते आहे हा आंतरराष्ट्रीय राजकारणात सर्वस्वी गैरलागू प्रश्न आहे. ईजिप्तमध्ये कम्युनिस्ट पक्षावर बंदी असतानाही रशिया त्याच्या पाठीशी उभा राहतो. याचे साधे तत्व असे आहे की रशियाला ईजिप्शियन कम्युनिस्टांपेक्षा आपला राष्ट्रीय स्वार्थ अधिक मोलाचा वाटतो. शिवाय इस्रायल हे धर्माधिष्ठित राज्य आहे. म्हणून त्यास विरोध तर ज्या पाकिस्तानचा आपण सतत अनुनय करीत आहोत त्या राष्ट्राच्या धर्मातीत स्वरूपाचे दर्शन आपल्याला घडले आहे काय ? उलट प्रथम पश्चिम पाकिस्तानमधून व नंतर पूर्व पाकिस्तानमधून एक एक हिंदू टिपून काढून त्याच्यावर एक तर हकालपट्टी किंवा मृत्यू असा पर्याय ठेवणाऱ्या पाकिस्तानचे धर्मांध आणि भारतद्रोही स्वरूप आपण गेली वीस वर्षे पाहतच आहोत. पूर्व पाकिस्तानातील हिंदूंचा अमानुष छळ होत आहे. हे खुद्द छगला यांनीच संसदेत सांगितले आहे. हे सर्व पाहिले की इस्रायल हे धर्माधिष्ठित राज्य आहे म्हणून धर्मातीत भारत सरकारचा त्यास विरोध आहे, हे सांगण्यात निव्वळ दांभिकता आहे. ईजिप्तला आणि त्याच्या भोवती पसरलेल्या अरब राष्ट्रांना (त्यातील बहुतेकांनी भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी पाकिस्तानला मदत केली होती.) खूष करण्यासाठी आपण इस्रायलला विरोध करीत आहोत. रशिया आज अरब राष्ट्रांच्या पाठीशी उभा आहे, म्हणून येथील कम्युनिस्ट ईजिप्तच्या बाजूचे. उद्या जर काही कारणाने रशिया व ईजिप्त यांचे बिनसले की मग नासर प्रतिगामी कसे आहेत हे सिद्ध करण्याचा यांचा आटापिटा सुरू होईल.

या सर्व घटनांचा आशय एवढाच की १९६२ पासून आंतरराष्ट्रीय राजनीतीतील वेड्यावाकड्या वळणांचा अनुभव घेऊनही आमच्या परराष्ट्रीयत्वाला बदलत्या राष्ट्रीय धोरणात आणि त्यामागील विचारसरणीत फेरबदल करण्याची गरज वाटत नाही. एकीकडे आपला ध्येयवाद लटका पडतो तर दुसरीकडे राष्ट्रीय स्वार्थ साधला न जाता काल्पनिक आंतरराष्ट्रीय शांततेच्या अट्टाहासापायी शरणागतीचे धोरण अवलंबावे लागते. परंतु शरणागतीतून शांतता निर्माण होत नाही, उलट युद्धाचा मार्ग सुकर होतो हे १९३९ मध्ये ब्रिटनने व १९६२ मध्ये आपण अनुभवले आहे. साचेबंद आणि नेभळट परराष्ट्रीय धोरणामुळे ध्येय दुरावण्यात आणि धोरण फसण्यात होते. पश्चिम आशियातील संघर्षाच्या निमित्ताने आपण आपल्या वाटचालीची दिशा बदलू इच्छित नाही हेच पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. ●

# मुक्ताफळे



## □ ' लूप ' आणि ' पूप ' !

भारताचे नवे आरोग्यमंत्री डॉ. चंद्रशेखर यांनी भारताची लोकसंख्या कमी करण्याचा चंग बांधला आहे. लोकांना फार मुलें होतात, या कल्पनेने डॉ. चंद्रशेखर यांना खुद्द झोप लागत नाही. आपल्या लाडक्या ' लूप 'ला ' पूप ' चा आशीर्वाद घेण्यासाठी त्यांनी व्हॅटिकनची वारी केली. हे पोप महाराज नुकतेच भारतात येथील जनतेला दर्शन देऊन गेले असल्याने, सांताक्रूझ विमानतळावर उतरल्यापासून त्यांना भारताच्या विशालत्वाची एवढी तीव्र जाणीव झाली, की संततीचा ' लोप ' करण्याचे डॉ. चंद्रशेखर यांचे कारस्थान ' पोप ' महाशयांना मुळीच पसंत पडले नाही. भारतात जर संतती कमी झाली, देश सुदृढ झाला तर मग इथे मिशनऱ्यांनी करायचे काय ? भारतातले दारिद्र्य, अती संतती, उपासमार ही तर ख्रिश्चन मिशनऱ्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे ! तेव्हा पोप महाशयांनी ' लूप 'चा धि:कार केला. कुठल्याही कृत्रिम उपायांनी संततीला प्रतिबंध करणे ख्रिश्चन धर्माला मंजूर नाही, असे सांगून त्यांनी डॉ. चंद्रशेखर यांना हातांत नारळ दिला. मुसलमानांनी एकपत्नित्वाचा स्वीकार करावा व संततिनियमनाला जाहीर पाठिंबा द्यावा, असे आवाहन भारतात डॉ. झाकीर हुसेनही करीत नाहीत. त्यांनी नेहरूंना मागे सल्ला दिला की, " सिव्हिल कोड कराल तर मुसलमानांत क्षोभ होईल ! " तेव्हा आता भारतात संतती प्रतिबंधक ' लूप ' वापरणे वगैरे सर्व काही हिंदू स्त्रियांनी प्रामुख्याने करावयाचे आहे. इथले मुसलमान व ख्रिश्चन यांना त्यांच्या धर्माची आडकाठी असल्याने लूप वापरणे शक्य नाही. मुसलमानांना चार बायका प्रसंगी कराव्या लागणार ! ' लूपधारी हिंदूंना ' येथील इतर धर्मीय संतती लवकरच ' हूपहूप ' करू लागेल. हा जो इतर धर्मीय संततीचा बोजा वाढणार आहे, तो केवळ हिंदूंनी फक्त ' लूप ' वापरून कमी होणार नाही, यासाठी डॉ. चंद्रशेखर यांनी नव्या दोन सूचना आता मांडल्या आहेत. डॉ. चंद्रशेखर यांना

गर्भपाताला कायदेशीर मान्यता हवी आहे, व 'लूप' आदी साधने खेड्यापाड्यांतून विमानांतून टाकण्यासाठी त्यांना हेलिकॉप्टर हवी आहेत !!

म्हणजे 'लूप' वापरून यदाकदाचित (सरकारी 'लूप' असल्याने तो काम देईल, अशी शाश्वती नाही !) मूल होणार असे नक्की झाले, तर डॉ. चंद्रशेखर हे गर्भपात उपलब्ध करीत आहेत.

भारतातील (कॉंग्रेस मंत्री वगळून) इतर समस्त हिंदुबांधवांनी 'लूप' व 'गर्भपात' यांच्या जोरावर भारतात संतती निर्मूलन करावयाचे आहे. मंत्री वगळून असे आम्ही म्हणतो, कारण इतर सर्व योजनांचे उद्‌घाटन करण्याकरता धावाधाव करणाऱ्या मंत्र्यांपैकी, अजून एकानेही जाहीरपणे– 'आमच्या सौभाग्यवतीने लूप बसवला हो' असे सांगून लूप केंद्राचे जाहीर उद्‌घाटन केल्याचे ऐकिवात नाही. आमची खात्री आहे, भारतात कॉंग्रेस मंत्र्यांची जी ३–४ हजार लोकसंख्या आहे त्यांपैकी एकाही मंत्रिणबाईंनी लूप बसवलेला नाही. एखादा मंत्री दगावतो, तेव्हा त्याच्या कुटुंबाचा जो हिशेब येतो, त्यात त्यांना ७–८ मुले असल्याचे आग्रहपूर्वक नोंदण्यात येते; अर्थात हे बरोबरच आहे. स्वतःची आमदनी पाहून प्रत्येकाने हातपाय पसरावे. मंत्र्यांना कमी संतती असण्याचे काहीएक कारण नाही !

खेड्यापाड्यांत संततिनियमनाची साधने टाकण्यासाठी हेलिकॉप्टर वापरण्याची डॉ. चंद्रशेखर यांची सूचना हीदेखील गॅलब्रेथ यांच्या पुस्तकातून उचललेली असली, तरी उचलेगिरीच्या बाबतीत मंत्र्यांना दोष लागत नाही.–सूचना फारच चांगली आहे. पूर्वी पृथ्वीवर पुण्य केले तर स्वर्गात जायला विमान येत असे. आता पृथ्वीवर भारतात हिंदुबांधवांनी संततीनिर्मितीचे पाप करू नये व इथेच स्वर्ग निर्माण व्हावा यासाठी ही विमाने सर्वत्र येणार आहेत. शेतांत, घरांत, छपरांवर, अंगणात, रस्त्यात कुठेही ही साधने यापुढे उपलब्ध होऊ शकतील हा मोठाच फायदा होय ! सर्व खेडूत आकाशाकडे या विमानांची वाट पाहात बसलेले आहेत व हेलिकॉप्टर दिसू लागताच 'लूप' 'लूप' हा हर्षध्वनी उठत आहे, हे किती मनोरम चित्र आहे !

शिवाय लोकांना हेलिकॉप्टरने वचक निर्माण होईल ! वेळी अवेळी हेलिकॉप्टरने चंद्रशेखर यांची माणसे कुणाच्याही घराच्या छपरावर उतरून, साधनांचा संपूर्ण उपयोग होतो की नाही याची तपासणी करू शकतील.

भारतीय गगनात उगवलेला हा नवा 'चंद्र' खरोखरच विवाहित हिंदू स्त्रीपुरुषांचा लाडका होणार आहे. चंद्रावर मुलांनी एकेकाळी फार प्रेम केले. 'चांदोबा चांदोबा भागलास का ?' असे म्हणणारी पोरे इतकी झाली की अखेर पोरे कमी करण्याकरता शुभ्र चांदोबाने हा मंत्र्याचा अवतार घेतला आहे. ती पाहा एक हिंदू विवाहित स्त्री त्याला आळवीत आहे.

"चांदोबा चांदोबा 'लूप'लास का,
पोपच्या आडामागे लपलास का ?

यवनी झाड नजरबंदी
मंत्र्याचा वाडा चिरेबंदी
कॉप्टर घेऊन येऊन जा
चार, दोन लूप टाकन जा!"

## ☐ छाग–ला!

ज्यू-अरबांचे युद्ध सुरू झाले आहे. अकाबाच्या आखातातून १९४८ सालापासून इस्रायलची जहाजे नासरच्या नाकाखालून जात होती. परंतु गेल्या महिन्यात अचानक नासर यांना 'शिंक' आली. अध्यक्ष नासर हे अरब याने मुसलमान असल्याने ते इंदिराजींचे दोस्त आहेत. मागे दिल्ली परिषदेत इंदिराजींचा माईक बिघडला, पण नासरच्या माईकवरून इंदिराजींनी 'आंतरराष्ट्रीय सलोख्याची तत्त्वे फारच छान मांडली!' नासरला इस्रायलचे अस्तित्व काटयासारखे खुपत आहे. गेल्या महायुद्धानंतर 'ज्यू' लोकांना प्रथमच भूमी मिळाली व पॅलेस्टाईनमध्ये 'इस्रायल' हा छोटा देश जन्मला. हा आपल्या मुळावर आला आहे, असे अरबांना वाटते. मागे सिरीयाने इस्रायलवर आक्रमण करून पाहिले, परंतु इस्रायलने सिरीयाचे व पर्यायाने नासरचे नाक कापले, तेव्हापासून ही अरब मंडळी इस्रायलला नामशेष करण्याची जय्यत तयारी करीत आहेत. इस्रायलची आर्थिक नाकेबंदी करण्याचे नासरने ठरवले व अकाबाचे आखात इस्रायलला बंद केल्याची घोषणा केली. परंतु या प्रश्नावर एक इंचभरही 'ना–सर' अशी भूमिका इस्रायलने घेतली आहे.

आपले परराष्ट्र धोरण फारच सोपे आहे. न्याय–अन्याय, खोटे-खरे याची फारशी चिकित्सा आपण करायची नसते. जगातले सगळे मुसलमान, ते आपले दोस्त आहेत, असा आपला सिद्धांत आहे. म्हणून तर आपण त्यांना पाकिस्तान दिले! आता सर्व मुसलमानी राष्ट्रांचे– 'पॅन इस्लाम गटाचे'–नासरचे स्वप्न आहे ते प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण त्यांना मदत करीत असतो. तेव्हा या युद्धात आपला पाठिंबा नासरला आहे हेच बरोबर आहे!

नासरचेही आपल्या देशावर कित्ती कित्ती प्रेम आहे! नासरच्या राज्यात सर्व वृत्तपत्रे ही 'अरब सोशॅलिस्ट युनियन' या पक्षाच्या मालकीची आहेत. एकपक्षीय हुकूमशाही असलेल्या या नासरशाहीतील वृत्तपत्रसृष्टीचे असे मत आहे, की भारत हा 'अत्यंत मागासलेला हिंदू देश' आहे. भारतात दुष्काळ पडल्याचे कळताच या वृत्तपत्रांचे वार्ताहर भारतात आले. त्यांपैकी एक अबदुल फत्त रिझ याने 'रोझ एल् युसीफ' या पत्रात भारतातील दुष्काळी स्थितीचे काय सुरेख वर्णन केले आहे! तो लिहितो–

"भारतातील राज्याराज्यांतले संबंध हे धार्मिक परंपरेनुसार आहेत. एका राज्यात लाखो लोक मरत असले, तरी शेजारच्या अधिक धान्य असलेल्या राज्यातून या

उपाशी शेजाऱ्याला काहीही मदत मिळत नाही; कारण काय तर या राज्यातले लोक हे कनिष्ठ जातीचे आहेत. बिहारचेच उदाहरण घ्या. इथले हिंदू हे कनिष्ठ प्रतीचे अशुद्ध हिंदू समजले जातात.

गंगा किनारी असलेल्या खेड्यांतील शेतकरी, गंगेचे पाणी कालव्यासाठी व शेतीसाठी वापरीत नाहीत, कारण मृत माणसांच्या रक्षा त्यात विसर्जन केलेल्या असल्याने, हे पाणी वापरण्यास धर्माची म्हणे अनुज्ञा नाही ! भारतातील दुष्काळात कुणी जगत–वाचत असतील तर ती कुत्री. मोठी व्यवहारी असतात ही ! ती नदीच्या काठी जातात व त्यात वाहून येणारी गाईची व माणसांची प्रेते ही कुत्री ओढून काढून खातात. यामुळे ही कुत्री मोठी अक्राळविक्राळ व भयंकर होतात. हातापायांच्या काड्या झालेली, पांढरी पडलेली स्त्रिया व मुले व मृत्यूची वाट पाहणारे वृद्ध, यांच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त भागात ही दांडगी कुत्री, पवित्र गाई आणि प्रेते पाहताना मनाला मोठ दुःख होते. "

भारताचे मित्र असल्याशिवाय का नासरच्या देशात आपल्या देशाविषयी हा कळवळा आढळतो ? अकाबाच्या आखातात म्हणूनच आपण नासरला मिठी मारलेली आहे. चिन्यांविरुद्ध आपली मुख्य मदार होती ती से–ला, घो–ला, बोमडि–ला, थाग–ला यांवर. ज्यूंविरुद्ध आपली मदार आहे ती 'छाग–ला' यांचेवर ! नासरच्या वतीने आपले हे ठाणे कसे शर्थीने झुंजत आहे ते लवकरच दिसेल !

## ☐ अबदु–ला !

शेख अबदुल्ला सुटणार ! कोडाईकॅनॉलच्या थंड हवेतून शेखसाहेब मुक्त होणार !! गृहमंत्री चव्हाण यांनी राज्यसभेत नुकतेच सांगितले की, मे १९६५ ते मार्च १९६७ पर्यंत शेखसाहेबांवर केवळ ५,६२,९९१ (पाच लाख बासष्ट हजार नऊशे एक्क्याण्णव) रुपये खर्च झाला. वरचे नये पैसे धरलेले नाहीत ! याचा अर्थ चालू महागाईत अब्दुल्लांवर सरकार केवळ रु. २८,०००/–महिन्याला खर्च करीत होते ! भारताचे हे २८२ वे संस्थान, इतक्या महागाईत, महिना कसा काढीत असेल कुणास ठाऊक ! गेल्या २०–२२ महिन्यांत शेखसाहेबांना दोन वेळचे नीट खायला तरी मिळत होते की नाही कुणास ठाऊक ? एवढ्या महागाईत काश्मीरच्या व मृदुला साराभाईच्या या 'कलिजा' ला फक्त महिन्याला २८०००/– रुपयेच ? ज़र शेखसाहेबांना आणखी काही महिने बंदिवासात ठेवण्याचा सरकारचा इरादा असेल तर शेखसाहेबांची होणारी उपासमार तरी सरकारने थांबवावी. महिना ५०,००० रुपय तरी या काश्मीरी कलिजावर खर्च करावे.

१ जुलैपासून भारतातील आणीबाणी फक्त सरहद्द राज्यांनाच लागू राहणार

[पृष्ठ ५२ वर]

# शिवसेना

## २

एकोणीस जून १९६६ रोजी मुंबईत शिवाजी पार्कवर एक अभूतपूर्व अशी सभा भरली होती. प्रचंड जनसागर त्या दिवशी शिवाजी पार्कवर जमला होता. कुणी म्हणत होते, गर्दी असेल तीन लाखांची, तर कुणी आपला अंदाज पाच लाखां-वर नेऊन ठेवीत होते. खरे म्हणजे नक्की अंदाज कुणालाच बांधता येत नव्हता.

आणि आश्चर्याची गोष्ट ही की कुणीही मोठा-मान्यवर नेता या सभेत बोला-यला येणार नसताना ही गर्दी जमली होती. उत्स्फूर्तपणे हे सारे लोक जमले होते. जी जी भाषणे या सभेत झाली ती ती सर्व या लोकांनी मोठ्या शांतपणे किंवा उत्सुकतेने ऐकली असेही नव्हे; किंबहुना भाषणे ऐकण्यासाठी त्या दिवशी मुंबईकर तिथे एवढ्या प्रचंड प्रमाणावर गोळा झालेच नव्हते. गोळा झालेले सर्व लोक मराठी होते. सभेच्या आयोजकांनी मुंबईतील मराठी लोकांच्या नाजूक मुद्यालाच हात घातला होता. आणि केवळ आपली भावना प्रकट करण्यासाठी ते लोक जमले होते. असंतोषाच्या नाडीवर अचूक बोट ठेवले असता असंतोष व्यक्त करणारांच्या मागे केवढी प्रचंड शक्ती उभी राहू शकते याचे ते ओझरते प्रदर्शन होते. ती शक्ती विस्कळीत होती. तिला आकार नव्हता. एक दिशा नव्हती. ती संघटित नव्हती. ते एक निव्वळ प्रदर्शन होते. पण ती जर कुशलपणे संघटित केली तर तिचे सामर्थ्य आणि क्षमता केवढी प्रचंड असेल या नुसत्या कल्पनेनेच डोळे फिरून जात होते.

शिवसेनेच्या उद्‌घाटनाचा तो मेळावा होता. शिवसेनेचा जन्म झाला तो असाच गडगडाटात. साप्ताहिक 'मार्मिक'चे संपादक श्री. बाळ ठाकरे यांनी कित्येक दिवसां-पासून मुंबईत मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आपल्या साप्ताहिकातून आवाज उठविण्याची एक चळवळच चालू केली होती. आपल्या पत्राच्या प्रत्येक अंकात ते या विषयांवर तिडीकेने लिहीत होते. अन्यायाची अनेक उदाहरणे ठळक-पणे मांडत होते. शिवसेनेची कल्पना प्रथम निघाली ती याच साप्ताहिकातून आणि 'मार्मिक' मधून केलेल्या केवळ एका आवाहनाने शिवाजी पार्कवर शिवसेनेच्या स्थापनेच्या निमित्ताने एवढी गर्दी जमली.

# "प्रांतीयतेचे हे प्रदर्शन डोळ्यांत अंजन घालणारे होते"

गेल्या वर्षभरात शिवसेनेने सर्वत्र बरीच प्रसिद्धी मिळविली. 'न्यूयॉर्क टाईम्स'-पासून 'प्रावदा'पर्यंत आणि भारतात मद्रासच्या 'हिंदू'पासून तो दिल्ली—कलकत्त्याच्या 'स्टेट्स्मन'पर्यंत सर्व वृत्तपत्रांना शिवसेनेची दखल घ्यावी लागली. विशेषतः, गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शिवसेनेने ज्या प्रकारे आपले मुंबईतील अस्तित्व जाणवून दिले त्यामुळे तर तिची दखल न घेणे अशक्यच होते. सर्वत्र कडूजहर टीकेची एकच झोड उठली.

अगदी थोडक्या अवधीत एवढी प्रचंड चळवळ निर्माण करणारी ही शिवसेना आहे तरी कशी?

शिवसेना ही संघटना नव्हेच. तो एक आविष्कार आहे. या आविष्काराला संघटनेचे स्वरूप अद्याप आलेले नाही. शिवसेनेच्या सभासदत्वाचा फॉर्म भरलेले सुमारे सव्वा लाख सभासद मुंबईत आहेत. शिवसेनेचे आकर्षण एवढे जबरदस्त होते की उद्घाटनाचा मेळावा भरविल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी दोन तासांत सभासदत्वासाठी छापलेले सर्व फॉर्म्स संपून गेले.

जो फॉर्म भरून देईल, त्या कुणालाही शिवसेनेचा सभासद होता येते. या प्रतिज्ञापत्रकामध्ये शिवसेनेच्या कचेरीकडून येणाऱ्या कोणत्याही आदेशाप्रमाणे काम करण्यास सज्ज राहील, अशा प्रतिज्ञेवर सभासदाला स्वाक्षरी करावी लागते आणि नाव, वय, पत्ता, शिक्षण, धंदा व राजकीय पक्ष यांची माहिती भरून द्यावी लागते. बस!

प्रतिज्ञापत्रकाबरोबरच 'शिवसेनेच्या सैनिकासाठी कर्तव्याची दिशा' सांगणारा एक कागदही दिला जातो. त्यामध्ये पुढील नियम शिवसैनिकाने पाळावेत असा आदेश असतो.

१. यापुढे मराठी माणसाने मराठी माणसाला पाण्यात पाहू नये. एकमेकांना मदत करावी. परस्परांनी आपला उत्कर्ष साधावा.

२. मराठी दुकानदारांकडून मराठी उत्पादकांच्याच मालाची खरेदी करावी. उत्पादक व दुकानदार यांनीही उलटपक्षी मराठी माणसाबद्दल सहृदयतेचे धोरण ठेवावे.

३. मराठी माणसांनी आपल्या जागा (घरे, दुकाने वा प्लॉटस्) परप्रांतीयांना विकू नयेत. विकल्यास शिवसैनिकाने त्याचे नाव, पत्ता 'शिवसेना' कचेरीला कळवावा.

४. मराठी अधिकाऱ्यांनी मराठी माणसांचीच नोकऱ्यांच्या जागी भरती करावी.

५. मराठी तरुणांनी उत्तम इंग्रजी शिकलेच पाहिजे. शॉर्टहॅन्ड, टायपिंग शिकावे. उत्तम स्टेनो म्हणून पुढे यावे. तसेच आजच निघणाऱ्या नवनवीन तांत्रिक कोर्सेसकडे जाण्याची धमक ठेवावी.

६. अंगचुकारपणा सोडावा. मिळेल तिथे जावे. मग तो हाऊसिंग गाळा असो वा नोकरी असो.

७. मराठी माणसाचे हित होईल याच दृष्टिकोनातून सर्व व्यवहार करावेत.

८. मराठी शाळा, संस्था, आश्रम, सांस्कृतिक कार्यक्रम यांनाच सक्रीय मदत करावी.

९. उडप्यांच्या हॉटेलांवर बहिष्कार टाकावा. स्वाभिमानी महाराष्ट्रीय मंडळींनी रस्त्यावर, फूटपाथवर विक्री करणाऱ्या परप्रांतीय उपऱ्या फेरीवाल्यांचा कसलाही माल खरेदी करू नये.

१० आपल्या माणसांना हॉटेल वगैरे धंद्यात पुढे आणण्याची व हीन न लेखण्याची बुद्धी बाणवावी.

११. आपल्या माणसाशी उद्धट व उर्मटपणाने वागू नये.

१२. मराठी माणसावर कुठे अन्याय झाल्यास संघटित आवाज उठवून त्याचा प्रतिकार करावा.

## बहुसंख्य सुशिक्षित

मुंबईतील शिवसैनिकांची निरखून पाहणी केल्यास एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते ती ही की, बहुतेक शिवसैनिक १६ ते २५ या वयोमर्यादेतील आहेत. दुसरे म्हणजे बहुसंख्य सैनिक शिक्षित आहेत. त्यांच्यामध्ये बेकार तरुणांपासून तो शाळा कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर्स, इंजिनियर्स, आर्किटेक्ट्स्, दुकानदार, कारखानदार, कारकून आदी सर्व थरांतील लोकांचा भरणा आहे. बहुसंख्याच बघायची झाली तर ती शिक्षितांची आहे. मी पाहिलेले कडवे शिवसैनिक हे सारे चांगले शिक्षितच होते. शिवसेनेच्या उघड धोरणांमध्ये कम्युनिस्ट विरोधाशिवाय दुसरा कुठलाही राजकीय रंग नाही. बहुतेक शिवसैनिकही कोणतीही पक्षनिष्ठा नसलेले दिसले. बरेचजण मात्र कडवे कम्युनिस्टविरोधी किंवा कम्युनिस्ट द्वेष्टे आहेत. काही कम्युनिस्ट तरुणांशी मी बोललो. शिवसेनेच्या एकूण धोरणांबद्दल त्यांना थोडीशी सहानुभूती असली तरी त्यांच्या कम्युनिस्ट द्वेषामुळे ते कडवे शिवसेनाविरोधी बनल्याचे दिसले.

तरुण शिवसैनिक बनतात ते बहुतेक त्यांच्या स्वतःवर काही अन्याय झाल्याने किंवा आजूबाजूचा अन्याय पाहून पोटतिडिकीने. सुरुवातीला शिवसैनिक बनले ते उत्स्फूर्ततेने, मुंबईत होत असलेली मराठी माणसाची पीछेहाट बघून किंवा मुंबईतील दक्षिण भारतीयांची गटबाजी सहन न होऊन किंवा झोपडपट्ट्यांमधील परप्रांतीयांच्या कारवायांची झळ लागून.

शिवसेनेशी सहमत नसलेला पण एकूण गाऱ्हाणी पटत असलेला एक डाव्या विचारसरणीचा तरुण नुकताच शिवसैनिक बनला. इतके दिवस तो शिवसेनेला विरोध करीत होता. एके दिवशी चर्चगेटवर बुटाला पॉलिश करून घेताना पॉलिशवाल्याने बनवले आणि त्याला अडीच रुपये मागितले. मारामारीची पाळी आली. पॉलिशवाले सगळे केरळी होते. त्याला शेवटी झक मारून अडीच रुपये काढून द्यावेच लागले. तेव्हापासून घराबाहेर बुटाला पॉलिश करावयाचे नाही असा कानाला खडा तर त्याने लावलाच पण त्याच दिवशी तो कडवा शिवसैनिक बनला.

दुसरा एक शिवसेनेचा कट्टर विरोधक शिवसैनिक का बनला याची हकीकत त्यानेच मला सांगितली. 'उपऱ्यांवर' बहिष्कार टाकणे, दक्षिण भारतीयांचा द्वेष करणे वगैरे गोष्टी त्याला मान्य नव्हत्या. शिवसेना प्रांतीयतेचे विष फैलावीत आहे असे त्याला वाटत होते. एकूणच जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन मानवतावादाचा होता. अजूनही आहे. बरेच दक्षिण भारतीय त्याचे मित्र आहेत.

पण केवळ एका प्रसंगाने त्याचा शिवसेनेविषयीचा विरोध मावळला. तो ज्या इंग्रजी वृत्तपत्राच्या कचेरीत काम करीत होता तिथले बहुसंख्य कर्मचारी दक्षिण भारतीय. दिल्लीत पोलिसांचा संप चालू झाला. वातावरण तंग होते. अशा वेळी दूरमुद्रकावरून रात्री त्या कचेरीत एक बातमी आली, "केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल. चव्हाणांचा राजीनामा."

ती बातमी येताच त्या कचेरीतील साऱ्या दक्षिण भारतीयांच्या हर्षाला पारावार उरला नाही. चव्हाण गेले, चव्हाण गेले, म्हणून त्यांनी हस्तांदोलने केली, मिठ्या मारल्या आणि तत्काळ कॅन्टीनमधून चहा मागवला. पण हा त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. काही वेळातच बातमी चुकीची असल्याची दुरुस्ती आली आणि त्यांचे चेहरे पडले.

**या साऱ्या प्रकाराने त्या गृहस्थाला भयंकर वैताग आला. तो म्हणतो, "प्रांतीयतेचे हे प्रदर्शन डोळ्यात अंजन घालणारे होते. ते लोक जर एवढी गटबाजी करीत असतील, आपल्याला एवढे पाण्यात पाहत असतील तर मग आपणही आपले अस्तित्व टिकवण्यालाही तोडीस तोड म्हणून आवश्यक तेवढी प्रांतीयता टिकवलीच पाहिजे. नाहीतर आपण मरून जाऊ. हा व्यवहार आहे." दुसरेच दिवशी या गृहस्थाने शिवसेनेचे प्रतिज्ञापत्रक भरून काढले.**

असे मुंबईतील कितीतरी मराठी कारकून आणि नौकरदार वेगवेगळया निमित्तांनी आणि प्रसंगांनी शिवसैनिक बनले आहेत. एक ख्रिश्चन तरुण कट्टर शिवसैनिक असलेला दिसला. त्याचे पुष्कळ ख्रिश्चन दोस्त शिवसैनिक असल्याचे त्याने सांगितले. मुंबईच्या उपनगरातील एका महाविद्यालयाच्या मराठी प्राध्यापकाने सांगितले, " मुंबई आणि पुणे दोन्ही विद्यापीठे सध्या दक्षिण भारतीय विद्वान कॅप्चर करीत आहेत. या विद्यापीठामधील दक्षिण भारतीय विद्यार्थ्यांचीही संख्या वाढते आहे. महाराष्ट्रातील ही दोनच विद्यापीठे प्रतिष्ठेची आहेत. इतर विद्यापीठे जवळ जवळ ग्रामीण आणि त्यांतून बाहेर पडणारे पदवीधर तुलनेने निकृष्ट असतात. दक्षिण भारतीयांचे आमच्या दोन विद्यापीठांवरचे आक्रमण तसेच चालू राहिले तर आमची सबंध नवी सुशिक्षित पिढी गारद होईल." हे प्राध्यापक स्वत: शिवसैनिक नसले तरी शिवसेनेला त्यांचा भरघोस पाठिंबा आहे.

## मेनन यांचे पाठीराखे

गेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मेनन-बर्वे आणि मेनन–सप्रे या लढतीमध्ये शिवसेनेने मोठी कामगिरी बजावली. आणि या निवडणुकीनंतर अनेक लोक जे शिवसेनेला कडाक्याचा विरोध करीत होते–शिवसेनेच्या बाजूने जरी नाही तरी शिवसेनेला एवढा कडवा विरोध करीनासे झाले, याला कारण एकच. ईशान्य मुंबई मतदार संघांतील दक्षिण भारतीयांची गटबाजी. पूर्वी मेनन काँग्रेसमध्ये होते, तेव्हा एकजात सर्व दक्षिण भारतीयांची मते मेननना जात. मेनननी काँग्रेस सोडली त्याबरोबर मुंबईतील सर्व दक्षिण भारतीयांची मते फिरली. " या लोकांना काही पक्षनिष्ठा आहे की नाही ?" काँग्रेसला भाविकपणे मते देणाऱ्या एका मराठी मुंबईकराने मला विचारले, " यांची निष्ठा आपल्या प्रांतातल्या माणसावरच असते. मग तो कुठल्याही पक्षाचा असो. त्याशिवाय मेननने पक्ष बदलल्याबरोबर एकजात सर्व दक्षिण भारतीयांची मते मेननबरोबर जाती ना !"

मुंबईतील दक्षिण भारतीयांच्या प्रांतीयतेचे हे असे उघड प्रदर्शन या निवडणुकीत झाले. त्यामुळे शिवसेनेच्या दक्षिण भारतीयांवरील रागाचे कारण बरेच स्पष्ट झाले. शिवसेनेचा आणि शिवसैनिकांचा दक्षिण भारतीयांवर रोष होण्याला अशीच कारणे जबाबदार आहे. झोपडपट्ट्यांमधील गुंडगिरी, कचेऱ्यांमधील गटबाजी, निवडणुकीतील प्रांतीयता या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या आणि त्यांची झळ लागली की स्वत:ला मानवतावादी समजणारेदेखील घसरू लागतात. आणि दक्षिण भारतीयांचा एकजात म्हणून द्वेष करू लागतात. एकदा ही अढी बसली की चांगली समंजस वाटणारी माणसे, त्यांची संस्कृती, त्यांचा वेष, त्यांची भाषा, त्यांचे बोलणे, त्यांचे वागणे यांचा मनापासून तिरस्कार करू लागतात. दक्षिण भारतीय पाहिला की यांच्या डोक्यात सणक उठते. जर्मनीमध्ये चांगली समंजस आणि बुद्धीवादी माणसेही ज्यूंचा तिरस्कार करायला शिकली होती.

समंजस बुद्धिवाद्यांची ही कथा तर सामान्य मडक्या डोक्याच्या तरुणांची काय अवस्था होत असेल ! म्हणूनच मारामाऱ्या होतात. आणि कधी क्वचित एखाद्या उडुपी दुकानावर दगडफेक होते. परंतु या हिंसक कृत्यांची तेवढीच जबाबदारी दक्षिण भारतीयांचीही असते. जशास तसे म्हणून या दक्षिण भारतीय गुंडांशी मारामारी करायला मराठी सुशिक्षित तरुण तयार होतात. अगोदरपासून होत आलेली मराठी गुंडांची आणि दक्षिण भारतीय गुंडांची भांडणे आता शिवसेनेच्या नावावर खपविण्यात येतात. शीव, विक्रोळी, चेंबूर इत्यादी ठिकाणच्या कुप्रसिद्ध झोपडपट्ट्यांमधून हिंडून पाहिले तर दक्षिण भारतीय गुंडांचे दादागिरीचे धंदे किती जोरात चालतात हे दिसून येते. त्यांच्या आपापसांतील मारामाऱ्या-जाळपोळीदेखील शिवसेनेच्या नावावर खपविल्या जातात. स्थानिक लोकांशी भांडताना मात्र हे लोक एक होतात. त्यामुळे आता दादागिरी करणारे मराठी लोकही शहाणे आणि संघटित झालेले आहेत. आणि आता ते स्वतःही शिवसेनेच्या नावाखाली भांडणामध्ये मराठी माणसांच्या मागे उभे राहतात.

शिवसेना ही खऱ्या अर्थाने संघटित नाही म्हणून कोणतेही कृत्य तिच्या नावावर खपविता येते आणि कोणत्याही कृत्यापासून शिवसेनेला मोकळे होता येते. सध्याचे शिवसेनेचे स्वरूप अत्यंत अस्पष्ट आणि संदिग्ध असे आहे. शिवसेनाप्रमुख श्री. बाळ ठाकरे, शाखाप्रमुख आणि सभासद अशी साधी या सेनेची सध्याची रचना आहे. सुरुवातीला सांगितलेली कर्तव्ये शिवसैनिकाने पाळायची, शाखा-प्रमुखाने त्यांना मार्गदर्शन करायचे आणि त्यांनी सेनाप्रमुखांकडून मार्गदर्शन घ्यायचे. शिवसेना निर्माण होण्याअगोदर श्री. ठाकरे यांच्याभोवती कुणी नव्हते. एकदा शिवसेना जाहीर करताच तरुण-तरुण मंडळी जमा झाली. त्यांच्यांतूनच शाखाप्रमुख निर्माण झाले. शिवसेनेच्या औपचारिक सभा वगैरे साधारणतः कधी होत नाहीत. 'मार्मिक'-मधून दिले गेलेले आदेश शिवसेनेचे आदेश समजले जातात. शाखेच्याही सभा अशा भरत नाहीत. मी पाहिलेले शाखाप्रमुख पदवीधर, दुहेरी पदवीधर असे होते. मुंबईत शिवसेनेच्या ८० शाखा आहेत. आणि मुंबईबाहेर १५ च्या जवळपास शाखा आहेत. "शिवसेनेला सुरुवात झाली तेव्हा 'मार्मिक' वाचून सेनेत भरती होण्यासाठी असंख्य लोक शाखाप्रमुखांकडे येत. आताही नवीन शाखा काढली की, इतके लोक भरती होण्यासाठी येतात की शाखाप्रमुखाला नकोसे होते," शिवसेनेचे लोक सांगतात.

'मार्मिक' साप्ताहिकाची कचेरी म्हणजेच शिवसेनेची प्रमुख कचेरी. आत शिवाजीचा एक अर्धपुतळा आहे. नोकऱ्या लावून देणे, कारखानदारीची माहिती देणे, धंद्यांची माहिती देणे आदी कामे येथून कशी होतात याची माहिती पुढे येईलच. मी गेलो त्या दिवशी मुंबईतील लेडी हार्डिंग्ज रोडवरील इलाविया इमारत कोसळून पडली होती. आपद्ग्रस्तांना मदत करणे, त्यांच्या निवाऱ्याची सोय करणे आदी

कामे शिवसेनेतर्फे चालू होती. " कुठल्याही संकटाच्या वेळी आम्ही असेच धावून जात असतो, " असे शिवसेनेचे प्रमुख कार्यकर्त्यांपैकी एक श्री. विनय वागळे यांनी मला सांगितले. शिवसेनेसाठी अहर्निश झटणारे अनेक तरुण कार्यकर्ते आहेत त्यांपैकी श्री. वागळे एक आहेत. मुंबईत त्यांचे एक छोटे वर्कशॉप आहे. दिवसाचा बराचसा वेळ ते शिवसेनेसाठी देतात. बेकार तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी मदत करणे, कारखाने, वर्कशॉप्स, धंदे, दुकाने काढण्यासाठी सल्ला देणे अशा गोष्टी ते करतात. त्यांच्याचप्रमाणे बरेच तरुण आपापल्या नोकऱ्या सांभाळून किंवा काही तर सोडूनही शिवसेनेचे काम करतात.

## बेकारांना काम

अशा प्रकारे शिवसेनेने आतापर्यंत हजार एक मराठी तरुणांना नोकऱ्या मिळवून दिल्या आहेत. सध्यापुरते त्यांनी हे काम बंद केले आहे. कारण नोकऱ्या मागणाऱ्या बेकारांचा फारच त्रास होऊ लागला. दुसरे कोठलेच काम होईनासे झाले. तसेच शिवसेनेच्या वर्गणीच्या फंडातून अनेकांना शिवसेनेने छोटे धंदे काढून दिले आहेत. दक्षिण भारतीय फूटपाथवर बेकायदा दुकाने टाकतात ! मग मराठी लोकांनीही टाकून त्यांच्याशी स्पर्धा करायला हरकत नाही. पोलिसांना ही दुकाने उखडायचीच असतील तर दोघांचीही उखडतील. कितीतरी रिकामटेकड्या मराठी पोरांना असे छोटे धंदे करायला लावून शिवसेनेने मार्गी लावले. पूर्वी रस्त्यावर नुसती टवाळकी आणि मारामाऱ्या करणे हाच ज्यांचा धंदा होता, अशा मराठी मुलांना रस्त्यांवर फेरीवाल्यांचा धंदा करायला उत्तेजन दिले. अशा काही मुलांना मी भेटलो. फूटपाथ-वर कटपीस कापडांचा गाळा टाकताच दिवसाला अडीचशे रुपयांचा गल्ला जमू लागला. भाजीचा धंदा टाकताच दिवसाला ६०–७५ रुपये नफा पदरात पडू लागला. आणि मुले उद्योगी बनली. एक मुलगा म्हणाला, " मागचं आम्ही विसरलो. शिव-सेनेने आम्हांला धंद्याला लावलं. नाहीतर आम्ही वाया गेलो होतो. " आणि अशी मुले मग जेव्हा हाक येईल तेव्हा शिवसेनेसाठी पुढे येतात.

याशिवाय मेणबत्त्या बनविणे, बांगड्या बनविणे, काचेची खेळणी बनविणे अशा ११२ छोट्या उद्योगांसंबंधी संपूर्ण माहिती देणारी पत्रके काढावयास शिवसेनेने सुरुवात केली आहे. ज्यांना गरज आहे आणि धंदा काढायची उत्सुकता आहे अशांना ही पत्रके मोफत वाटली जातात.

आणखी बऱ्याच योजना आहेत. ठिकठिकाणी सेल्फ हेल्थ सेंटर्स काढण, शेड्स टाकून छोट्या उद्योगधंद्यांचे मराठी तरुणांना प्रशिक्षण देणे अशा योजना आखणे चालू आहे. परंतु या योजनांना नक्की आकार आलेला नाही; किंबहुना काही शिवसैनिक कार्यकर्त्यांच्या कल्पनेतच या योजना अद्याप पडून आहेत. आणि कुण्या जाणकार व्यक्तीच्या मार्गदर्शनाची वाट पाहत आहेत.

शिवसेनेच्या या विधायक कार्याची मुद्दाम आधीच माहिती सांगितली ती अशासाठी की पूर्ण माहिती झाल्याशिवाय शिवसेनेच्या भूमिकेविषयी कुणाचा गैरसमज होऊ नये म्हणून शिवसेनेच्या या बाजूला विशेष प्रसिद्धी मिळाली नाही. याची कारणे अनेक. एक तर मुद्दामच त्रास होऊ नये, पुरेशी तयारी झाल्याशिवाय लोकांचा लकडा मागे लागू नये म्हणून स्वत: शिवसेनेनेच या बाजूला विशेष प्रसिद्धी दिली नाही. दुसरे म्हणजे मुंबईतील बहुतेक वृत्तपत्रे दक्षिण भारतीयांच्या ताब्यात आहेत आणि शिवसेनेचा मुख्य रोख दक्षिण भारतीयांवरच असल्याने या वृत्तपत्रांतून शिवसेनेच्या विरुद्धच अधिक प्रचार होत गेला. आणि मुख्य म्हणजे शिवसेनेची ही कामे संघटितपणे होत नाहीत. या कामांना भरीव असे संघटित स्वरूप अद्याप नाही.

शिवसेनेत काम करणारे कार्यकर्ते अतिशय तरुण आणि उत्साही आहेत. मुंबईतील मराठी माणसाच्या उन्नतीसाठी अंग मोडून झटण्याची जिद्द त्यांच्या अंगी आहे. पण त्यांना आपल्या कामाची दिशाच अद्याप सापडलेली दिसत नाही. त्यामुळे ही विधायक म्हटली जाऊ शकतील अशी कामे अप्रगल्भ वृत्तीने चालू आहेत. शिवसेनेचा हा उत्साह आणि हे चैतन्य विरून जाऊन त्याला भलतेच वळण लागण्याअगोदर तिच्यासमोर काही भरीव योजना आल्या पाहिजेत आणि त्या अंमलात आणतील अशा कार्यकर्त्यांची जोड त्यांना मिळाली पाहिजे.

मुंबईतील मराठी लोकांमध्ये शिवसेनेने खरोखरच एक प्रकारचे चैतन्य निर्माण केले आहे. कोणी कितीही शिव्या देवोत, मुंबईतील मराठी माणसांत जागृती घडवून आणण्याचे कार्य शिवसेनेने निश्चतपणे केलेले आहे. शिवसेनेचे कट्टर विरोधकही मुंबईतील मराठी माणसांच्या पीछेहाटीच्या कारणांची चर्चा करताहेत आणि त्यावर तोडगे सुचवीत आहेत. पूर्वी या पीछेहाटीचीही चर्चा होत नव्हती. निदान या प्रश्नाची जाणीव तरी शिवसेनेने निर्माण करून दिली आहे.

नाण्याला दोन बाजू असतात. मराठी माणसांत चैतन्याचे वातावरण निर्माण होत असतानाच मुंबईतील बिगर मराठी लोकांमध्य शिवसेनेने थोडे संभ्रमाचे, गोंधळाचे, भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. आणि खुद्द मराठी लोकांतच शिवसेनेच्या राजकीय आणि सामाजिक भूमिकांविषयी कडाक्याची भांडणे लागत आहेत. दक्षिण भारतीय शिवसेनेविषयी आणि एकूणच मराठी लोकांविषयी कडू बोलू लागले आहेत तर मुंबईतील गुजराती वचकून वागू लागले आहेत. शिवसेनेविषयी बोलायचे झाले तरी ते अतिशय सावधगिरीने दबल्या आवाजात बोलतात. शिवसेनेने लावलेले भित्तीपत्रके फाडून टाकण्याची कुणाची हिंमत होत नाही. महिनेन् महिने ती तशीच राहतात. शिवसेनेचा मोर्चा निघाला की रस्त्यावरची उडुपी दुकाने बंद होतात. नाण्याची दुसरी बाजूही तपासून घेतलीच पाहिजे. निरनिराळे लोक शिवसेनेविषयी काय बोलतात आणि त्यांत तथ्य कितपत आहे हे तपासून पाहिले पाहिजे...

(अपूर्ण)

## हरवला आहे

एक पक्षी या झाडावरून
उडाला आहे
पाहिला आहे का कुणी ?
हिमधवल पिसाऱ्याचा
निळे डोळे, गुलाबी पावलांचा
बसला होता इथेच
इतके दिवस
वादळवाऱ्यांनी झाड
ओरबाडलं तेव्हा
बिजलीच्या किंकाळीनं
आसमंत हादरलं तेव्हाही
बसला होता
याच फांदीला घट्ट धरून
शुष्क, सुरकुतल्या फांद्यांवरून
फिरत होता डोलात पिसारा फुगवून...
आणि
आता
वसंताच्या चाहुलीनं
झाड पानोपानी बहरलंय्
फुलाफुलांनी डवरलंय्
छानसं घरटं बांधलंय्
त्याचप्रासाठी
पण—
तोच बेटा निसटलाय्
पाहिलाय् काय कुणी ?

—आशा भाजेकर

## एक कविता

तुलाच केवळ कशी कळेना
अंधाराची ओढ कलंदर

निळ्या उन्हाची अशब्द तगमग
सावलीत रेखाया नवखी नक्षी गुलाबी
आसुसलेले डहाळीभवती चंद्रकवडसे
लाटांमधुनी कुरवाळीत किरणांचे लाघव

खोल जळाचे पिसाटलेपण
उधान भरती.

कसे कळेना, तुलाच केवळ कसे कळेना
क्षितिजातील रंगाचे पागल व्याकुळ वादळ

तुझ्याच एका शब्दाखातर अवकाशाभर
पदर जिवाचा पसरून जगतो तिमीर केवळ

कशी कळेना या वाऱ्याची हिरवी भाषा
पानोपानी हुरहुरणारी आतूर थरथर

नसानसांचा टाहो घेऊन भिरभिरणारा
झपाटलेल्या श्वासांचा मम संचित दर्वळ

कसे कळेना,
कसे कळेना तुलाच केवळ

तुझ्याचसाठी ओसरणारा
मी माझ्या प्राणांचा
हिरवा नवथर मोहोर...

—यशवन्त मनोहर

# आस्वाद



'एक पक्षी हरवला आहे' ही आशा माजेकर यांनी काहीशी मुक्तछंदात लिहिलेली कविता गोचरवर्णन पद्धतीचा सुंदर नमुना म्हणता येईल. जे सांगायचे आहे त्याचे प्रत्यक्ष चित्र डोळ्यांपुढे उभे करायचे, इतक्या प्रभावीपणाने की रंग-रेषांत कागदावर ते रेखाटता येईल. या कवितेचे खरे सौंदर्य हेच आहे. हा पक्षी कोण ? प्रेमिक की जीवनाबद्दल वाटणारे स्वारस्य ? काहीही असले तरी आपणच बांधलेले घरटे विसरून कुठेतरी अफाट दुनियेत भटकणारा पक्षी विलक्षण तर खराच ! जेव्हा वादळ होते तेव्हा हा पक्षी दिसत होता, स्तब्ध बसून होता. प्रेमाचे असेच असते का ? कित्येकदा सुखच त्याला मानवत नाही. सुखाचे दिवस आले की ते अंतर्धान पावते. हा एक दैव-दुर्विलासच म्हणावा लागेल. एक प्रतीक मोठ्या रेखीवपणाने वापरून कवयित्रीने एक व्यथा चांगली रंगविली आहे.

बाहेरच्या सृष्टीचे स्वरूप नीट ध्यानात येत नसेल तर आतल्या सृष्टीचे रंगतरंग कसे उमजणार ? किरणांचे लाघव लक्षात आले नाही तर प्रेमिकांच्या मना-तला मोहोर कोण कसा पाहू शकणार ? यशवंत मनोहर यांच्या 'एक कविते'त हीच व्यथा रंगविलेली दिसते. अष्टमात्रिक गणांच्या लांब आखूड ओळींची रचना बरी आहे. पण काही ठिकाणी रंधा मारणे जरूर होते. पागल आणि व्याकुळ एक-मेकांना खेटून बसलेले फारसे शोभून दिसत नाहीत; पण कवितेची झेप, गती चांगली आहे. आणि लांब क्षितिजावरून निघून अंतर्मनापर्यंत कल्पनेने केलेला प्रवास आणि त्यात मधून भेटणारी निसर्गदृश्ये रमणीय वाटतात.

—गोपीनाथ तळवलकर



"सध्या आपला गंगाराम या इथे... माझ्या मागच्या खोलीत...त्याला कसा लपवून ठेवायचा हाच प्रश्न..."

"काय? गंगाराम इथं..."

त्या दिवशी बऱ्याच वर्षानंतर एकनाथ मला भेटायला आला होता. पुण्याहून मुंबईला आल्यानंतर तो मला भेटल्याशिवाय कधीही राहत नसे. एकाच इंग्रजी शाळेत आणि एकाच कॉलेजमध्ये आम्ही दोघं शिकलो. पुढे बी. ए. झाल्यावर मी सरकारी नोकरी पत्करली तर एल-एल. बी. होऊन त्यानं वकिली सुरू केली. स्वतंत्र व्यवसायामुळे, देशसेवा करायला तो मोकळा होता. आणि मी सरकारी नोकरीच्या साखळीला करकचून बांधला गेलो.

बेचाळीसच्या 'चले जाव' चळवळीमध्ये एकनाथने प्रामुख्याने भाग घेतला होता. त्यामुळेच त्या चळवळीतल्या सरस,

# प्रेयसी

प्र. तु. दिघे

सुरस आणि चमत्कारिक गोष्टी कथन करीत असताना तो फार रंगून जात असे. त्या दिवशी चहा पिता पिता अशाच आमच्या गोष्टी सुरू झाल्या. चहामध्ये साखर जरा कमी पडली होती. त्याला उद्देशून एकनाथ म्हणाला,

" ए साहेबा, तुला साखरेहून गोड अशी एक बेचाळीसच्या चळवळीतली गोष्ट सांगू का ?"

गोष्ट सांगणारा तयार झाल्यावर ऐकणाराचे कान काय दुखणार आहेत थोडेच...?

" त्याचं असं झालं " एकनाथने सिगरेट शिलगावली आणि तो सांगू लागला, " त्या वेळी आमच्या पक्षनेत्याच्या आदेशावरून बेलापूरच्या भागातली साखर कामगारांची संघटना मजबूत करण्यासाठी गेलो होतो. आमच्या पक्षाचे इतर सभासद इतर कोणती तरी कामगिरी पार पाडीत होते. आणि म्हणूनच मी तिथे साखर कामगार पुढारी म्हणून ओळखला जाऊ लागलो. हेतू असा की, पोलिस खात्यानं आपलं सारं लक्ष माझ्यावर केंद्रित करावं. कारण माझ्या दुसऱ्या सहकाऱ्यांना संघटना मजबूत करण्याचं कार्य अधिक सुकरतेनं करता येणार होतं. परंतु मी त्या प्रकारचं काम करीत असताना, आमच्या नेत्यानं एक दिवस माझ्यावर फार जोखमीची कामगिरी टाकली. पक्षनेत्याचा तातडीचा आदेश आला होता की, असशील तसा...असशील तेथून ताबडतोब निघून ये.

हातातलं काम अर्धवट टाकून तसाच तिथून निघालो आणि मुंबईला येऊन शिवाजी पार्कजवळच्या इमारतीमध्ये आमच्या पक्षनेत्याची लपून छपून भेट घेतली. कारण पोलिस जितके माझ्या पाळतीवर होते, त्यापेक्षा अधिक आमच्या पक्षनेत्याच्या पाळतीवर होते. त्या इमारतीमध्ये मद्रदेशीय लोकांचाच अधिक भरणा होता. म्हणून मी लुंगी अडकवली. शर्ट घातला, एक छोटा टॉवेल अंगावर टाकला

आणि अनवाणी पायांनीच मी आमच्या पक्षनेत्याच्या भेटीला गेलो होतो. पक्षनेत्याला बेलापूरच्या माझ्या कामगिरीचा मी सारा वृत्तांत सांगितला. त्यावर त्यांनी समाधान व्यक्त केले. माझ्या तिथल्या कामगिरीचे माझ्या इतर सहकाऱ्यांनी त्यांना दिलेले ' रिपोर्ट ' ऐकल्यावर, त्यांनी माझ्यावर अधिक जबाबदारीची एक कामगिरी टाकण्याची योजना आखली होती. माझी भेट झाल्यावर ते सांगू लागले—

" एकनाथ, सध्या मी एक मोठ्या काळजीत आहे. आणि त्या काळजीचं ओझं माझ्या डोक्यावर असल्यामुळे सध्या मला दुसरं-तिसरं काही सुचत नाही. मला वाटते की माझी ती काळजी तू दूर करू शकशील. ती कामगिरी व्यवस्थितपणे पार पाडू शकेल असा दुसरा कोणी साथी आज नजरेसमोर येत नाही. मग काय ? तू घेतोस का ती जबाबदारी आपल्या अंगावर...? "

ती अवघड कामगिरी मी आपल्या अंगावर घेण्याचे कबूल केल्यानंतर, ते मला सांगू लागले,

" कामगिरी फार बिकट आहे. फार जोखमीची आहे. सावधपणा...! अतिशय सावधपणा बाळगला तरच ते काम पार पडू शकेल. हो ! नुसताच सावधपणा उपयोगी नाही, त्याबरोबर समयसूचकतादेखील हवी. योग्य वेळी योग्य ती गोष्ट केली नाहीस तर प्रकरण तुझ्याच अंगावर बेतेल ही गोष्ट तू पक्की लक्षात ठेव. हं ...ऐक. भुसावळच्या बाजूला आपल्या सहकाऱ्यांनी एक ' मेलगाडी ' उलथून पाडली...ती गोष्ट तुला ठाऊक असेलच..."

त्यावर मी म्हणालो, " वा ! ती महत्त्वाची गोष्ट कशी मला ठाऊक नसणार ? ती मेलगाडी उलथून पाडण्यामध्ये आपल्या गंगारामनं फार मोठा हातभार लावला, ही गोष्टदेखील मला चांगली ठाऊक आहे. "

त्यावर पक्षनेते गंभीर बनले आणि सांगू लागले,

" ठीक ! म्हणजे ज्या गोष्टी तुला ठाऊक असण्याची जरुरी नव्हती, त्या गोष्टीदेखील तुला ठाऊक आहेत तर...असो ! आता असं बघ...त्या मेलगाडी पाडण्याच्या कटाचे धागेदोरे बऱ्याचशा प्रमाणांत सरकारच्या हातामध्ये सापडले आहेत. आणि आपला गंगाराम...ह्याला त्या कटाचा आरोपी नंबर एक ठरवण्यात आला आहे. गंगारामचा आजचा ठावठिकाणा पोलिसला सांगणाऱ्याला सरकारनं फार मोठं इनाम जाहीर केलं आहे. "

त्यावर मी म्हणालो,

" हो...हो...हे सारं वृत्तपत्रांत वाचलंय मी. पण आपला गंगाराम सध्या आहे तरी कुठे ? "

त्यावर पक्षनेते अधिकच गंभीर झाले आणि म्हणाले, " एकनाथ...हळू बोल. आणि ऐक. सध्या आपला गंगाराम माझ्याजवळ ह्या इथं ह्या मागच्या खोलीत आहे...त्याला इथं कसा लपवून ठेवायचा आणि मी ह्या इथं कसं काय लपून

राहायचं हाच माझ्यापुढं मोठा थोरला प्रश्न आहे."

त्यांच्या त्या बातमीनं मला धक्का दिला... "काय ? काय म्हणता ? गंगाराम ह्या इथं ? इथल्या मागच्या खोलीत ? पण गंगारामला लपवून ठेवणाऱ्याला किंवा मदत करणाऱ्यालादेखील सरकारनं फार मोठी शिक्षा जाहीर केली आहे."

पक्षनेते त्यावर शांतपणे म्हणाले–

"अरे, फार मोठी शिक्षा जाहीर केली म्हणून तर त्याला लपवण्याची कामगिरी कुणावर सोपवावी हा माझ्यापुढे प्रश्न आहे...पण आता तू भेटल्यावर तो प्रश्न सुटला आहे एकनाथ...मला असं वाटतं की गंगारामला घेऊन तू बेलापूरला जावंस आणि त्या तिथल्या भागातच तू त्याला लपवून ठेवावास. साखर कामगार पुढारी म्हणून पोलीस डोळ्यांत तेल घालून तुझ्यावर खडा पहारा करीत असतील. परंतु तुझ्याबरोबर राहणाऱ्यांवर त्यांची तशी नजर नसणार. खरं की नाही ?"

त्यावर मी कबुली दिली–

"हो, खरं आहे तुमचं म्हणणं. कारण, माझ्या खोलीवर नेहमी कुणी ना कुणी कामगार राहतच असतो आणि शिवाय माझ्या खोलीवर एकच असा माणूस कायमचा काही राहत नाही..."

पुन्हा पक्षनेते विचारू लागले–

"पण काय रे एकनाथ, ही अवघड कामगिरी आपल्या अंगावर घ्यायला तू तयार आहेस का ? लक्षात ठेव की गंगाराम जर तुझ्या खोलीवर पकडला गेला तर त्याच्याबरोबर त्याला मदत केल्याच्या आरोपावरून तुलादेखील चांगलीच शिक्षा ठोठावली जाईल..."

मी तितक्याच धीमेपणाने उत्तर दिलं–

"कुणीतरी ही अवघड कामगिरी आपल्या अंगावर घ्यायला हवीच. आणि शिवाय त्याला लपवल्यामुळे आपल्या पक्षाचं केवढं मोठं कार्य होणार आहे ! मग मीच ती कामगिरी आपल्या अंगावर का घेऊ नये ? तुम्ही त्याला आताच माझ्याबरोबर पाठवा. त्याला मी माझ्या खोलीवर नीट लपवून ठेवीन...तुम्ही मुळीसुद्धा आता गंगारामची काळजी करू नका."

माझ्या ह्या आश्वासनामुळं आमच्या नेत्याला फारच समाधान वाटलं ! त्यामुळे त्यांची एका काळजीतून मुक्तता झाली होती. शिवाय गंगारामसाठी एवढ्या मोठ्या चळवळीच्या नेत्यानं स्वतःला असं धोक्यात घालून घेणं मला इष्ट वाटलं नाही, म्हणूनच गंगारामची जोखीम मी आपल्या अंगावर घेतली. म्हणतात ना, लाख पकडले तरी पर्वा नाही परंतु लाखांचा पुढारी पकडला जाता कामा नये. तसं झालं तर चळवळीची नाडीच एकदम आणि कायमची बंद व्हायची.

आणि मग भरपूर वेषांतर करून, पोलिस खात्याला नाना प्रकारच्या हुलकावण्या देत देत मी गंगारामला घेऊन कसाबसा माझ्या बेलापूरच्या खोलीवर पोचलो.

पुन्हा मी आपल्या कामगारांच्या कामाकडे लक्ष पुरवू लागलो. गंगाराम आला, माझ्या खोलीवर राहू लागला. पोलिस खात्याला त्याच्याबद्दल संशय येईनासा झाला आणि तो निर्धास्तपणे राहू लागला. साखर कामगारांच्या चळवळीला मी वाहून घेतलं आहे, असं दाखवल्यामुळं पोलिस खात्यानं माझ्या सार्वजनिक हालचालींकडे अगदी डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवलं होतं. पण त्याची मला पर्वा नव्हती. एका गोष्टीबद्दल मला विशेष समाधान वाटत होतं आणि ती गोष्ट म्हणजे गंगारामला मी पोलिसांच्या जाळ्यात सापडू दिलं नव्हतं. मधून मधून गंगाराम आमच्या दोन–चार दुसऱ्या सहकाऱ्यांकडे दूरच्या गावाला जाऊन येत असे. पण त्या त्याच्या हालचालींकडे आता कुणाचंच लक्ष नव्हतं.

परंतु एक दिवस मला धक्का देणारी घटना घडून आली. एका साखर कामगाराचं गाऱ्हाणं ऐकत, मी आपल्या खोलीतच बसलो होतो. इतक्यात कुणाच्या तरी बुटांच्या टापांचा आवाज ऐकू आला, म्हणून मी दाराकडे नजर टाकली, तो काय? ठाण्याचे पोलिस इन्स्पेक्टर सरपटवार दारात उभे होते. त्यांना पाहताच मला आश्चर्याचा धक्का बसला. परंतु तोंडावर मी कोणताच विकार न दिसू देण्याचा निश्चय केला होता. तसा त्यांचा नि माझा चांगला परिचय होता. भरपूर हस्तीदंती दाखवून त्यांचं मी अगदी ऐसपैस स्वागत केलं. त्यांना बसायला मी खुर्ची पुढे केली. चहाची तयारी केली. प्रवासातून आल्यामुळे त्यांच्या गरम स्नानाचीदेखील मी तयारी चालवली. आणि मग त्यांना हसत हसत विचारलं,

"काय हो इन्स्पेक्टरसाहेब, आज ह्या गरिबाच्या झोपडीमध्ये कशी काय पायधूळ झाडलीत? काय मला बिनभाड्याच्या घरात नऊन ठेवण्यासाठी एखादं वॉरंट बिरंट घेऊन आला आहात की काय?"

त्यावर इन्स्पेक्टर हसत हसतच म्हणाले—

"नाथा...लेका, तुला जर मी आज बिनभाड्याच्या घरात ठेवला, तर तुझे साखर कामगार संप करून उठतील आणि ते सारे आमची साखरच बंद करून टाकतील."

—आपण कोणत्या कामासाठी आणि कुठे जाण्यासाठी एखाद्या ठिकाणी आलो आहो असं जर प्रामाणिकपणे पोलिस खात्यातल्या माणसानं सांगितलं तर मग त्या दिवशी सूर्य पूर्वेला उगवण्याऐवजी पश्चिमेलाच उगवला असला पाहिजे...असं खात्रीपूर्वक समजायला हरकत नाही. परंतु पोलिस खात्यातली बरीचशी माणसं माझ्या चांगल्या परिचयातली होती. त्यांच्या बरोबर आज बरीच वर्षे मी बोललो... चाललो...वागलो होतो. म्हणूनच काय युक्त्या करून गुप्त बातम्या काढून घ्यायच्या त्याची कला मला बरीचशी अवगत झाली होती. त्या तंत्रामध्ये मी बरीचशी प्रगती केली होती. म्हणूनच साहेबांना मी पहिल्यानं चहा दिला. त्यांच्या स्नानाची सुरेख व्यवस्था केली. कँटीनमधून जरूर त्या वस्तू मागवल्या आणि त्यांच्या भोजनाची व्यवस्था

केली. आणि भोजन झाल्यानंतर विश्रांती घेण्यासाठी त्यांना एक पथारी पसरून दिली. आणि ह्या सर्व गोष्टी करीत असताना, माझ्याकडे येण्याचं कारण मी त्यांच्याकडून नकळत काढून घेतलं! भुसावळच्या त्या मेलप्रकरणातील आरोपी नंबर 'एक' गंगाराम ह्याला पकडण्यासाठी वॉरंट बरोबर घेऊन इन्स्पेक्टर साहेब इथे आलेले होते. कारण गंगाराम ह्या बेलापूर भागात कुठं तरी, कधी तरी हिंडत असतो, अशी त्यांना गुप्त बातमी मिळाली होती. परंतु गंगाराम नक्की कुठे आहे त्याची त्यांना कल्पना नव्हती.

—आता मला मोठाच धक्का बसला होता, परंतु मी तो तोंडावर किंवा माझ्या बोलण्या-चालण्यात दिसू दिला नव्हता. तरी पण माझे हातपाय लटलट कापू लागले. छाती जोरजोराने धडधडू लागली. गंगारामच नव्हे तर आता मीदेखील पकडला जाणार...यात संशय नव्हता! पुढं काय करायचं? आता ह्या संकटामधून कसं काय बाहेर पडायचं? गंगारामला कसं काय वाचवायचं? स्वतःला कसं काय सोडवायचं?... असे अनेक प्रश्न माझ्यासमोर 'आ' वासून उभे राहिले. त्या दिवशी गंगाराम आमच्या दुसऱ्या कोणत्याशा सहकाऱ्याला भेटण्यासाठी बाहेरगावी गेला होता. आणि रात्रीच्या गाडीनें, तो परत माझ्या खोलीवर येऊन टपकणार होता. आता ह्या भोगाला काय म्हणावं? आणि आता इथं माझ्या खोलीवर त्याचं भरपूर स्वागत करायला पोलिस इन्स्पेक्टरसाहेब आपला डेरा देऊन, बसून राहिले होते.

—ह्या प्रसंगातून कशी काय सुटका करून घ्यायची त्याचा मी काळजीपूर्वक विचार करू लागलो. प्रयत्न केल्यावर संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडतो हेच खरं! इन्स्पेक्टरसाहेबांचा मुक्काम त्या रात्री माझ्याच खोलीवर पडणार होता...आता इथं येणाऱ्या गंगारामला कसा काय वाचवायचा? एक युक्ती सुचली. त्या इन्स्पेक्टरसाहेबांना थाप ठोकली की, आत्ताच्या आत्ता स्टेशनच्या बाजूला राहणाऱ्या आमच्या एका कामगाराला भेटायचं आहे. थाप पचली तर रात्री गाडीवर जाऊन गंगारामाला भेटायचं आणि त्याला सांगायचं,

"बाबा रे...आल्या गाडीनेंच पुढे कुठे तरी जा आणि चार–आठ दिवस...मी हिरवा बावटा दाखवीपर्यंत ह्या बाजूला अगदी फिरकू नकोस. किती पण छान युक्ती सुचली! साहेबांना मी अगदी हातोहात बनवणार होतो. माझ्या हुशारीचं मीच कौतुक करीत होतो. उशिरा जेवण झाल्यामुळे रात्री जेवायचं नव्हतंच. तेव्हा शक्य तेवढ्या लौकर मी माझं जेवण उरकून घतलं. साहेबांना मी गरम गरम कॉफी करून दिली. आणि मग त्यांना हळूच म्हणालो......

"साहेब...तुम्ही आता आराम करा. अगदी स्वस्थ पडून राहा. मी स्टेशनच्या बाजूला राहणाऱ्या आमच्या एका माणसाला भेटून येतो."

—परंतु साहेब कसले खट, त्यांनी दाराबाहेर नजर टाकली. बाहेर छानपैकी

चांदणं पडलं होतं. ते म्हणाले,

"नाथा...काय म्हणालास? बाहेर जाऊन येतोस? आणि मग मी एकटाच इथं बसून रे काय करू?.. ए गड्या, बाहेर कसं छानपैकी चांदणं पडलं आहे. थांब मी पण येतो तुझ्याबरोबर. इथं बिछान्यावर तडफडण्यापेक्षा तुझ्याशी चार गप्पा तरी मारता येतील."

—आणि असं म्हणत म्हणत बाहेर पडण्यासाठी साहेबांनी कोटदेखील आपल्या अंगात चढवला. मी मनात म्हणालो,

अरे बाप रे! आता पुन्हा आली का पंचाईत? म्हंजे आता गंगाराम आयताच ह्या साहेबांच्या हातात सापडणार. त्यांच्याबरोबर जर मी गाडीवर गेलो तर... तर काय—? पुढच्या भयंकर परिणामाचा मला क्षणभरदेखील विचार करवेना. माझं डोकं सुन्न झालं होतं! ह्या भयंकर संकटातून आता कसं सुटायचं ते मला समजत नव्हतं... मी पुरता गोंधळून गेलो होतो...पण...

—पण साहेबांची बाहेर निघण्याची तयारी पुरी होण्याआधीच मला सुदैवानं दुसरी एक युक्ती सुचली. माझ्या तल्लख मेंदूनं मला हात दिला होता. पण माझ्या नव्या सूचनेवर साहेब काय म्हणतात त्याची मला काळजी वाटत होती. कारण माझा डाव जर त्यांच्या लक्षात आला असता तर बाजू माझ्यावर चांगलीच उलटली असती.

साहेबांनी पायमोजे चढवले होते. परंतु त्यांनी बूट पायात घालण्यापूर्वीच मी त्यांना म्हणालो,

"साहेब...खरं सांगू का? माझं एक गुपित मला तुम्हांला सांगायचं आहे..."

ते चकीत होऊन ते मला म्हणाले, "गुपित? नाथ्या, कसलं रे बाबा तुझं गुपित?"

त्यावर पुरती बतावणी करण्यासाठी मी म्हणालो, "पण त्या आधी तुम्ही मला वचन दिलं पाहिजे. माझं हे गुपित माझ्या घरी तुम्ही अण्णांना कळवता कामा नय."

"त्याची नको तुला काळजी." साहेबांनी आश्वासन दिलं.

"साहेब...माझं एका मुलीवर प्रेम आहे. आणि ती मुलगी कोण आहे, कुठं असते त्याची आमच्या घरी बिलकुल खबर नाही. आणि तिचा ठावठिकाणा इतक्यात मी कळवणारदेखील नाही." हे सारं सांगताना मी बराचसा लाजण्याचादेखील अभिनय केला.

"आणि बरं का साहेब...ती माझी प्रेयसी आजच्या गाडीनं मुंबईला जाणार आहे. तेव्हा तिला भेटण्यासाठी मी आता स्टेशनवर निघालो आहे."

माझ्या ह्या बोलण्याचा साहेबांवर इष्ट तोच परिणाम झाला. कारण त्यावर ते लगेच म्हणाले,

"अरे...अरे...अरे...हे जर तू मला पहिल्यांदाच सांगितलं असतंस...तर पायात

पायमोज घालण्याचे श्रम मी व्यर्थ घेतले नसते. काय रे, मला काय इतकी अक्कल नाही ? तुम्हां दोघा प्रेमिकांच्या भेटीगाठीमध्ये मी माझी तिसऱ्याची मानगड कशाला उपस्थित करू...? तुमचं हे प्रेमप्रकरण घरी कळवीन आणि तुमच्या प्रेमामध्ये मी विघ्न आणीन होय ? अरे, खुळा रे खुळा ! तू मला असा समजतोस तरी कोण ...? चल् जा स्टेशनवर एकटाच. आणि पोटभर बोलून ये आपल्या गोरीबरोबर. चांगली पोटभर भेट घे तिची. चल, बाहेर पड......"

—आणि असं म्हणत साहेबांनी आपल्या अंगावरं चढवलेला पोषाख परत उतरवायला सुरुवात केली......आणि मी माझ्या त्या 'प्रेयसी'ला भेटण्यासाठी स्टेशनचा रस्ता सुधारला. स्टेशनवर पोचेपर्यंत मी पुन्हा पुन्हा मागे वळून पाहत होतो. आणि स्वतःची खात्री करून घेत होतो...की साहेब पोलिस खात्यामध्ये आहेत. त्यांनी थाप ठोकून माझा पाठलाग तर चालविला नाही ना ...? परंतु साहेब आपल्या शब्दाला जागले होते नि निर्विघ्नपणे माझी प्रेयसी 'गंगाराम' हिला भेटू शकलो होतो....गंगारामला साऱ्या गंभीर परिस्थितीची जाणीव करून दिली. आणि त्याला आल्या गाडीनेच पुढे चलण्याचा इशारा केला. शिवाय चांगला आठ दिवस इकडे येऊ नकोस असंही मी त्याला बजावलं आणि त्याच्या गाडीनं जेव्हा स्टेशन सोडलं तेव्हा कुठं माझा जीव भांड्यात पडला......पोलिससाठी निर्माण केलेली माझी 'प्रेयसी' ही अशी होती."

—एकनाथने आपला किस्सा पुरा केला तेव्हा आम्हा मित्रमंडळींमध्ये हास्याची एकच खसखस पिकली. आणि मग त्याने मला चहाचा दुसरा हप्ता आणण्याची सूचना केली.

●


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.



# दक्षिणायन

स्वतंत्र द्रविडीस्थान !...उत्तर भारतापासून कापून काढलेला 'द्रविडीस्थान' नावाचा देश !...कल्पनाच अभद्र वाटते...मन आतल्या आत जळायला लागते... डोके ठिकाणावर असलेला कोणताही भारतीय नागरीक अशा तऱ्हेचा विचार करू शकेल असं वाटत नाही...डोळ्यांपुढे अंधाराचा समुद्र दिसतो.

मद्रास प्रांतात 'डी. एम. के.' पक्षाचा निवडणुकीत जय झाला आणि त्यांचे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले, तेव्हापासून 'स्वतंत्र द्रविडीस्थान'ची भुतं माझ्या मनापुढं उभी आहेत. सगळा जुना इतिहास आठवतो आहे...रामस्वामी नायकर !... " उत्तर भारतीय लोक आर्य आहेत आणि दक्षिण भारतीय अनार्य आहेत. त्या दोन लोकसमूहांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. ते एकमेकांचे शत्रूच आहेत. रामानं रावणाचा पराभव केला व दक्षिण भारत जिंकला, तेव्हापासून विरोधाची ठिणगी पडलेली आहे. हे दोन लोकसमूह एका देशात नांदणे शक्य नाही. त्यांचे देव वेगळे आहेत. संस्कृती भिन्न आहेत...हे दोन विभाग दोन स्वतंत्र राष्ट्रे म्हणून अस्तित्वात आले पाहिजेत. "...फार पूर्वी केव्हातरी हे वाचलेलं आठवलं. तेव्हाही मनाला तडा गेला होता. आता काँग्रेस पक्षाचा पराभव करून द्रविड मुन्नेत्र कळघमचे मंत्रिमंडळ स्थापन झाले आहे. आता भारताचे कसे होईल ?...खरोखरच दोन राष्ट्रे होतील का ?...रामस्वामी नायकरांनी उच्चारलेल्या शापवाणीला मूर्त स्वरूप येईल का ?

मद्रास प्रांतात जाण्यापूर्वी स्वतंत्र द्रविडीस्थानच्या विचारांनी मी बेचैन झालो होतो. इतर कोणत्याही प्रश्नापेक्षा हाच प्रश्न मला जास्त महत्त्वाचा वाटत होता. भाषेचा प्रश्न, नोकऱ्यांचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न, एक वेळ सोडविता येईल, दक्षिण

श्री. ज. जोशी

# ३

# स्वतंत्र द्रविडीस्थान

भारतीयांची त्यावद्दल समजूत निघू शकेल. पण, स्वतंत्र द्रविडीस्थानची कल्पना तेथील लोकमानसांत जर रुजली असेल तर त्या कॅन्सरवर औषधोपचार करणे शक्य नाही, हे मला दिसत होते ! तेथे जाऊन या प्रश्नाबद्दलची प्रतिक्रिया अजमावणं जरूर आहे.

गाडी मद्रास प्रांतात शिरली आणि खरोखरच आपण निराळ्या देशात आहोत, असा भास व्हायला लागला. स्टेशनवरच्या पाटचा इंग्रजीत आणि हिंदीत होत्या; पहिल्या दिवशी रस्त्यातून हिंडत होतो, तेव्हा भाषेची अडचण अतोनात पडली. आपण भारताच्या एका प्रांतात आहोत याचाच विसर पडायला लागला. हिंदी आणि इंग्रजी, या भाषांबरोबरच संस्कृत या देवभाषेचेही तेथे उच्चाटन होत चाललेले दिसले. आम्ही तिथे पोहोचलो, त्याच सुमारास, 'सत्यमेव जयते' या भारतीय घोषवाक्याचे 'वायमीये वेल्लूम्–(Vaymaiye Vellum)' असे रूपांतर झाले होते. ज्या नावांना संस्कृत भाषेचा वास येतो त्यांचे खास तामिळीकरण करण्याची मोहीम सुरू झाली होती. कालपर्यंत जो 'सोमसुंदरम' होता, तो आज 'मटिया-लगन' (Mtiyalagan) झाला होता, आणि 'नारायणस्वामी'ने आपल्याला 'नेडुंजे-लियन' (Nedunjeliyan) या नावाने संबोधावे, असा हट्ट धरला होता. पूर्वी हिंदूचा ख्रिश्चन झाला म्हणजे 'राम'चा 'टॉम' होई आणि 'लक्ष्मण'चा 'विल्यम' होई. त्यातलाच हा प्रकार ! संस्कृत भाषेच्या उच्चाटनामुळे उत्तर भारताशी असलेले बहुतेक सर्व सांस्कृतिक संबंध नष्ट होतील आणि स्वतंत्र द्रविडीस्थानच्या मागणीला जोर चढेल असे वाटले. आकाशवाणीवरील सकाळच्या 'गुडमॉर्निंग' या अभिवादना-

बद्दल 'नमस्ते' हे अभिवादन सुरू केल्यावर मद्रासचे 'करुणानिधी' नावाचे मंत्री बेचैन झाले व त्यांनी यामुळे उत्तर आणि दक्षिण भारतात फूट पडेल असे प्रतिपादले. 'नमस्ते'पेक्षा 'गुडमॉर्निंग' तिकडच्या लोकांना जवळचे वाटते हे उघड आहे. अशा अवस्थेत भारताची एकात्मता कुठे राहिली, असा मनाला प्रश्न पडला. आम्ही तिघांनी ज्या अनेक मुलाखती घेतल्या त्यांत हा प्रश्न म्हणूनच प्रामुख्याने चर्चिला.

मद्रास प्रांतातील राष्ट्रीय चळवळीचा थोडासा इतिहास या संदर्भात पाहिला पाहिजे. 'चौल', 'पांड्य' वगैरे राजांच्या वेळी मद्रास प्रांत स्वतंत्र असेल; परंतु मराठ्यांच्या किंवा शिखांच्या इतिहासाप्रमाणे या प्रांताला अलीकडचा इतिहास नाही. स्वातंत्र्यरक्षणार्थ येथे चकमकी झाल्या नाहीत किंवा रक्तही सांडले नाही. इंग्रजांनी सर्वांत प्रथम हा प्रांत सुलभतेने काबीज केला. तेथे त्यांना जवळजवळ मुळीच विरोध झाला नाही. अठराशे सत्तावनच्या बंडात तिकडे सर्व शांत होते. लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात स्वराज्याचा महामंत्र उच्चारला व सर्व समाज तळापासून वरपर्यंत ढवळून काढला तसे तिकडे झाले नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या किंवा त्यांच्या-नंतरच्या एकाही क्रांतिकारक कटात तामीळ नावे फारशी आढळत नाहीत. एका दृष्टीने इतर भारतात मोठमोठी आंदोलने होत होती तेव्हा हा प्रांत सुस्तच होता. महात्मा गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीपासून त्याला थोडी जाग आली, आणि तेथे सत्यमूर्ती, राजगोपालाचारी वगैरेंसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांची परंपरा निर्माण झाली. इतर भारताबद्दल राष्ट्रीय एकात्मतेचे बंध या प्रांतात निर्माण झाले, ते फक्त गेल्या चाळीस वर्षांतच !

काँग्रेसच्या ज्येष्ठ पुढाऱ्यांत राष्ट्रीय एकात्मतेची ही बीजे जास्त प्रमाणांत दिसल्यास नवल नाही. आम्ही मद्रास प्रांताचे पराभूत मुख्यमंत्री श्री. भक्तवत्सलम् यांची मुलाखत घेतली तेव्हा आम्हांला त्या एकात्मतेची तळमळ दिसली.

वॉरन रोडवरील या माजी मुख्यमंत्र्याच्या बंगल्यात आम्ही गेलो तेव्हा तिथे साधेपणा तर होताच, परंतु एक प्रकारचा उदासपणाही भरून राहिला होता. भक्तवत्सलम् यांच्या स्वतःच्या खोलीला लागून प्रशस्त दिवाणखाना होता तिथे दोन-चार खेडूत त्यांच्या भेटीची वाट पाहत बसले होते. दिवाणखान्यात श्री. कामराज नाडर आणि महात्मा गांधी यांची खूप मोठी तैलचित्रे टांगलेली होती. बाकी कोणत्याही पुढाऱ्याचे चित्र नव्हते. आम्हांला लगेच आतल्या खोलीत प्रवेश मिळाला. मध्यभागी टेबलामागच्या खुर्चीत भक्तवत्सलम् बसले होते. त्यांनी लुंगी परिधान केली होती. अंगावर खादीचे उत्तरीय होते. डोळे दक्षिण भारतीयांप्रमाणे नव्हते. त्यांत पिंगटपणाची झाक होती. काकासाहेब गाडगीळांच्या डोळ्यांची त्यांच्याकडे बघून मला आठवण झाली. राजकारणांत अनेक वर्षे खेळल्याची साक्ष तिथे होती. बाह्यतः ते गंभीर होते. पण आत कुठेतरी मिस्कीलपणा आहे, असेही वाटत होते. "राजगोपालाचारींपेक्षाही तुम्हांला टिळकांबद्दल इथे जास्त आदर

आढळेल " असे प्रथमच सांगून त्यांनी अनेक विषयांवर मनमोकळेपणाने भाष्य केले.

स्वतंत्र द्रविडीस्थानची कल्पना डी. एम. के. च्या कार्यकर्त्यांत चांगलीच मूळ धरून आहे, असे त्यांनी सांगितले. अधिकारग्रहण करताना श्री. अण्णा दुराई यांनी आपण ती कल्पना सोडून दिली आहे, असे पत्रक काढले होते. त्याबद्दल ते म्हणाले, " पत्रक काढले असले तरी ते विष तेथे आहेच. माझा पराभव झाल्यावर मी एक पत्रक काढले होते. त्यात म्हटले होते. " A Virus has spread over Tamilnad...God save Tamilnad. " ते अगदी खरं आहे.

त्या बाबतीत आम्ही पुढे विचारले, " तुमच्या त्या पत्रकामुळे फार आरडाओरडा झाला होता, असं ऐकलं. तुम्ही ते पत्रक मागे घेतल्याची बातमीही पेपरमध्ये आली होती. "

अंगावरचे उत्तरीय सावरीत त्यांनी उजवा हात जोराने झटकला व म्हटले, " मी ते पत्रक मागे घेतलेलं नाही. ' व्हायरस ' म्हणजे विषारी किडे असाही अर्थ होतो. डी. एम. के. च्या मंत्र्यांना मी विषारी किडे म्हटलं असा गवगवा केला गेला. तेव्हा मी त्याचा इन्कार केला. मी चक्क ' ए व्हायरस ' असे म्हटले होते, त्याचा अनेक किडे असा अर्थ कसा होईल ? व्हायरस म्हणजे विष–विषारी किडे नव्हेत ! स्वतंत्र द्रविडीस्थानचे–विभक्तिकरणाचे–हे विष तामिळनाडच्या शरीरात पसरत चालले आहे, असे मी अजूनही म्हणतो. " याच बाबतीत त्यांनी श्री. राजगोपालाचारी यांचाही हवाला दिला. स्वतंत्र द्रविडीस्थानच्या कल्पनेबद्दल राजाजींनी ' What is wrong in it ? ' असा उलट प्रश्न केल्याचे त्यांनी सांगितले. कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाल्यामुळे या मागणीला आता जास्त जोर येईल, असे ते म्हणाले.

कॉंग्रेसप्रमाणेच ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ' ही एक राष्ट्रीय चळवळ आहे. तिच्या उद्दिष्टांबद्दल किंवा कार्यपद्धतीबद्दल कुणाच्या काही शंका किंवा विरोध असले तरी तिच्या देशभक्तीबद्दल संदेह नाही. त्या दृष्टीनं संघाचे स्वयंसेवक श्री. जोगळेकर आणि ' गोपालजी ' यांच्याशी झालेले बोलणे महत्त्वाचे आहे. पुण्यात मी अनेक वेळा संघ कार्यालयात गेलेलो आहे. स्वयंसेवकांशी बोललेलो आहे. परंतु मद्रासमध्ये संघकार्यालयात जाण्यात मला निराळीच अनुभूती आली. तिथे आम्हांला खास संघीय अगत्याने आणि अदबीने जेवायलाच बोलावले होते. दुपारी बारा-साडेबारा वाजता आम्ही गेलो. बाहेरची खोली अगदी साधी होती. इलेक्ट्रिकचा पंखा नादुरुस्त होता. जमिनीवर घातलेल्या चटया फाटक्या अन् जुन्यापान्या होत्या. भिंतींवर परमपवित्र भगवा ध्वज ! सरसंघचालक डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी, अरविंद, आणि अश्वारूढ शिवाजी महाराज यांची चित्रे होती. भोजनासाठी आम्ही आत गेलो आणि एका चिंचोळ्या खोलीत दाटीवाटीने बसलो. स्वयंसेवकांनीच सर्व स्वयंपाक केला होता. साराच कारभार ' पुरुषी ' आणि ओबडधोबड होता. भोजनास सुरुवात करण्यापूर्वी सर्वांनी हात जोडले आणि ' ओम् सहनाववतु ।

सहनोभुनक्तु। सहवीर्यं करवावहै " ही प्रार्थना म्हटली. त्या संस्कृत स्वरांनी माझ्या मनाला शांतता लाभली. मद्रासला गेल्यापासून संस्कृतविरोधी वातावरण मी अनुभवत होतो. तामिळीकरणाचा अतिरेक झालेला होता. अशा अंधारात ' सहवीर्यं करवावहै ! ' या शब्दांचा दिवा लुकलुकताना पाहून मनाला धीर आला.

श्री. जोगळकर तेथे तेवीस-चोवीस वर्षे कार्य करीत आहेत. ते अबोल आहेत. पण गोपालजींना मात्र बोलण्याची हौस आहे आणि निष्ठेचा आवेश आहे. तामीळ-नाडमधील काही लोकांमध्ये विभक्तिकरणाची कल्पना रुजलेली आहे हे त्यांनी मान्य केले; परंतु त्या प्रचाराचा विशेष जोर नाही, असे ते म्हणाले.

सामान्य सुशिक्षित मद्रासी माणूस अंतर्यामी धर्माभिमानी असतो आणि संस्कृतच्या विरोधी मुळीच नसतो, असे त्यांचे मत आहे. संघाचे आदेश आणि प्रार्थना संस्कृतातून असतात. परंतु त्याबद्दल कोणाही स्वयंसेवकाने किंवा नागरिकाने कधीही आक्षेप घेतलेले नाहीत, असा त्यांनी अनुभव सांगितला. स्वतंत्र द्रविडीस्थानच्या कल्पनेला राजगोपालाचारींसारख्यांचा आशीर्वाद आहे, हे मी दाखवून देताच ते म्हणाले, " राजाजींबद्दल काहीच सांगता येत नाही. ते कशाला आणि कधी आशीर्वाद देतील याचा नेमच नाही. गेल्याच आठवड्यात त्यांना टिपूचा कळवळा आला. टिपूचं स्मारक व्हायला हवं, असं त्यांनी तावातावानं प्रतिपादलं, यात काय ते समजा. " निरोप घेताना स्वतंत्र द्रविडस्थानच्या कल्पनेबद्दल गोपालजींनी बजावले, " Let us be cautious and keep our gunpowder dry. "

एक राष्ट्रीय विचारसरणी शाबूत असलेले हे दोन गट सोडून बाकीच्या लोकांच्या मुलाखतीत आम्ही हा प्रश्न चर्चिला, तेव्हा स्वतंत्र द्रविडीस्थानची कल्पना आता खरोखरच मागे पडली आहे असं जवळ जवळ प्रत्येकानं सांगितलं. ' इंडियन एक्स्प्रेस विभागाचं तामीळ भाषेतील दैनिक ' दिनमणी ' याचे उपसंपादक श्री. वेंकटाचारालू यांनी पुन: पुन: सांगितलं की, " Separatist movement is a thing of the past now. It was a political stunt " विश्वविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यास करणारे काही विद्यार्थी भेटले. त्यांनी मनमोकळी चर्चा केली. निरनिराळ्या प्रश्नांवरील स्वत:च्या व्यथा कथन केल्या. स्वतंत्र तामीळनाडची कल्पना काही विद्यार्थी गटांत जागृत आहे, असे त्यांनी कबूल केले. परंतु तिला तितकासा सार्वत्रिक पाठिंबा नाही, असे त्यांचे मत पडले. " आम्ही खरोखरच ती कल्पना सोडलेली आहे ... We are honest " असं ते म्हणाले. बांधकाम खात्याचे मंत्री श्री. करुणानिधी यांनीही तसंच सांगितलं. " आम्ही द्रविडीस्थानची कल्पना सोडून दिलेली आहे. आम्ही प्रामाणिक आहोत, मात्र केंद्र सरकारने आमच्याशी चांगल्या तऱ्हेनं वर्तन केलं पाहिजे, " असं ते म्हणाले.

श्री. करुणानिधी यांच्याप्रमाणेच शिक्षण मंत्री नेडिज्युनियन यांचेही मत दिसले. सगळ्या मंत्र्यांमध्ये हा मंत्री बोलायचालायला जास्त मोकळा आणि आदबशीर

वाटला. आम्ही त्यांना दहा-पंधरा मिनिटे मुलाखतीची मागणी केल्यावर ते हसत म्हणाले, " Only commodity that is wanting, is 'Time" आणि खरोखरच त्यांना इतकी माणसे भेटायला येत होती की त्यांतून वेळ काढणे मुष्किलच होते. सचिवालयात वेळ मिळाला नाही, म्हणून त्यांनी आम्हांला आपल्या प्रशस्त बंगल्यात मुलाखत दिली.

त्यांनी अनेक विषय चर्चिले. शेवटी जाता जाता मी स्वतंत्र द्रविडीस्थानबद्दल विचारले. त्याबाबत ते म्हणाले, " ही कल्पना आम्ही खरोखरच सोडून दिलेली आहे ... आता जग बदलत आहे. इतके दिवस मद्रास प्रांतातले लोकच बाहेर जात होते. आता परप्रांतातले लोकही इकडे स्थायिक होत आहेत. एक प्रकारचा संस्कृती-संकर चालू आहे. अशा वेळी विमक्तिकरणाची कल्पना मूळ धरू शकणार नाही. "

इतके बोलून ते काही वेळ थांबले. विचारात गढल्यामुळे त्यांचा ओबड धोबड काहीसा विनोदी दिसणारा चेहरा लंबवर्तुळाकृती झाला आणि डोळे आकुंचन पावले. ते पुढे म्हणाले, " परवाच्या पाकिस्तानबरोबरच्या लढाईत किंवा चीन-भारत युद्धांत ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. एकेक सुटा प्रांत स्वतःचे संरक्षण करू शकणार नाही हे उघड आहे. "

माझ्या मनाला एकदम दिलासा मिळाला. डी. एम. के. च्या मंत्र्याने अशा तऱ्हेने विचार मांडावेत हे खरोखरच कौतुकास्पद होते. श्री. पुंडलिकांनी तरीही पुढे विचारले, " आम्ही दोन-चार दिवसांत महाराष्ट्रात परत जाऊ. स्वतंत्र द्रविडीस्थानची आता मुळीसुद्धा भीती उरलेली नाही, असे आम्ही स्पष्टपणाने आमच्या लोकांना सांगू ना ?" नेडिज्युनियन यांचा इतक्या वेळचा गंभीर चेहरा मग बदलला आणि तेथे राजकारणी पुरुषाला शोभेल, असे हास्य दिसायला लागले. ते म्हणाले, " तुम्ही जरूर तसं सांगा. . .परंतु. . .परंतु. . .विमक्त होणे न होणे हे केंद्र सरकारच्या वागणुकीवर अवलंबून आहे. "

पुंडलिक उसळून म्हणाले, " म्हणजे हे भूत तुम्ही कायमचे जिवंत ठेवणार ! ही टांगती तलवारच आहे, केंद्र सरकारवर खापर फोडून तुम्ही विमक्तिकरणाचा प्रचार करण्यास केव्हाही मोकळे आहातच! ..." यावर मात्र नेडिज्युनियनने उत्तर दिले नाही. तथापि या उत्तरामागचा राजकीय कावा डी. एम्. के. चे नेते सोडणार नाहीत ही आम्हा सर्वांची अटकळ खरी ठरली. " १ रुपयाला ३ पडी या मद्रास सरकारच्या स्वस्त तांदूळ योजनेला केंद्राने आर्थिक मदत केलीच पाहिजे. काश्मीरला स्वस्त गव्हासाठी तुम्ही मदत करता, मग आम्हाला का नाही ? केली नाहीत तर काश्मीरमध्ये आहे तशीच विमक्तिकरणाची चळवळ सुरू करणे आम्हांला अवघड आहे का ?" अशी घोषणा करुणानिधींनी केली आहे ! " केंद्राने मदत केली तर विमक्तिकरणाची कल्पना मुळातच मरून जाईल. " असें अण्णादुराईनी जाहीर केले आहे.

पंधरा-वीस दिवसांच्या अल्पकाळात मी मद्रास प्रांतातील दोन-तीन शहरांत वास्तव्य केले. अनेकांना स्वतंत्र द्रविडीस्थानबद्दल विचारले. बहुतेकांचे उत्तर नकारार्थी होते. "'द्रविडीस्थान'ची कल्पना रामस्वामी नायकरांनी अजूनही सोडली नाही" असे आम्ही हेतूपूर्वक विचारल्यावर प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे "रामस्वामी नायकर ही एक 'वल्ली' आहे, तिच्याकडे फार गंभीरपणे तुम्ही पाहू नका"—असेच आम्हाला जिथेतिथे सांगितले गेले! परंतु तो नकार कुठेतरी गुळमुळीत असल्याचा भास झाल्याशिवाय राहिला नाही. मदुरा येथे केंद्र सरकारचा दिल्लीत असलेला एक अधिकारी रजेवर आलेला असताना भेटला. त्याचे नाव होते पेरीस्वामी. तो मात्र या विषयावर बरेच परखड बोलला. पंजाबी लोकांना ज्याप्रमाणे स्वतःच्या वांशिक श्रेष्ठतेचा गर्व झालेला असतो व ते इतर भारतीयांना कमी लेखतात, त्याचप्रमाणे तामिळी लोकांचेही असावे असा माझा अनुभव आहे. केंद्र सरकारातील बहुतेक सर्व मोठमोठ्या शासकीय किंवा अर्थ खात्यातील जागा मद्राशांना मिळालेल्या असतात. त्याबाबत तो म्हणाला, "आम्ही लोक हुशार आहोत. आमच्याशिवाय राज्य चालणे शक्य नाही...मराठी किंवा पंजाबी लोकांनी आमची बरोबरी काय करावी?... तुम्ही लोक फक्त 'शिवाजी शिवाजी' म्हणून जप करता परंतु कामात मात्र अत्यंत गहाळ आणि बुद्दू असता. बंगाली लोकच काय ते बुद्धिमतेच्या बाबतीत आमची बरोबरी करू शकतील."

त्यानंतर हिंदी भाषेबद्दल तो अत्यंत कडवटपणाने बोलला. "आम्ही लोक स्वतंत्र द्रविडीस्थानसुद्धा मिळवू. ती कल्पना मुळीच त्याज्य नाही. सीलोनमध्येसुद्धा आमचं राज्य होणं कठीण नाही."

मी हसत हसत विचारले, "तुम्ही भारतातून फुटून निघाल्यावर तुमच्या नोकऱ्यांची मक्तेदारी संपेल...भारतात मग तुम्हांला महत्त्वाच्या नोकऱ्या मिळणार नाहीत..."

या प्रश्नालाही त्याने चपखल उत्तर दिले. "असं का व्हावं?......हिंदुस्थान आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे झाली. पण मुसलमानांना भारतात मोठ्या नोकऱ्या मिळतात की नाही?...पूर्वीचे अस्पृश्य आता बौद्ध झाले. त्या नवबौद्धांना अस्पृश्य समाजाला मिळणाऱ्या सर्व सवलती आपण देतोच ना?...मग स्वतंत्र द्रविडीस्थान झाल्यावरदेखील आम्हा लोकांना दिल्लीत नोकऱ्या का मिळू नयेत?"

त्याच्या प्रश्नानं मी निरुत्तर झालो आणि माझ्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. पेरीस्वामींचे ते अभद्र उद्गार माझ्या मनाला जखम करून गेले. मी विचार करायला लागलो. इतक्या निरनिराळ्या लोकांशी बोललो, श्रेष्ठींच्या मुलाखती घेतल्या, स्वतंत्र द्रविडीस्थानची कल्पना आता मृत आहे, असं प्रत्येकानं सांगितलं. त्या सांगण्यामुळे मन समाधान पावायला हवं होतं. परंतु तसं झालं नव्हतं. कुठेतरी बोच होतीच. काळी छाया मनावर घोंघावतच होती.

करुणानिधी आणि नेड्ज्युनियन या मंत्र्यांनी सांगितलं होतं, की आम्ही विभक्त न होणे हे केंद्र सरकारवर अवलंबून आहे. या वाक्यातली खोच स्पष्ट होती.. केंद्र सरकारला ओलीस ठेवण्याची प्रवृत्ती तिथे होती. 'अमुक झाले नाही तर आम्ही वेगळे होऊ,' अशी उघड धमकी होती. तिचा स्फोट पुढील काळात कसा होईल हे सांगता येणे कठीण आहे.

हल्ली माझं मन हळवं झालं आहे. कोणत्याही गोष्टींचा विश्वास धरता येत नाही. आम्ही शाळा–कॉलेजांत असताना पाकिस्तानची कल्पना प्रथम निघाली होती त्या वेळी ती आम्हा सर्वांनाच हास्यास्पद आणि अव्यवहार्य वाटली होती. नेहरूंनी तिचे Political Nonsense म्हणून वर्णन केले होते. 'माझ्या देहाचे तुकडे झाले तरीही पाकिस्तान होऊ देणार नाही,' असं महात्मा गांधी म्हणाले होते. ही आपली भारतमाता आहे...आपण तिची लेकरे आहोत...भावाभावांनी दोन चुली कशाला घालायच्या ? असे कुणी कवी म्हणाले होते. पाकिस्तानची कल्पना मूर्खपणाची आहे. तिच्याबाबत विचार करण्याची जरूरी नाही, असं आमची पिढी धरून चालली होती. परंतु दहा-पंधरा वर्षांतच त्या चिमुकल्या कल्पनेनं ब्रह्मसमंधाचं रूप घेतलं. आणि मानवी रक्ताचे पाट वाहवून पाकिस्तान जन्माला आलं. त्या कल्पनेला हसणारे आम्हीच मूर्ख ठरलो.


स्वतंत्र द्रविडीस्थानचे तसे न होवो, म्हणजे मिळवली. आज सगळेच अशक्य दिसते. एवढचा लहानशा प्रांताचे राज्य कसे होणार असे वाटते. परंतु हे युग फुटीर प्रवृत्तीचे आहे...शिखीस्थानचे किंवा नागालँडचे जर नकाशे व्हायला लागले तर तामीळनाडचेच का होऊ नयेत ? केंद्र सरकारजवळ अशक्य मागण्या करून त्यांना पेचात धरायचे आणि फुटीरपणाचे भूत प्रांतात उभे करायचे, हा तेथील राजकारण्यांचा पुढील पाच-दहा वर्षांतला कदाचित् खेळही असू शकेल...काय होईल ते कुणी सांगावे ?

स्वतंत्र द्रविडीस्थानच्या कल्पनेने आज तेथील जनतेत मूळ धरलेले नाही. परंतु ते विष तेथे आहेच. भक्तवत्सलम् यांनी सांगितले, "A virus has started spreading. God save Tamilnad."

ते विष वाढत जाईल का ?...आज सांगणे कठीण आहे. परंतु वाढत जाणार नाहीच, असे छातीठोकपणाने म्हणता येणार नाही.

ते विष वाढत गेले तर मात्र, "God save Bharat."

(अपूर्ण)



अॅलेक्झांडरच्या फाशीतून क्रांतीची प्रेरणा मिळाल्यानंतर लेनिन या प्रेरणेशी सुसंवादी ठरणाऱ्या प्रतिपादनाचा मागोवा घेऊ लागला. आतापर्यंत तो खूप वाचत असला तरी त्या वाचनाला विशिष्ट दिशा नव्हती. यापुढे मात्र निश्चित हेतू डोळ्यांपुढे ठेवूनच तो पुस्तकांची कपाटे धुंडाळू लागला. अनेक ग्रंथांची उलथापालथ केल्यानंतर त्याला एक पुस्तिका सापडली. आपल्याला जे नेमके हवे होते ते हाती आल्यामुळे लेनिन हरखून गेला. त्या पुस्तिकेचे नाव होते ' क्रांतिसूत्रे '. या सूत्रांचा लेखक विस्मृतीच्या अंधारात विरून गेला होता. लेनिनने त्याच्यासंबंधी माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. नंतर आपल्या विचारपरंपरेला आधार देणाऱ्या त्या लेखकाचे नाव लेनिनच्या ओठांवर सारखे घोळू लागले. तो आपल्या मित्रांना विचारू लागला, " तुम्ही सर्जी नेचॅयेव्ह वाचला आहे काय ? "

एके काळी झारला (झार हे सीझरचे रशियन रूप) हादरवून सोडणाऱ्या नेचॅयेव्हची काल्पनिक मूर्ती आपल्या डोळ्यांसमोर खेळवत लेनिन त्याच्या चरित्राचे धागेदोरे जुळवू लागला.

# व्होल्गा

# जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

## ३

मॉस्कोच्या ईशान्येस शंभर मैलांवर असलेल्या इव्हानाव्हो या गावी २० सप्टेंबर १८४७ रोजी सर्जी जेनादिएव्हिच नेचॅयेव्ह याचा जन्म झाला. त्याचे वडील रंगारी होते. लहानपणी सर्जी आपल्या वडिलांजवळ फारसा राहिलाच नाही. कोस्त्रोमा येथे त्याचे आजोबा राहत असत. सर्जीचे बालपण तेथेच गेले. त्या काळी ' राजनिष्ठांचे गाव ' म्हणून कोस्त्रोमाचा विशेष लौकिक होता. इव्हानाव्हो गावची परिस्थिती तशी नव्हती. तेथे कापडाच्या गिरण्या असल्यामुळे कामगार-वस्ती बरीच होती आणि औद्योगिक क्रांतीच्या झपाट्यामुळे या कामगारांमध्ये प्रचलित राजसत्तेविरुद्ध हळूहळू असंतोष धुमसू लागला होता. सर्जी अधूनमधून आपल्या आईवडिलांना भेटण्यासाठी इव्हानाव्होला येई. कोस्त्रोमा आणि इव्हानाव्हो या दोन गावांची प्रकृती भिन्न आहे हे सर्जीला नकळत जाणवत होते. कोस्त्रोमाला राहणारे आजोबा सांगायचे, " सर्जी, झार म्हणजे पृथ्वीवरचा राजदूत बरं का ? त्याची आज्ञा प्रमाण मानणं हे आपलं कर्तव्य आहे. " या उलट वडिलांच्या बोलण्यात झारसंबंधी तुच्छतेचेच उद्गार त्याला ऐकावयास मिळत.

बालपण कोस्त्रोमाला व्यतीत केल्यानंतर सर्जी नेचॅयेव्ह आपल्या वडिलांकडे राहावयास आला. त्या वेळी त्याच्या वडिलांना इव्हानाव्होमधील नाटकगृहात पडदे रंगविण्याची नोकरी मिळाली होती. त्यामुळे सर्जीही कधीकधी आपल्या वडिलांबरोबर नाटके पाहावयास जाई. नाटकगृहात त्याचा वावर सुरू झाल्यामुळे त्याला क्वचित छोटीमोठी भूमिकाही करण्याची संधी मिळे. त्याच्या आवाजाला गोडी नव्हती. पण नाट्य कसे खुलवावे हे मात्र त्याला चांगले अवगत होते. त्याने आपल्या क्रांतिप्रयत्नांना नाटकाचीच उपमा दिली आहे. 'क्रांतिसूत्रां'च्या प्रस्तावनेत सर्जी म्हणतो, " मित्रांनो, आता नांदी आटोपली असून लवकरच प्रत्यक्ष नाटकाला प्रारंभ होणार आहे. प्रत्येकाने आपली भूमिका कसोशीने वठविली पाहिजे." सव्वीस वर्षांच्या या तरुणाला मॉस्कोच्या न्यायालयात उभे करण्यात आले तेव्हा या नाटकाचा पहिला अंक आटोपत आला होता.

इव्हॅन इव्हानोव्ह या विद्यार्थ्याचा खून केल्याच्या आरोपावरून सर्जीला पकडण्यात आले होते. हा खून त्याने अकारण केला होता. म्हणून तो न्यायालयाकडून दयेची अपेक्षा करीत नव्हता. इव्हानोव्हचा खून हे या खटल्याचे केवळ निमित्त होते. त्याचा खरा गंभीर गुन्हा निराळाच होता. राज्ययंत्रणेचा संपूर्ण विनाश करण्याचे तत्त्वज्ञान तो गेली काही वर्षे प्रतिपादन करीत होता. इतकेच नव्हे तर हा विनाश कसा घडवून आणावयाचा याचा मार्गही तो आपल्या सहकाऱ्यांना समजावून सांगत होता. आपल्यावरचा खरा आरोप कोणता आहे हे सर्जी नेचॅयेव्हला माहीत होते आणि ही गोष्ट त्याला माहीत आहे याची न्यायालयालाही जाणीव होती.

सर्जीवरील खटल्याला २० जानेवारी १८७३ रोजी प्रारंभ झाला. खटल्याच्या कामकाजात त्याला कोणताच रस नव्हता. त्यामुळे सुनावणी चालू असताना तो सरकारी वकिलांकडे किंवा न्यायमूर्तींकडे पाहतही नसे. दातांनी नखे कुरतडीत तो बसलेला असावयाचा. सर्जीच्या 'संपूर्ण विनाशा'च्या तत्त्वज्ञानामुळे त्याच्याबद्दल केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच नव्हे तर खुद्द झारलाही भीती वाटत होती. त्याने केलेल्या व न केलेल्या कृत्यांसंबंधी साऱ्या रशियाभर त्या काळी एवढे गूढ आणि भीतियुक्त वातावरण निर्माण झाले होते की त्याच्या हातून काही तरी अद्भुत घडेल असे लोकांना वाटत होते, झारने तर खटल्याचा दररोजचा वृत्तान्त त्या त्या दिवशीच आपल्याकडे धाडला पाहिजे. असा हुकूम दिला होता. सर्जीवर पहारा करणाऱ्या तुकडीच्या अधिकाऱ्यालाही असाच हुकूम देण्यात आला होता. तो वागतो कसा, बोलतो काय यासंबंधीची तपशीलवार माहिती या अधिकाऱ्याने झारला दररोज कळवावयाची होती. न्यायालयातील कामकाजासंबंधी उदासीन असलेला सर्जी न्यायमूर्तींनी एखादा प्रश्न विचारला की लगेच ओरडायचा, " मी हे न्यायालय ओळखत नाही, तुमचा झार ओळखत नाही आणि त्याने केलेले कायदेही मी जाणत नाही." 'तो एवढा भडकावयाचा की त्याला शांत करण्यातच न्यायालयाचा बराचसा

वेळ जाई. शांत झाला की मग सर्जी समोरच्या कठड्यावर रेलून खटला ऐकण्यासाठी न्यायालयात जमलेल्या लोकांकडे आपली नजर रोखी. त्या वेळी तो कोणाची तरी प्रतीक्षा करीत आहे असा भास होई. सर्जीला संगीताचीही आवड होती व त्यामुळे फ्ल्यूट, पियानो आदी वाद्यांशीही त्याचा परिचय झाला होता. न्यायाधीशांच्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचे नसले तर ही लहरी स्वारी कठडा पियानो म्हणून समजून त्यावर दोन्ही बोटे फिरवीत बसायची. नेहमीच्या राजबंद्यांहून हा सर्वस्वी वेगळा आहे हे सर्जीला पाहताक्षणीच वाटायचे.

त्याच्या वेडातही एक प्रकारची शिस्त होती. त्यामुळे कधीकधी तो सरकारी वकिलांच्या प्रश्नांना अशी काही चमत्कारिक उत्तरे देई की त्यामुळे न्यायालयात हास्याची खसखस पिके. सरकारी वकील चिडले की सर्जी खूष होई. न्यायालय, न्यायाधीश, कायदेकानू या साऱ्या संस्थांबद्दल त्याच्या मनात कमालीचा तिरस्कार होता, संताप होता आणि तो त्याच्या हालचालींवरून व बोलण्यांवरून सहज जाणवे. खरे म्हणजे गुन्हेगार कितीही सराईत व निढावलेला असला तरी तो फाशीच्या छायेत वावरू लागला की त्याचा सारा आवेश, सारा त्राण नाहीसा होतो. परंतु या सव्वीस वर्षांच्या तरुणाची जिद्द काही वेगळीच होती. समोर मृत्यू दिसत असताना एवढे असामान्य मनोबल त्याने कोठे आणि केव्हा आत्मसात केले, याचेच अनेकांना आश्चर्य वाटे.

आपण स्थापन केलेल्या क्रांतिसंघाचे साऱ्या देशभर जाळे पसरले असून या संघाचे चाळीस लाख समासद आहेत असा सर्जी नेचॅयेव्हचा दावा होता. त्याचा हा दावा जरी खरा नसला तरी मॉस्को, पीटर्सबर्ग व तुला या तीन शहरांतील तरुणवर्ग मात्र त्याच्या हालचालींकडे क्वचित आकर्षित झाला होता हे निश्चित. या तरुणांची संख्या तीनशे-चारशेच्या आसपास होती. अटकेपूर्वी बरेच दिवस सर्जी गुप्त रीतीने वावरत असे. ही गुप्तता कायम राखण्यासाठी त्याने वेळोवेळी किती नावे घेतली हे त्याचे त्यालादेखील आठवत नव्हते. कधी इव्हॅन पेट्रॉव्ह तर कधी इव्हॅन पाव्हलोव्ह. याशिवाय ड्मिट्री, फिरोटॉव्ह, कॅप्टन पॅनिन, स्पेशल एजंट नंबर २६६४ या नावांनीही तो वावरत असे. क्रांती कधी घडवून आणावयाची व त्यासाठी कोणाकोणाचा खून करणे अपरिहार्य आहे याची यादी करीत सर्जीची भटकंती सुरू असायची. आपल्या अनुयायांच्या माहितीसाठी तो वेळोवेळी पुस्तिका व पत्रके तयार करीत असायचा.

मॉस्कोच्या शेती महाविद्यालयातील इव्हॅन इव्हानोव्ह हा विद्यार्थी सर्जी नेचॅयेव्हच्या क्रांतिसंघात नुकताच दाखल झाला होता. एके दिवशी सर्जीने आपले नवे पत्रक शेती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भोजनगृहात चिकटविण्याचे काम इव्हानोव्हकडे सोपविले, परंतु इव्हानोव्हने नकार दिला.

" हे बघ इव्हॅन," सर्जी गरजला, " हा आपल्या क्रांतिसंघाचा आदेश आहे. तो

तुला पाळलाच पाहिजे."

"अशा अर्थशून्य गोष्टी करण्याला माझा विरोध आहे." इव्हॅन इव्हानोव्ह शांतपणाने उत्तरला.

"म्हणजे तू संघाचा आदेश मानावयास तयार नाहीस तर?"

"होय, संघ जेव्हा मूर्खपणाने वागायला सांगतो तेव्हा!"

सर्जी नेचॅयेव्ह व इव्हॅन इव्हानोव्ह यांच्यांतील हा संवाद त्या वेळी तेवढ्यावरच थांबला; कारण सर्जीला मॉस्कोहून तातडीने तुला या गावी जावयाचे होते. तुला येथील दारूगोळ्याच्या सरकारी कारखान्यावर हल्ला करण्याचा विचार गेले बरेच दिवस सर्जीच्या मनात घोळत होता व त्यासाठीच त्याला तुला येथे जाऊन येणे आवश्यक झाले होते. तुला येथील बेताची पूर्वतयारी करून सर्जी मॉस्कोला परतला तो इव्हानोव्हचा खून करण्याचा निर्धार करूनच. सर्जीने तावडतोब क्रांति-संघाच्या मॉस्को-शाखेची बैठक बोलावून तीत इव्हानोव्हवरील आरोपांचा पाढा वाचला. या बैठकीस अर्थातच इव्हानोव्ह हजर नव्हता. संघाचा आदेश धुडकावून लावल्याच्या आरोपाबद्दल त्याचा खून करण्यात यावा, असे या बैठकीत ठरले. त्याप्रमाणे शेती महाविद्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या उद्यानाच्या अंधाऱ्या भागात दुसऱ्या दिवशी संध्याकाळी निकोलाय या इव्हानोव्हच्या मित्राने त्याला घेऊन यावे, असा सर्जीने आदेश दिला. ठरल्याप्रमाणे निकोलाय इव्हानोव्हला घेऊन उद्यानाच्या अंधाऱ्या भागात आला. सर्जी अगोदरच तेथे येऊन पोहोचला होता. अंधारामुळे निकोलाय कोणता व इव्हानोव्ह कोणता हे प्रथम सर्जीला ओळखता आले नाही. त्याने पहिल्याने पुढे आलेल्या तरुणावर झडप घातली. पण तो निकोलाय निघाला.

"इव्हानोव्ह कुठाय?" आपली चूक उमगून येताच सर्जीने निकोलायला विचारले.

सर्जीचे हे वाक्य कानांवर पडताच इव्हानोव्हला साऱ्या प्रकाराचा बोध झाला व तो तेथून पळून जाऊ लागला. परंतु सर्जीने धावत जाऊन त्याला पकडले आणि खाली पाडले. सर्जी व इव्हानोव्ह यांची झोंबाझोंबी सुरू झाली. या झटापटीत इव्हानोव्ह सर्जीच्या उजव्या अंगठ्याला इतका कडकडून चावला की मरेपर्यंत ती खूण कायम होती. सर्जीने चपळाई करून खिशातले रिव्हॉल्व्हर काढले. आता इव्हानोव्हचे काहीच चालण्यासारखे नव्हते. सर्जीच्या रिव्हॉल्व्हरमधून गोळी सुटताच इव्हानोव्ह खाली कोसळला तो कायमचाच. पण तरीही शंका नको म्हणून सर्जीने त्याच्या डोक्याजवळ रिव्हॉल्व्हर नेऊन आणखी एक गोळी झाडली. इव्हानोव्हच्या मेंदूच्या चिधड्या चिंधड्या झाल्या होत्या. नंतर सर्जी आणि निकोलाय यांनी इव्हानोव्हच्या पायांना व मानेला दगड बांधून त्याचे प्रेत दोरखंडाच्या साहाय्याने उद्यानालगतच्या तलावापर्यंत फरफटत नेले आणि आसपास कोणी नाही याची खात्री करून घेऊन ते तलावात ढकलले. प्रेताने तळ गाठलेला पाहिल्यानंतर ते दोघे

कुझ्नेत्सॉव्ह्च्या खोलीवर परतले. कुझ्नेत्सॉव्ह आणि उस्पेन्स्की हे दोन विद्यार्थी सर्जीबरोबर उद्यानात आले होते. परंतु सर्जीच्या रिव्हॉल्व्हरचा पहिला आवाज होताच घाबरून ते तेथून पळाले होते. कुझ्नेत्सॉव्ह्च्या खोलीवर आल्यानंतर सर्जीने कपडे बदलले व लागलीच तो पीटर्सबर्गला रवाना झाला.

तीन दिवसांनी इव्हानोव्ह्चा पाण्याने फुगलेला मृत देह तलावाच्या पृष्ठभागावर तरंगू लागला तेव्हा कोठे पोलिसांना असा काही प्रकार घडला असल्याचे कळले. ही आत्महत्त्या नसून जाणूनबुजून केलेला खून आहे हे इव्हानोव्ह्च्या छिन्नभिन्न शरीरावरून सहज समजण्याजोगे होते. हा खून कोणी केला असावा या दृष्टीने गुप्त पोलिसखात्याचा तपास सुरू झाला. मॉस्कोमध्ये तरुण विद्यार्थ्यांनी एक गुप्त क्रांतिसंघटना स्थापन केली असून तिचेच हे कृत्य आहे हा सुगावा लागताच पोलिसांनी या क्रांतिसंघासंबंधी माहिती मिळविण्याचे कार्य हाती घेतले. एका पुस्तकाच्या दुकानातील छाप्यात या क्रांतिसंघाचे वाङमय त्यांच्या हाती लागले. या दुकानामार्फत क्रांतिसंघाच्या वाङमयाचा साऱ्या देशभर प्रसार होत होता. दुकानात सापडलेल्या पत्रकांमुळे पुढील तपास करणे पोलिसांना सोपे जाणार होते. त्यांनी लागलीच संशयित तरुणांच्या धरपकडीस प्रारंभ केला. त्यांतील एका विद्यार्थ्याने पोलिसांच्या छळास कंटाळून सर्जीचे नाव सांगितले. त्याला पकडण्यासाठी पोलिसखात्याच्या मोटारी गल्लीबोळांत फिरू लागल्या. सर्जी त्या वेळी मॉस्कोतच होता. परंतु पोलिसांना त्याचा थांगपत्ता लागू शकला नाही. मॉस्कोत राहणे धोक्याचे आहे, हे आढळून आल्यानंतर सर्जीने स्त्रीवेष धारण करून रशियाची सीमा ओलांडली.

सर्जी हाती लागत नसल्यामुळे पोलिसखाते चिडले होते. त्यांनी इव्हानोव्ह्च्या खुनाबाबत एकूण १५२ विद्यार्थ्यांना अटक केली. परंतु प्राथमिक चौकशीनंतर त्यांतील ७९ जणांवर खुनाचा आरोप ठेवण्यात आला. त्यांत अठरा-वीस वर्षांची मुलेमुलीच बरीच होती. फरारी आरोपी म्हणून सर्जी नेचॅयेव्ह्चे नाव खटल्यात गोवण्यात आले. सर्जी हाती लागेपर्यंत खटल्याचे कामकाज सुरू न करण्याचे पोलिसांनी ठरविले. त्याचा तपास लागेपर्यंत त्याच्यासंबंधी अधिकाधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्याचे जे लिखाण पोलिसांना सापडले त्यावरून सर्जी हा असामान्य बुद्धीचा माणूस आहे यांविषयी पोलिसांची खात्री पटली. कोणत्याही राज्ययंत्रणेची मर्मस्थाने कोणती असतात व या मर्मस्थानांवर आघात करून ती राज्ययंत्रणा खाली धुळीत खेचण्यासाठी मूठभरच पण निर्धारी आणि समर्पित क्रांतिकारकांनी काय केले पाहिजे याबाबतचे सर्जीचे बिनतोड विवेचन त्याच्या बुद्धिवैभवाची साक्ष देत होते. त्याच्या सर्व क्रांतिविचारांचे सार त्याच्या 'क्रांतिसूत्रे' या पुस्तिकेत वाचावयास मिळते. या पुस्तिकेत त्याने क्रांतिकारकाची स्वत:संबंधीची कर्तव्य कोणती, सहकाऱ्यांसंबंधीची कर्तव्ये कोणती, क्रांतिसंघाबद्दल कोणती व समाजाबद्दल कोणती यांचे मुद्देसूद विवेचन केले आहे.

# क्रांतिकारकाची स्वतःसंबंधीची कर्तव्ये

● क्रांतिकारकाला खाजगी जीवन असूच शकत नाही. त्याला स्वतःची अशी निराळी भावना नसते. नातीगोती नसतात. इतकेच काय पण स्वतःच्या नावावर वा घरावर प्रेम करण्याचाही त्याला अधिकार नसतो. तो कोणाचाच नसतो. क्रांती हाच त्याचा एकमेव ध्यास असतो, विश्वास असतो.

● प्राचीन समाजव्यवस्थेबरोबरचे आपले सर्व संबंध क्रांतिकारकाने केवळ शब्दांनीच नव्हे तर कृतीने तोडलेले असतात. कायदेकानू, चालीरीती, नीतिकल्पना यांची गुलामगिरी त्याने केव्हाच झुगारून दिलेली असते. या सर्वांचा तो प्रच्छन्न शत्रू असतो.

● क्रांतिकारकाला इतर कोणत्याही शास्त्राशी, कलेशी वा विद्येशी कर्तव्य नसते. हे सर्व ज्ञान तो भावी पिढ्यांसाठी राखून ठेवतो. तो फक्त एकच शास्त्र जाणतो–विध्वंसाचे. त्याला फक्त एकच कला अवगत असते–विनाशाची. हा विनाश साध्य करता यावा यासाठीच केवळ तो विज्ञान, रसायन, तंत्रशास्त्र यांचा अभ्यास करीत असतो. परंतु त्याच्या अहोरात्र चिंतनाचा विषय वेगळाच असतो. त्याला माणूस समजावून घ्यावयाचा असतो. माणसाच्या स्वभाववैशिष्ट्यांची आणि आवडी-निवडींची त्याला ओळख करून घ्यावयाची असते व या चिंतनाच्या आधारे विद्यमान समाजरचनेचा नेमका आधार कोणता याचा त्याला शोध घ्यावयाचा असतो. कारण हाती येणारी पहिली संधी त्याला या समाजरचनेच्या उच्चाटनासाठी वापरावयाची असते.

● क्रांतिकारकाला लोकमताची पर्वा नसते. सामाजिक नीतिमत्तेच्या कल्पनाही त्याला तिरस्करणीय वाटतात. क्रांती साध्य करणारा प्रत्येक मार्ग त्याला नीतिमान वाटत असतो. या मार्गाने आडवे येणारे सर्व प्रवाह त्याच्या दृष्टीने अनैतिक आणि म्हणूनच दंडार्ह ठरतात.

● क्रांतिकारकाचे जीवन हे एक समर्पित जीवन असते. राज्ययंत्रणा आणि तिला आधारभूत ठरणारा तथाकथित शिक्षित वर्ग यांच्याबद्दल त्याच्या मनात पराकाष्ठेची घृणा असते. म्हणून राज्ययंत्रणेपासून त्याला दयेची अपेक्षा नसते. प्रचलित राज्यसत्ता आणि क्रांतिकारक यांच्या दरम्यान सतत युद्ध चालू असते आणि या युद्धात विजय मिळेपर्यंत मृत्यूचे मूल्य देण्याची प्रत्येक क्रांतिकारकाची चिकाटी असते. राज्ययंत्रणेकडून होणारा छळ निमटपणाने सोसण्याचे सामर्थ्य त्याला आपल्या अंगी बाणवून घ्यावे लागते.

● क्रांतिकारक स्वतःच्या जीवनासंबंधी तितका बेफिकीर असतो तितकेच इतरांचे जीवही त्याला कःपदार्थ वाटत असतात. प्रेम, मैत्री, कृतज्ञता, इतकेच काय पण वैयक्तिक मानसन्मान या सर्व नैसर्गिक भावना पायाखाली तुडवून

त्यावर क्रांतिकारक अलिप्त मनाने उभा असतो. त्याचा आनंद, त्याचे समाधान, त्याच्या सर्व भावभावना एकाच गोष्टीत सामावलेल्या असतात. एकाच पारितोषिकासाठी त्याचा जीव आसुसलेला असतो. क्रांतीचा विजय. दिवस-रात्र त्याचे मन या एकाच गोष्टीत व्यग्र असते. त्याच्या डोळ्यांपुढे एकच स्वप्न तरळत असते. निर्दयी विनाश. हा विनाश घडून यावा म्हणून वेळप्रसंगी स्वतःला नष्ट करून घेण्यातही क्रांतिकारकाला धन्यता वाटते.

● सुख आणि दुःख, आनंद आणि खेद, मीलन आणि विरह या सर्व भावनांपासून क्रांतिकारकाने स्वतःस मुक्त करून घेतलेले असते. क्रांतीला विरोध करणाऱ्यांचा उच्छेद हाच त्याचा एकमेव आनंद असतो. वैयक्तिक मैत्री वा वैयक्तिक हेवेदावे यांना त्याच्या जीवनात स्थान नसते.

## क्रांतिकारक आणि क्रांतिसंघ यांचे संबंध

● क्रांतिसंघात दाखल होऊ इच्छिणाऱ्या नव्या सदस्याने क्रांतीवरील आपली दृढ श्रद्धा केवळ शब्दांनी नव्हे तर कृतीने सिद्ध केली पाहिजे. नंतर सर्व सदस्यांच्या एकविचाराने या उमेदवाराला क्रांतिसंघात समाविष्ट करून घेतले पाहिजे.

● सत्ताधारी गट, धनिक वर्ग व तथाकथित उच्चभ्रू समाज यांच्यांत क्रांतिकारक वावरत असतो तो केवळ या वर्गाचा त्वरित व संपूर्ण विनाश करण्याचा एकमेव हेतू सदैव मनात बाळगूनच. या उच्चभ्रू समाजाविषयी ज्याला सहानुभूती वाटते तो सच्चा क्रांतिकारकच नव्हे. समाजातील कोणत्याही व्यक्तीचा, स्थानाचा, वा अधिकारपदाचा विनाश करण्यास त्याने मागेपुढे पाहता कामा नये. त्याचप्रमाणे हे आपले आईबाप आहेत, हा मित्र आहे, ती आपली पत्नी वा प्रेयसी आहे या भावनेच्या आहारी जाऊन विनाशाच्या कर्तव्यास चुकणारी व्यक्ती स्वतःला क्रांतिकारक म्हणवून घेऊ शकत नाही.

● समाजाच्या सर्व थरांमध्ये क्रांतिकारकाची ये-जा असली पाहिजे. समाजात वावरताना आपले खरे स्वरूप प्रकट होणार नाही याची त्याने दक्षता बाळगावयास हवी. सरकारी अधिकारी, व्यापारी, श्रीमंत नागरिक, साहित्यिक, सैनिक हे समाजाचे भिन्न भिन्न स्तर त्याच्या निकटच्या परिचयाचे असले पाहिजेत.

● सध्याच्या कुजलेल्या समाजरचनेच्या आधारस्तंभांचे वेगवेगळे गट करून प्रथम कोणाचा नायनाट करावयाचा याची यादी क्रांतिकारकाजवळ तयार असली पाहिजे. क्रांतीच्या कट्टर शत्रूंचा नायनाट केला की सरकार हादरून जाते व जनताही खडबडून जागी होते. ज्यांचा ताबडतोब खून करावयाचा नाही अशांच्या दुष्कृत्यांचा पाढा सतत लोकांसमोर वाचत राहिला की लोकक्षोभात त्यांची आहुती दिली जाईल. जे निर्बुद्ध अधिकारी केवळ अधिकार-

पदामुळे मोठेपणास चढले आहेत, त्यांना आपल्या हेतूंच्या पूर्तीसाठी राबविण्याचे तंत्र अवलंबण्याची कुशलता क्रांतिकारकाने दाखवावयास हवी. आपल्यापेक्षा भिन्न मते असणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रारंभी हात लावू नये. उलट त्यांचा पाठिंबाच मिळवावा. एकदा का क्रांती यशस्वी झाली की मग त्यांना आपल्या मनाप्रमाणे वळविणे सोपे जाते. क्वचित क्रांतिकारकांमध्ये महत्त्वाकांक्षी व्यक्ती आढळून येतात. अशा व्यक्ती आपल्याविरुद्ध जात आहेत असे आढळून आल्यास त्यांचा बंदोबस्त करण्यासही क्रांतिकारकाने अनमान करता काम नये.

● समाजातील आणखी एक महत्त्वाचा वर्ग म्हणजे स्त्रियांचा. काही स्त्रियांना क्रांतीचे आवाहन समजू शकते. त्यांना आपल्या कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे. कारण स्त्री-समाजाचा पाठिंबा मिळाल्याशिवाय कोणतीच चळवळ यशस्वी होऊ शकणार नाही.

## क्रांतिकारक व त्याचे सहकारी यांचे संबंध

● क्रांतिकार्याची निष्ठा या व्यतिरिक्त क्रांतिकारकाचे आपल्या सहकाऱ्यांशी अन्य संबंध संभवतच नाहीत. संपूर्ण क्रांतिकारी विनाशाच्या कार्यासाठी आपला एखादा सहकारी किती उपयोगी पडतो याचाच केवळ क्रांतिकारकाने विचार करावयाचा असतो.

● सर्व क्रांतिकारकांमध्ये अभेद्य एकजूट असावयास हवी हे सांगण्याची गरज नाही. सर्व क्रांतिकारकांनी परस्परांशी विचारविनिमय करून आपला पुढील मार्ग निश्चित केला तरच यशाच्या रोखाने त्यांचे पाऊल पुढे पडेल. आपल्या सहकाऱ्यांनी सोपविलेली जबाबदारी नेटाने आणि अचूक पार पाडण्यातच क्रांतिकारकाच्या जीवनाची सफलता आहे. एकदा जबाबदारी सोपविली की मग क्रांतिकारकाने कोणाचाही सल्ला न घेता आपले पाऊल उचलावयास हवे.

● ज्वलंत क्रांतिकारक मूठभरच असतात. म्हणून काही किरकोळ कामे पार पाडण्यासाठी दुय्यम व तिय्यम दर्जाच्या सहकाऱ्यांचाही क्रांतिसंघात समावेश करून घेतला पाहिजे. मात्र त्यांच्यावर महत्त्वाची कामगिरी सोपविता कामा नये.

● आपला एखादा सहकारी बिकट पेचप्रसंगात सापडला असल्यास त्याला त्यातून सोडवावे किंवा सोडवू नये याचा निर्णय भावनेच्या दृष्टिकोनातून न करता उपयुक्ततेच्या भूमिकेवरूनच करावा. आपला सहकाऱ्याच्या बलिदानाने क्रांतीचे यश जवळ येत असेल तर त्याला सोडविण्याच्या भानगडीत इतर सहकाऱ्यांनी पडता कामा नये.

## क्रांतिसंघ व समाज यांचे संबंध

● स्वतःच्या श्रमावर जगणाऱ्या जनतेची सर्व जाचक बंधनांतून मुक्तता हेच

क्रांतिसंघाचे एकमेव उद्दिष्ट असले पाहिजे. प्रचलित समाजरचनेबाबत लोकांत प्रक्षोभ निर्माण करण्यासाठी त्यांच्या हालअपेष्टा कशा वाढतील याचाच प्रथम विचार केला पाहिजे. हालअपेष्टा वाढल्या की सर्वसामान्य लोक प्रचलित सत्तेविरुद्ध बिथरतात व त्यांच्या या भावनेचा क्रांतिसंघाने आपला उद्दिष्ट-पूर्तीसाठी योग्य उपयोग करून घेतला पाहिजे.

● आतापर्यंत पाश्चात्य देशांत ज्या राज्यक्रांत्या झाल्या त्या वेळी एक राजवट जाऊन दुसरी राजवट आली इतकाच काय तो फरक झाला. परंतु रशियात आपल्याला जी क्रांती घडवून आणावयाची आहे तीत प्रचलित राज्यसत्तेची पाळेमुळेच खणून काढावयाची आहेत व त्यामुळे जुने म्हणून जे काही आहे त्याचा समूळ नाश केलाच पाहिजे. भावी समाजव्यवस्था कशी असावी हे भावी पिढयांनी ठरवावे. आपले जीवितकार्य एकच आहे. विद्यमान राज्यसत्तेचा आणि समाजरचनेचा सर्वंकष, सार्वत्रिक आणि निर्घृण विनाश.

● हा हेतू साध्य करून घेण्यासाठी लोकमानस कसे तयार करावयाचे याचाच आपल्याला विचार करावयाचा आहे. कारण क्रांतिसंघामार्फत होणारी क्रांती आपल्या भल्यासाठी होणार आहे असा विश्वास समाजात निर्माण झाल्याशिवाय क्रांतीचे फलित हाती लागणार नाही.

सर्जी नेचॅयेव्हच्या या 'क्रांतिसूत्रां'चा लेनिनच्या विचारांवर प्रदीर्घ परिणाम झाला होता. नेचॅयेव्हच्या विचारसरणीत नवे जग निर्माण करण्यापेक्षा जुने जग नष्ट करण्यात अधिक भर देण्यात आला होता. लेनिनची विचारधाराही तशीच होती. रशियातील इतर वर्ग नष्ट होऊन कामगारांची अधिसत्ता निर्माण व्हावी व मूठभर सेवाभावी क्रांतिकारकांनी या सत्तेचे नेतृत्व करावे या नेचॅयेव्हच्या प्रतिपादनाचा धागा लेनिनने आपल्या विचारप्रणालीशी जुळवून घेतला. कालांतराने मार्क्सवादाच्या अभ्यासाने लेनिनची विचारकक्षा रुंदावून तो आंतरराष्ट्रीय क्रांतीचे स्वप्न आपल्या मनाशी रेखाटू लागला ही गोष्ट खरी असली तरी त्याचे विचार अखेरपर्यंत नेचॅयेव्हच्या क्रांतिसूत्रांच्या चौकटीतच फिरत होते ही वस्तुस्थिती अमान्य करता येणार नाही. डोस्टोव्हस्कीच्या 'पझेस्ड' या कादंबरीतील एक व्यक्तिरेखा एके ठिकाणी असे म्हणते, ' सर्व डोंगर नष्ट करून सारा भूभाग एकाच पातळीवर आणण्याची कल्पना मोठी रम्य आहे,' सारा समाज समपातळीवर आणण्याचा मार्ग नेचॅयेव्हने दाखवून दिला होता. लेनिनने तो प्रामाणिकपणे अनुसरला.

स्वत: लेनिननेही ही गोष्ट आपल्या मित्रांपाशी मान्य केली आहे. १९१७ ची राज्यक्रांती यशस्वी होऊन लेनिन रशियाचा सर्वसत्ताधीश झाल्यानंतर ब्रुयेव्हिच या आपल्या जिवलग मित्राशी बोलताना तो म्हणाला, " नेचॅयेव्ह हा एक महान क्रांतिकारक होऊन गेला. त्याच्या शिकवणुकीचा तीस वर्षांपूर्वी माझ्या मनावर परिणाम

जो झाला तो अद्यापही कायम आहे. त्याने आपल्या विचारांशी कधीच प्रतारणा केली नाही. सच्चा क्रांतिकारक म्हणून नेचॅयेव्हविषयी मला नेहमीच दर वाटत आला आहे. त्याचे सारे लिखाण आपण पुन्हा छापून लोकांसमोर ठेवले पाहिजे."

"तुला खरेच का तो एवढा मोठा वाटतो ?" ब्रुयेव्हिचने विचारले.

लेनिन उतरला, "होय, मी जेव्हा जेव्हा नेचॅयेव्हविषयी विचार करू लागलो तेव्हा तेव्हा मला त्याचे एक उत्तर आठवते. एकदा नेचॅयेव्हला कोणी तरी विचारले, 'राजघराण्यातल्या कोणत्या व्यक्तींचे खून केले पाहिजेत असे तुम्हांला वाटते ?' 'संपूर्ण रोमानोव्ह राजघराण्याचाच खून केला पाहिजे'–नेचॅयेव्हने तत्काळ उत्तर दिले होते. रोमानोव्ह राजघराण्याच्या साऱ्या शाखा तोडून टाकून त्याचे नावनिशाणही या भूमीवर राहू न देण्याची ईर्ष्या नेचॅयेव्हने त्या अशक्य वाटणाऱ्या काळी मोठ्या निर्धाराने बोलून दाखविली होती. 'ब्रुयेव्हिच, तू एकदा संपूर्ण नेचॅयेव्ह अवश्य वाच. विशेषतः, त्याची क्रांतिसूत्रे.'

गेल्या तीस वर्षांत लेनिनने हे शब्द असंख्य वेळा उच्चारले होते. (अपूर्ण)

[ मुक्ताफळे : पृष्ठ १५ वरून ]

आहे. मद्रास प्रांतात आता काँग्रेस मंत्रिमंडळ नसल्याने, अण्णा दुराई यांनी मध्यवर्ती सरकारला हा 'कलिजा' इतरत्र हलविण्याची विनंती केली आहे.

८ मे १९६७ रोजी बेगम अबदुल्ला यांना काश्मीरमधून हद्दपार केल्याला दोन वर्षे पूर्ण झाली. आता हद्दपारीची मुदत संपून त्या काश्मीरला परत जाऊ शकतात ! तिथे त्यांचे टोलेजंग स्वागत करण्यासाठी चार समित्या स्थापन झाल्या आहेत.

नुकत्याच इंदिरा गांधी कुलू खोऱ्यात काश्मीरमध्ये विश्रांतीसाठी गेल्या होत्या. काश्मीरची हवा शेख अब्दुल्ला यांना मानवेल की नाही याची जातीने पाहणी करण्याकरिता त्या गेल्या असाव्यात असा आमचा तर्क आहे.

शेख अबदुल्ला यांना सरकारने सोडले, तर महिन्याला २५४५ बिहारी माणसे जगू शकतील असा जयप्रकाश नारायण यांचा हिशेब आहे. केवळ ११ रुपयांत एक बिहारी माणूस महिनाभर श्वासोच्छ्वास करू शकतो असे म्हणतात. तेव्हा शेख अबदुल्ला यांना सरकारने आता सोडावे. यामुळे बिहारी जनतेचा व जयप्रकाश यांचा दुवा सरकारला मिळेल. समजा, शेखसाहेब पाकिस्तानात पळाले तर काय व्हायचंय ? नेहरूंवर प्रेम करणारा एक तरी मुसलमान पाकिस्तानात आहे असे अब्दुल्ला जिवंत असेपर्यंत आपल्याला छातीठोकपणे सांगता येईल व कासीम रझवीला जोडीदार होईल. सर्कशीत काम न करणाऱ्या या वाघाला नुसता पोसण्यात आता अर्थ नाही ! यशवंतरावजी सोडा हो त्याला......! —ग्यानबा

## उर्दू वार्ता


# राष्ट्रधर्म हाच खरा धर्म!

दिल्लीच्या 'मुल्क व मिल्लत' या उर्दू दैनिकाच्या संपादकीयात चीनमध्ये चाललेल्या इस्लाम धर्माच्या पद्धतशीर खच्चीकरणाविषयी लिहिताना, ऊठसूट भारतातील मुस्लिमांना इस्लामची ओठवण करून देणाऱ्या व त्यांच्या सुरक्षिततेची काळजी वाहण्याचा आव आणणाऱ्या प्रे. अयूबला चांगल्या कानपिचक्या देण्यात आलेल्या आहेत.

प्रे. अयूबच्या या हेतूपुरस्सर मौनाची कारणमीमांसा करताना संपादकांनी म्हटले आहे, "खरी मख्खी अशी आहे की, भारताबरोबरचे हाडवैर व पाक-चीन मैत्री ही परस्परसापेक्ष अशी बाब आहे! भारताविरुद्ध त्याला फक्त चीनचाच तर आधार आहे! मग तो चीनला कसा दुखवणार? आता त्यामुळे चीनमधील निरपराध मुस्लिमांचा छळ होतोय् हे खरे. परंतु पाकसाठी—प्रे. अयूबसाठी-त्यांनी एवढादेखील स्वार्थत्याग करू नये? स्वतःची 'कुर्बानी' देऊ नये? भारतातील आमच्या मुस्लिमबांधवांनी यापासून योग्य तो बोध घ्यावा!"

पाकविषयी अनैतिक प्रेम बाळगणाऱ्या मुस्लिमांना मला असं विचारायचंय् अयूबचं हे मौन इस्लामविषयी त्याला किती आस्था वाटते, हे पटवायला पुरेसं नाही काय? इथे, भारतात तुम्ही इस्लामची ढाल पुढे करून द्विभार्या प्रतिबंधक कायदा, संततिनियमन इत्यादींबाबत सवलती मागता, पण स्वतःला इस्लामी राष्ट्र म्हणवून घेणाऱ्या पाकमध्ये द्विभार्या प्रतिबंधक कायदा असून संततिनियमनही कायद्यानेच 'कम्पलसरी' आहे, हे तुम्हांला माहीत आहे काय?

देशहिताला उपकारक अशा राष्ट्रधर्मालाच कोणीही सुबुद्ध राज्यकर्ता अग्रस्थान देणार! आणि या राष्ट्रधर्माशी इमान राखणे हेच कोठल्याही धर्माभिमान्याचे कर्तव्य असणार, निदान असायला हवे! हिदायतखान




## मॅजिस्टिक बुकस्टॉल

## रौप्यमहोत्सवी वर्ष

दातार दुकानासमोर येऊन उभा राहिला. मी त्याला पाहिले आणि नजर वळवून दुसरीकडे पाहू लागलो.

सावकाश चालत तो माझ्याजवळ आला. एक पुस्तक उचलून चाळू लागला. तेव्हा नाइलाजाने मी म्हणालो,

"काय दातार ? "

"चान्स घेऊन आलोय, दातारची जन्मभर आठवण राहील असा चान्स." दातार हसत म्हणाला, पण माझ्यावर काहीच परिणाम झाला नाही.

'चान्स' हा शब्द दातारच्या तोंडून मी खूप वेळा ऐकला होता. त्याने अनेकांना अनेक प्रकारचे चान्स दिल्याचे त्याच्याच रसाळ वाणीतले सरस आणि सुरस किस्से मी खूप ऐकले होते. असे किस्से ऐकण्यात गंमत होती. पण मला मात्र दातारने कोणताच ' चान्स ' दिला नव्हता. उलट माझ्याकडून मात्र वारंवार चान्स घेतले होते.

एखाद्या पुस्तकाचा लॉट मी घेतल्याचे कळताच तो हटकून यायचा. विकण्यासाठी पाच-दहा प्रती न्यायचा, तेवढ्याच येईल त्या भावात विकून पैसे करायचा, आणि काही काळ फिरकेनासा व्हायचा.

# 'माझी जन्मठेप'
# ग्रंथविक्रीचा एक अनुभव

## केशवशेठ कोठावळे

असे त्याने बरेच वेळा केल्यावर एके दिवशी भांडण झाले होते आणि तो माझ्याकडे यायचा बंद झाला होता.

वासुदेव दातार. वय साठीकडे झुकलेले. गोरा आणि घाऱ्या डोळ्यांचा, बुटका पण मजबूत बांध्याचा. मराठी प्रकाशन-व्यवसायातील दोन-तीन पिढ्या त्याने जवळून पाहिल्या होत्या. त्यांची भरभराट आणि वाताहत यांना तो साक्ष होता भरभराटीपेक्षा वाताहतीच्या कथाच तो अधिक सांगे. कोण कसा अडचणीत आला आणि त्याचा माल गाड्या भरून भरून आपण कसा कुणाला विकला याबद्दलचे त्याचे किस्से ऐकताना मजा वाटायची आणि वाईटही वाटायचे. वाईट वाटायचे त्या प्रकाशकांबद्दल. श्री. रामभाऊ देशमुखांनी मराठी प्रकाशन-व्यवसायाला तारेवरची कसरत म्हटलं आहे. पण दातारच्या गोष्टी ऐकताना मात्र मला ती सुळावरची पोळी वाटायची. आज पाच–सहा वर्षांनी तो माझ्याकडे आला होता. आणि म्हणत होता,

"चान्स घेऊन आलोय, दातारची जन्मभर आठवण राहील असा चान्स."

त्याच्या चान्सवर माझा विश्वास नव्हता, काहीतरी गप्पा ठोकून माझ्याकडून काहीतरी उपटण्याचा त्याचा प्रयत्न असावा, अशी माझी समजूत. मी म्हणालो,

"कसला चान्स ?"

"माझ्याबरोबर चल, खरोखरच मोठा चान्स आहे."

कसला चान्स, कुठं जायचं, वगैरे काहीच न सांगता बरोबर चलण्याचा त्याने तगादा लावला. मी तयार होताच त्याने टॅक्सी थांबवली. आम्ही टॅक्सीत बसलो.

"सौदा चांगला आहे, एकदा ठरलेला सौदा फिसकटला आहे. वीरकर चिडले आहेत. खूप लोक टपलेले आहेत. कोणाला कळण्यापूर्वी आजच धाडस केलंस तर !"

"अरे, पण लॉट कसला आहे, प्रती किती आहेत ?" त्याच्या वरवरच्या बोलण्याला कंटाळून मी मध्येच विचारले.

"'माझी जन्मठेप' प्रती आहेत अडीच हजार. ×××ने एक रुपयाने सौदा

ठरवला होता. कालच पूर्ण व्हायचा होता. पण त्यानं शब्द बदलला आहे. कमी किंमतीने मागू लागला आहे. वीरकर आता त्याच्याशी व्यवहार करणार नाहीत. आणखी एक गिऱ्हाईक वीरकरांकडे आहे. पण पूर्वानुभवामुळे वीरकरांना त्याच्याशी व्यवहार करावयाचा नाही. तेव्हा आजचा दिवस तुझा आहे."

'माझी जन्मठेप' या पुस्तकाच्या प्रती यापूर्वीच रस्त्यावर आल्या होत्या. सव्वा–दीड रुपयांत प्रत या दराने विकल्या गेल्या होत्या, अजून काही ठिकाणी दिसत होत्या. तेव्हा अशा पुस्तकाच्या अडीच हजार प्रतींचा लॉट घेणे फायदेशीर होणार नाही, असे मी दातारला सांगितले. दातार म्हणाला,

"मी खपवून दाखवतो, तुला पैसे मिळवून देतो. अशी किती पुस्तके मी खपवली आहेत."

बोलत बोलत आम्ही श्री. वीरकरांच्या दारात येऊन पोचलो. दातारने माझी वीरकरांशी ओळख करून दिली. बोलण्याचं सर्व काम दातारच करीत होता. मी शांत बसलो होतो.

'माझी जन्मठेप' या पुस्तकाबाबतचे श्री. वीरकर यांचे अनुभव खूपच कटू होते, त्यांचा धंदा होता वेगळाच. कर्जाऊ रकमेच्या बदल्यात ही पुस्तके त्यांच्याकडे येऊन पडली होती. पाच-सहा वर्षे नुसती पडून होती. ग्रंथ-व्यवसायातील ज्या मित्रांच्या शब्दांवर विसंबून त्यांनी ही पुस्तके ताब्यात घेतली होती, त्यांनीच पाठ फिरवली होती. पुस्तक फुकटात पाडून घेण्याचे प्रयत्न केले होते. पुढच्या आशेवर ते होते, पण मध्यंतरी इतरत्रहून रस्त्यावर आलेल्या पुस्तकामुळे ते निराश झाले होते. पुस्तके लॉटने विकून टाकण्याचा त्यांनी निर्णय घेतला होता. या व्यवहारात त्यांचं खूपच नुकसान होणार होतं.

वीरकरांचं बोलणं मी निमूटपणे ऐकत होतो.

वीरकर आम्हांला शेजारच्या खोलीत घेऊन गेले. या खोलीत लोखंडी खाटा टाकून त्यांवर 'माझी जन्मठेप'ची बंडले सीलिंगपर्यंत रचली होती. बंडलांकडे हात दाखवीत ते मला म्हणाले,

"चार हजार पुस्तके आहेत. चार हजार रुपये आणून द्या, आणि आजच पुस्तके उचला. उद्या या दराने मिळणार नाहीत."

प्रती अडीच हजारांच्या चार हजार होताच मी दचकलो. लॉटच्या धंद्यात जेवढ्या प्रती कमी तेवढा धंदा फायदेशीर होण्याचा संभव असतो. चार हजार प्रती ठेवण्यासाठी जागा माझ्याजवळ नव्हती, एकदम देण्यासाठी चार हजार रुपये तर मुळीच नव्हते. सौदा होणं कठीण आहे हे जाणवलं. मी म्हटलं,

"आज एवढे पैसे माझ्याकडे नाहीत."

"किती आहेत?"

"दीड हजारापर्यंत असतील."

"मग आज दीड हजार रुपये आणून द्या. एक हजार प्रती न्या, एक महिन्यात बाकी अडीच हजार रुपये आणून द्या व सर्व प्रती न्या."

मी 'होय' म्हटलं. मी आणि दातार बाहेर पडलो, एका हॉटेलात जाऊन बसलो.

चहा पिता पिता 'माझी जन्मठेप' हे पुस्तक विकून चिक्कार पैसे मिळत असल्याचे एक सुखद स्वप्न दातारने माझ्यापुढे उभे केले, पण मी काही त्या स्वप्नात रंगलो नाही. तेव्हा तो म्हणाला,

"सर्व विक्रीचं कंत्राट माझ्याकडे दे. महिन्या-दोन महिन्यांत अर्धी रक्कम मोकळी करून देतो. मी दिलेल्या लॉटमध्ये घेणाऱ्याचा फायदाच झाला आहे. या सौद्यात मला काही जास्त नको, फक्त शंभर रुपये आणि दहा प्रती दे."

लॉट घ्यायचं नक्की ठरवलं.

घरी गेलो, बायकोची शिल्लक काढून मोजली. सोळाशे रुपये होते. शंभर रुपये ठेवले आणि पंधराशे घेऊन वीरकरांच्या घरी गेलो.

कागदपत्र झाले. एक हजार प्रती हातगाड्यांवर टाकून बनाम हॉल लेनमध्ये बंधूंच्या खोलीत आणून ठेवल्या.

बँकेत पाच-सहाशे रुपये होते, बाकी रकमेच्या जमवाजमवीला सुरुवात केली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच दातार आला. त्याच्या कमिशनचे शंभर रुपये त्याच्या हातावर ठेवले. पुस्तकाला चांगला दर मिळावा यासाठी लॉट घेतल्याचे काही काळ गुपित ठेवायचे ठरवले. दातारने थोडी थोडी पुस्तके नेऊन विकायची, पुस्तक पूर्वी रस्त्यावर आल्याने त्याची कमी झालेली प्रतिष्ठा वाढवायची असं ठरवलं.

दातारने त्याला द्यावयाच्या ठरलेल्या दहा प्रती घेतल्या. म्हणाला, "या विकतो. याचे पैसे आणून देतो, दुसऱ्या दहा नेतो, त्यांचे पैसे आणून देतो, आणखी नेतो."

मला ते पटले. दहा प्रती घेऊन दातार गेला. त्या विकून तो आणखी प्रती न्यायला येईल म्हणून मी वाट पाहत राहिलो.

दोन-तीन दिवस गेले पण दातार आला नाही. मी चरकलो.

चार-सहा दिवसांत 'जन्मठेप'चा लॉट विकला गेल्याची बातमी संबंधित लोकांत पसरली. टपलेले लोक हळहळले. जास्त हळहळले ते हळहळशेट. त्यांना या पुस्तकात खूपच स्वारस्य होतं. सावरकरांचं पुस्तक म्हणून तर होतंच. पण इतरही अनेक प्रकारे होतं. त्यांना खूप वाईट वाटलं. ते मला भेटले तेव्हा म्हणाले,

"'जन्मठेप'चा लॉट कुणी घेतला रे?"

"काही कळलं नाही."

ते चुकचुकत म्हणाले, "मी घेतला असता रे. सावरकरांचं सोन्यासारखं पुस्तक आता रस्त्यावर येणार. मला आधी कळतं तर वाटेल ती किंमत देऊन मी तो लॉट घेतला असता."

अर्थात ही सर्व पश्चातबुद्धी होती. लॉट विकला जायचा आहे हे हळहळशेठना

माहीत होते. आणि ही पुस्तके कमीत कमी किंमतीत पाडून घेण्याच्या प्रयत्नांत ते कसे होते हे श्री. वीरकर यांनी मला सांगितले होते.

सात-आठ दिवस झाले तरी दातार आला नाही. दादरला जाऊन त्याला गाठला. तो खिन्नपणे म्हणाला.

"सगळ्या बुक डेपोतून जाऊन आलो. प्रती आहेत म्हणतात, फुकटच्या भावात मागतात. एकही प्रत खपली नाही. पण थोडी कळ सोस, धीर धर. हे पुस्तक तुला पैसा देऊन जाईल."

धीर धरायलाच हवा होता. दुसरा मार्ग नव्हता. पुढील व्यवहारही सोडून देण्यासारखा नव्हता. वीरकर यांच्याशी झालेल्या करारांत 'एक महिन्याच्या आत सर्व व्यवहार पूर्ण न केल्यास पूर्वी नेलेल्या एक हजार प्रतींचे पैसे सहा रुपयाला एक प्रत या दराने वीरकरांनी वसूल करायचे' असे एक कलम होते.

महिना झाला तरी एकही प्रत विकली गेली नव्हती. इकडून-तिकडून जमवून वीरकर यांना पैसे नेऊन दिले. सौदा पूर्ण केला.

आणखी काही दिवस गेले. परिस्थिती बदलली नाही. संबंधित पुस्तक–विक्रेत्यांनी 'जन्मठेप' विकायची नाही असा कट केल्यासारखे भासू लागले व प्रत्यक्ष ग्राहकांकडे पुस्तकं जाण्यासाठी काय काय करता येईल याचा मी विचार करू लागलो.

'माझी जन्मठेप' या ग्रंथाबद्दल महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तींनी काढलेले प्रशंसोद्गार अनेक पुस्तकांतून एकत्र केले. काही चित्रे काढून घेतली. एक फोल्डर तयार केले. सवलतीची किंमत जाहीर केली. फोल्डरच्या खूप प्रती छापून घेतल्या आणि घूमधडाक्याने मेलिंग सुरू केलं.

१९५४ ची दिवाळी महिन्यावर आली होती. दिवाळी अंकांसाठी जाहिरात तयार केली. जाहिरातीचा ब्लॉक तयार केला, सवलतीच्या किंमतीसह जाहिराती दिवाळी अंकांतून झळकल्या. जाहिरात बरी झाली होती, ओळखीचे लोक जाहिरात चांगली केल्याचे सांगू लागले, बरं वाटलं. एक प्रकाशक भेटले, जाहिरात आणि जन्मठेप याबाबत बोलू लागले. शेवटी म्हणाले, 'अशी जाहिरातबाजी करून काय मेली मढी जिवंत होतात?" मनातून खट्टू झालो, उत्तर सुचलं नाही. त्या परिस्थितीत सुचणेही शक्य नव्हते.

दिवाळी अंकातील जाहिराती प्रसिद्ध होताच एक परिणाम लगेच घडून आला.

पुण्यात कुणाकडे तरी 'माझी जन्मठेप'च्या दीड–दोनशे प्रती होत्या. माझी जाहिरात प्रसिद्ध होताच त्यांना भीती वाटली. त्यांनी पुण्या-मुंबईत फिरून येईल त्या भावात त्या प्रती पुस्तक-विक्रेत्यांना विकून टाकल्या.

माझी पुरती कोंडी झाली. स्वा. सावरकरांची जन्मठेपेतून लौकर सुटका झाली, पण माझी होणार नाही, असे उद्गार ऐकू येऊ लागले. दिवाळी अंक ऑक्टोबरअखेर प्रसिद्ध झाले होते. आता नोव्हेंबरमध्ये आला तरी एकाही प्रतीची मागणी नव्हती.

कोणी घेणारा भेटला तर येईल त्या दरांत सर्व प्रती फुंकून टाकाव्या, असे वाटू लागले.

हळहळशेटची भेट घेतली. त्यांना म्हटलं,

"'माझी जन्मठेप'चा लॉट घ्यायची तुमची इच्छा होती. घेऊन टाका. चार हजार रुपयांना मी लॉट घेतला आहे, हजार-बाराशे रुपयांची जाहिरात केली आहे. इतरही काही खर्च थोडेफार केले आहेत. तुम्हांला योग्य वाटेल ते मला वर द्या. आणि लॉट घेऊन टाका."

हळहळशेट म्हणाले, "ठीक आहे, बायकोच्या कानांवर घालतो, उद्या सकाळी तुला नक्की सांगतो"

दुसरा दिवस उजाडला, हळहळशेट आले नाहीत. तिसऱ्या दिवशी मी त्यांच्या घरी गेलो. शेठ घरी नव्हते. बायकोला कामाचे स्वरूप सांगून निरोप ठेवला. शेठ आले नाहीत. चौथ्या दिवशी परत घरी गेलो. शेठ घरी नव्हतेच पण निरोप त्यांना मिळाल्याचे कळले.

आणखी दोन दिवस गेले, हळहळशेटची रस्त्यात गाठ पडली. लगेच मी विषय काढला.

"अरे हो, ते राहिलंच. बायकोला विचारून आज संध्याकाळपर्यंत सांगतो," ते म्हणाले.

त्या संध्याकाळीही ते आले नाहीत. काय समजायचे ते मी समजलो.

यापूर्वी पुस्तकांचे लॉट मी बरेच घेतले होते. भराभर पुस्तके विकून काढली होती. मग या वेळी प्रतिकूल तेच का घडत होतं? तीन महिने होऊन गेले तरी एकही प्रत का संपत नव्हती?

उत्तरे मला ठाऊक होती.

मराठीतील हा श्रेष्ठ ग्रंथ रस्त्यावर धूळ खात पडू नये. प्रतिष्ठेने तो विकला जावा असं मला वाटत होतं. म्हणून नेहमीपेक्षा वेगळ्या प्रकारे ही पुस्तके विकण्याचा मी प्रयत्न केला. रस्त्यावरील विक्रेत्यांना न परवडणारा दर ठरवून रस्त्यावरील विक्री तर मी थांबविली होती. पण प्रतिष्ठेने विक्री सुरू करण्यात मी यशस्वी होणार होतो का?

नोव्हेंबरची २९ तारीख उजाडली. मनीऑर्डर घेऊन येणारा पोस्टमन आला. त्यात तीन मनीऑर्डर्स 'माझी जन्मठेप' या पुस्तकासाठी होत्या. आरंभ झाला. दुसऱ्या दिवशी पाच मनीऑर्डर्स आल्या. त्याच दिवशी एका पुस्तक-विक्रेत्यानेही एक प्रत नेली. दोन ते पाच मनीऑर्डरी रोज येऊ लागल्या.

जाहिरातींचा आणि मेलिंगचा उपयोग होऊ लागला होता. कोंडी फुटणार होती. जन्मठेपेतून सुटका होणार होती. नवा उत्साह निर्माण झाला. ग्रंथप्रसाराचे विविध मार्ग हाताळू लागलो, यश येऊ लागले.

दिवाळी अंकांतील जाहिरातीची ग्राहकांना आठवण व्हावी म्हणून छोट्या जाहिराती सुरू केल्या. मेलिंगचे प्रमाण वाढवले. सवलती जाहीर करणारे पोस्टर्स तयार करून घेतले. ठिकठिकाणी लावले.

बाजारात जुना स्टॉक संपला. पुस्तक-विक्रेत्यांच्या ऑर्डर्स हळूहळू येऊ लागल्या.

'माझी जन्मठेप'च्या प्रतिष्ठेला साजेल असे वातावरण निर्माण झाले. 'जन्मठेप' विक्रीची निर्माण झालेली ही हवा अगदी शेवटची प्रत संपेपर्यंत टिकून होती. अर्थात अशा तंत्राने पुस्तक खपायला मूळ पुस्तकही 'माझी जन्मठेप' या पुस्तकासारखेच चांगले असावे लागते.

दातारचे बोल खरे ठरले, या पुस्तकाने मला पैसा दिला; एवढंच नव्हे तर दातारने न सांगितलेली एक मोठी गोष्ट या पुस्तकाने मला दिली, ती म्हणजे आत्मविश्वास !

[ 'मुद्रण-प्रकाश'च्या सौजन्याने ]

# अभिनव संगीत मैफल

[ पान ७ वरून ]

त्यांचा गळा म्हणजे एक चमत्कार आहे. मधुकंस संपवून ते रंगमंचावरून उतरू लागले. पण लोक त्यांना तेवढ्यावरच सोडायला तयार नव्हते. 'नाट्यगीत, नाटकातलं पद पाहिजे' लोकांनी गिल्ला केला. वसंतराव हसत हसत पुन्हा रंगमंचावर बसले आणि त्यांनी सुरुवात केली, "मधुमीलनात या, विलोपले ऽ ऽ." श्रोते खूष झाले.

वसंतरावांच्यानंतर पुष्पलता कुलकर्णी यांनी व्हायोलिनवर राग नटचंद्र आणि एक धुन वाजविली. खूप तयारीने आणि आत्मविश्वासाने. त्यानंतर ज्योत्स्ना मोळे आल्या. रात्रीचे अडीच वाजले होते. "मी आता भैरवीच गाते" त्या म्हणत होत्या. पण श्रोते नुसती भैरवी ऐकायला तयार नव्हते. मग ज्योत्स्नाबाईंनी छेडला 'बसंत.' 'भंवरा रे' तार षड्जावरची 'सम' मैफलीला भेदून गेली. बसंत रागानंतर कबिराचे एक भजन गाऊन ज्योत्स्नाबाईंनी मैफल संपवली.

मैफल संपली. ज्या अगत्यानं स्वागत झालं होतं त्याच अगत्यानं निरोप दिला गेला. पोरसवदा दिसणाऱ्या या तरुणांनी सर्व जबाबदारी उत्तम रीतीने सांभाळली होती. या तरुण पिढीतल्या या उसळत्या तारुण्याला योग्य वळण लावलं, तर ते कोणतंही विधायक कार्य किती नेटकेपणाने करू शकतं याचं हे एक उदाहरणच होतं. आजचा तरुण कोणतीही जबाबदारी उचलायला तयार आहे. आज हवा आहे या तरुणांना योग्य मार्गदर्शन करणारा चारित्र्यसंपन्न समर्थ नेता. पण...?

—अरविंद गजेंद्रगडकर

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
**सायनाचार्य, नासिक**

दि. १७ ते २३ जून १९६७

**मेष** : या वेळी इतर ग्रहांनी तुमच्या अडीअडचणींची फारशी दखल घेतली नाही तरी एकटा पराक्रमस्थ सूर्य तुमच्या विवंचना मिटवायला समर्थ आहे.

शिक्षणासाठी दूरदेशी स्थानांतर घडेल, नवे क्रांतिकारक-ओजस्वी नाटच-लेखन हातून घडेल आणि अल्पावधीतच ते रंगभूमी गाजवून सोडील. तुमच्या कर्तृत्वाची धार तुमच्या कल्पनेचा उन्मेष यावर अनेकांच्या नजरा खिळून राहतील. गेल्या ४–६ महिन्यांत जे घडले नाही–शिकस्तीचा प्रयत्न करूनही घडू शकले नाही–ते या वेळी सहजासहजी घडून यावे.

व्यावसायिक वातावरण सुधारेल. नव्या क्रांतीच्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील.

दि. २१–२२–२३ ला विशेष संस्मरणीय चांगल्या गोष्टी घडाव्यात.

**वृषभ** : तृतीय स्थानी गुरु-शुक्र युती. अशी संधी पुन्हा १२ वर्षे तरी येणार नाही. साहित्यिकांना, कलावंतांना हे एक महान वरदान ठरेल. आपल्या प्रभावी कल्पना आकार घेऊ लागतील, नव्या योजना कार्यान्वित ठरतील.

या काली अनपेक्षितपणे दूरचा प्रवास घडेल अथवा स्थानांतर–स्थित्यंतरही घडेल.

व्यापारी क्षेत्रात या वेळी आपल्या हातून प्रचंड उलाढाली घडून यायला लागतील. रासायनिक द्रव्ये, खते, मसाले अशा व्यापारात प्रचंड वधघट घडेल आणि त्याचा आपणांस अचूकपणे लाभ घेता येईल. आपले कोणतेही व्यावसायिक क्षेत्र असो ते या वेळी अपेक्षेपेक्षा अधिक यशदायी ठरेल.

दि. १९–२०–२१ या काळांचे विशेष स्मरण ठेवा.

**मिथुन** : गुरु–शुक्र युती आणि तीही धनस्थानी. क्वचित वेळी असे योग घडत असतात आणि म्हणूनच ते होतात तेव्हा अनन्यसाधारण असे कार्य करून जातात.

या वेळी नोकरीधंद्यात असे काही अघटित घडेल की, त्यामुळे तुम्हांला खूप पैसा मिळून जाईल. या वेळी फारशी धावपळ धडपड न करताही विक्रमी यश मिळू शकेल. अशी सर्वोत्तम ग्रहस्थिती पाठीशी असल्यावर चौथ्या मंगळाबद्दल ना खेद ना खंत. सारे काही आखीव वेळापत्रकाप्रमाणे घडून यायला लागेल.

नोकरीत प्रगती. शिक्षणात पुढचे पाऊल. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा आणि साहित्याच्या प्रांतात दबदबा–असे आणि अशाच प्रकारचे आणखीही काही या वेळी घडू शकेल. दि. १९–२१–२३ या काली आनंदाची बातमी कळेल.

**कर्क** : कर्क ही अभिजात प्रवृत्तीची व सहजसुलभ यश देणारी राशी म्हणून तिचा लौकिक आहे. या वेळी गुरुसमवेत–शुक्रही कर्केत येणार असल्यामुळे, तिच्या पूर्वापार लौकिकात अधिक भरच पडेल.

कलावंतांना–सिनेसृष्टीतील व्यक्तींना, याच्याइतका–सर्वांगाने प्रगतीचा काल यापूर्वी क्वचितच जाणवला असेल. या कालात पैशाबरोबर लोकप्रियता आणि अधिकाराबरोबरच राजमान्यता ही लाभावी.

नोकरीधंद्यात अनपेक्षित लाभ उठवता येईल, व्यवहाराला एकदम चांगली कलाटणी मिळेल. प्रगतीचे एक नवे क्षेत्र हाती येईल. मुलांना–महिलांना तर हा एक सर्वोत्तम काळ होय. दि. २० ते २३ लाभदायक व प्रगतिपर काळ.

**सिंह** : गुरु–शनी अनुकूल नाहीत याची मुळीच खंत बाळगू नका. सूर्य–बुध लाभस्थानी एवढी ग्रहस्थिती सारी अनिष्टता ठोकरून काढायला समर्थ आहे.

तुमचे घराणेच क्रांतिकारकांचे, जगाला धक्के बसण्यासारखे काही आगळे करावे आणि त्यामुळे सर्वांचे लक्ष्य बनावे अशी तुमची जहाल मनोवृत्ती. त्या मनोवृत्तीला पोषक अशी ग्रहस्थिती या वेळी निर्माण होत आहे. त्याचा फायदा घ्या आणि काही भव्य–दिव्य–नव्य असे करून दाखवा, असे हर्षल-मंगळादी ग्रहांचे तुम्हांला आवर्जून सांगणे आहे.

मंगळ लवकरच पराक्रमस्थानी येणार आहे त्याची ही प्रसादचिन्हेच. प्रवासबदल घडेल. आणि तो घडवून आणावा. घोळ घालीत बसणे आता योग्य नाही. कोणत्याही गोष्टींचा झटपट निर्णय घ्या.

दि. १८–१९–२३ आश्चर्यकारक प्रगत घटना घडून यायला लागतील.

कन्या : गुरूबरोबर शुक्रही एकादशात. यापैकी एका ग्रहानेही मनात आणले तरी तुमची हयात उजळून निघेल.

संपूर्ण अपेक्षासाफल्याचा काल हाच. या कालाचे माहात्म्यच असे की, जे जे करायचे ठरवाल ते ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. समाजाचे पुढारीपण, क्रांतिकारक गटाचे नेतृत्व, विरोधी आघाडीचा सूत्रधार अशी विशेषणे तुम्हांला मिळू लागतील.

नोकरीधंद्यात तर या कालाइतका सर्वोत्तम लाभाचा व प्रगतीचा काल या पूर्वी आपण क्वचितच अनुभवलेला असेल.

नवा उद्योगधंदा उभाराल. तो यशस्वी व्हावा यासाठी अनेकांचे सहकार्य मिळवाल, आणि यामुळे उज्ज्वल ध्येय नजीकच्या कालातच दृष्टिक्षेपात येईल.

दि. १९ ते २२ या कालाची नोंद करा.

तूळ : सूर्य–बुध भाग्यस्थानी आले आणि त्यांनी तुम्हांला प्रसन्नतेचे वरदान दिले. आता व्ययस्थ मंगळाची डर नको की सातव्या राहूबद्दल खंत नको.

हा महिना स्थानांतर आणि बदल घडवून आणणारा आहे. नव्या व क्रांतिकारक विचारांची शिदोरी घेऊन आपण भविष्यकालाची वाटचाल करू लागलात तर उज्ज्वल भविष्याचा ध्रुवतारा लवकरच दृष्टिक्षेपात यावा.

कलावंतांना साहित्यिकांना तर यासारखा सर्वांगाने प्रगतीचा काल पुन्हा लवकर दिसणार नाही. तुमचे जे जे क्षेत्र असेल त्यात आवाज उठवाल, अमाप लोकप्रियता मिळवाल.

दि. १८–१९–२१–२३ सर्वोत्तम प्रगतीचे व स्वास्थ्याचे काल.

वृश्चिक : सारे पुरोगामी प्रवृत्तीचे लोक वृश्चिक राशीत एकवटल्यासारखे दिसतात. वेगळे आणि आकर्षक करून दाखवण्याच्या प्रवृत्तीने ही सारी माणसे झपाटल्यासारखी दिसतात. आणि या वेळी तर भाग्यस्थ गुरू-शुक्रांचीही त्यांना साथ लाभलेली आहे.

विज्ञानाच्या क्षेत्रात रासायनिक विभागात आणि राजकीय आखाड्यातही तुम्हीच आवाज उठवू शकाल. एवढेच नव्हे तर ज्या ज्या क्षेत्रात आपण पाऊल टाकाल त्या त्या क्षेत्रातील सर्वोच्च स्थान तुम्हांलाच मिळावे हे निरपवादपणे सिद्ध होईल. तात्पर्य हवामान पूर्णत्वाने अनुकूल आहे. थोडाफार प्रयत्न केलात तरी तुमची ध्येयनौका इच्छित स्थळी सर्वांआधी पोचेल.

यांत्रिक–तांत्रिक विभागातही आपण यश मिळवाल.

दि. २० ते २३ या काळाचे महत्त्व सर्वोत्तम ठरेल.

धनू : या आठवड्यात आपला अनिष्ट काल ओसरू लागल्याचा जाणीव होऊ लागेल. तसे संपूर्ण स्वास्थ्य सिंहेत गुरू गेल्याशिवाय लाभणार नाहीच. असे आहे तरी या आठवड्यापासून तुमच्या बोथट झालेल्या प्रज्ञेला झळाळी चढू लागेल. निष्प्रभ

कर्तृत्व धारदार बनू लागेल. यश झगडूनच मिळवावे लागेल पण मिळेल निश्चित.

नव्या जबाबदाऱ्या वाढू लागतील. नोकरीधंद्यात समर्थांच्या कृपने हुकलेली संधी पुन्हा लाभण्याची लक्षणे दिसायला लागतील. तुमच्यातील अभिजात कलाप्रवृत्तींना या आठवड्यापासूनच उत्थान मिळायला लागेल.

शक्यतो दूरच्या प्रवासाचे टाळा आणि अनाठायी खर्चाला आळा घाला.

दि. १७ ते २० हाच काल काहीसा आशादायक.

**मकर** : सध्या अंतरिक्षातील साऱ्या ग्रहांचे तुम्हांला वरदान लाभलेले आहे. अंगीकृत व्यवसायात पैसा अमाप मिळेल, समाजात प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

कलावंतांना दीर्घ मुदतीचे आकर्षक करारमदार करण्याची संधी मिळेल तर राजकारणी व्यक्तींना सर्वोच्च मानाचे स्थान लाभण्याची शक्यता दिसू लागेल.

शैक्षणिक यशामुळे वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल तर सामाजिक यशामुळ तुमची लोकप्रियता कळसाला पोचेल. प्रगतीचे गणित झटपट आणि बरोबर कसे सोडवावे हे जगाने तुमच्याकडून शिकावे. याच कालापासून नामवंत साहित्यिक म्हणून तुमची यशोदुंदुभी निनादू लागेल.

दि. १९ ते २२ या कालावर सारी दृष्टी केंद्रित करायला हवी.

**कुंभ** : सूर्याचे सहकार्य मिळू लागलेले आहे आणि आठव्या मंगळाची अनिष्टताही आता बरीचशी निवळलेली आहे. यामुळे आता आपणांस काळजी करण्याचे कारण नाही. बऱ्याचशा विवंचना मिटतील, आरोग्याबद्दलची काळजी दूर होईल. नोकरीधंद्याचे प्रश्न सुटू लागतील.

या आठवड्यात आपणांस प्रिय जनांच्या भेटीगाठीचे योग येतील. साहित्य–कला-विज्ञान क्षेत्रात काही तरी नाव होण्यासारखे कार्य करून दाखवू शकाल.

मुख्यत: लक्षात घेण्यासारखे कार्य राजकीय क्षेत्रात करता येईल. तेथे तुमच्या अनन्यसाधारण बुद्धिसामर्थ्याचे दर्शन घडेल. प्रभावी वक्तृत्वामुळे अनेकांची हृदये जिंकू शकाल. हा काल सांपत्तिक प्रगतीपेक्षा बौद्धिक कर्तृत्वाचाच अधिक जाणवेल.

दि. १७–१९–२१–२२ या कालात अनेक महत्त्वपूर्ण कामे यशस्वी व्हावीत.

**मीन** : गुरु-शुक्र पंचमात आल्यामुळे तुमच्या कर्तृत्वाला भरपूर वाव मिळू लागेल. मुख्यत्वे शैक्षणिक क्षेत्रात नेत्रदीपक यश लाभेल. सांपत्तिक बाजूही चांगलीच सुधारेल. साडेसातीतही केव्हा केव्हा असे आशादायक काल निर्माण होऊ शकतात. तुमच्या स्थगित कार्यांना गती मिळेल, व्यावहारिक योजना यशस्वी ठरायला लागतील. नृत्य–नाट्यादी कलाक्षेत्रातील व्यक्तींना तर हा अधिकाधिक प्रगतीचा काल अनुभवण्यास् मिळावा.

सुंदर–आकर्षक–मोहक वस्तूंच्या क्रय–विक्रेत्यांना या आगामी ८–१५ दिवसांत कधी झाला नसेल एवढा लाभ पदरी पडावा.

दि. १९–२१–२३ या कालात अनेक लाभ उठवू शकाल. ●

## साप्ताहिक ' माणूस '

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## राजा शिवछत्रपति


सप्रेम भेट.

• •

सप्रेम भेट योजना : १ जून ते १५ ऑगस्ट १९६७

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.